059.05
AJI

## मुळजी जेठा महाविद्यालय

## जळगाव

B.V. 5440

## नियतकालिक

वर्ष २८ * अंक २९

१९७३-१९७४

# अजिंठा

## संपादक-मंडळ :

प्राचार्य चं. रा. पोतनीस
प्रा. म. ना. अदवंत
प्रा. शु. म. थत्ते
प्रा. अं. गं. चिपळुणकर
प्रा. म. मो. केळकर
प्रा. रा. वा. पाटील
प्रा. सौ. मंगला नाडकर्णी
प्रा. ल. न. मुलबागल
प्रा. इफ्तिकार अहमद
श्री. प्रकाश हरताळकर [ विद्यार्थी-प्रतिनिधी ]

प्रकाशक :
प्रा. अं. गं. चिपळुणकर
मु. जे. महाविद्यालय
जळगाव.

मुद्रक :
सुभाषचंद्र के. चौधरी
श्रीकान्त मुद्रणालय
१७४, बळीराम पेठ,
जळगाव.

# संपादकीय-

गेल्या वर्षी अजिठाचे दोन अंक आम्ही दिले होते. पहिला अंक निव्वळ लेखांचा व दुसरा मुख्यत: अहवाल व काही लेख असा. या वर्षी कागद टंचाईमुळे एकच अंक आणि तोही आकारात बदल करून सादर करीत आहोत.

७२ मार्चला दुष्काळाच्या छायेत उन्हाळी सुटीनिमित्त बंद झालेले कॉलेज १५ जूनला परत नवीन उत्साही वातावरणात सुरू झाले. १८ जूनपासून प्री-डिग्री व २५ जून पासून इतर वर्गाचे काम सुरू झाले. परीक्षांचे निकाल चांगले लागल्याने सर्वच वर्गात विद्यार्थ्यांची गर्दी झाली. यंदा विद्यार्थ्यांच्या वर्गातील उपस्थितीबद्दल विशेष भर व आग्रह प्राचार्यांनी धरल्याने पहिल्या सत्रात सर्वच वर्गात उपस्थिती चांगली होती. दुसऱ्या सत्रातही काही वर्ग सोडले तर इतर वर्गात उपस्थिती शेवटपर्यंत चांगली राहिली.

## जिमखाना व इतर मंडळे-

पहिल्या स्टाफ मीटिंगमध्ये प्राचार्यांनी विविध कामाची वाटणी प्राध्यापक वर्गात करून देऊन नवीन वर्षाच्या महाविद्यालयीन कामास सुरवात करून दिली. सर्व मंडळांचे अहवाल इतरत्र दिले आहेत त्यावरून वर्षभरात झालेल्या कार्यक्रमांची कल्पना येईल. या वर्षी जिमखान्यात श्री. पाटील यांची विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नेमणूक झाली. त्याचा फायदाही खूप झाला व विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष सराव करून घेण्याच्या आग्रहामुळे खेळातील प्रगतीस चांगलीच चालना मिळाली. प्रा. अभ्यंकर यांचे अचूक मार्गदर्शन, श्री. देशमुख यांची तत्परतेने काम करण्याची पद्धत व श्री. जगन्नाथ पाटील यांची मेहनत यामुळे जिमखाना विभाग अत्यंत कार्यक्षम राहिला. जिमखान्याचा वार्षिक पारितोषिक-वितरण समारंभ चाळिसगाव कॉलेजचे प्राचार्य चित्रे- ते स्वतःही उत्तम खेळाडू आहेत-यांच्या हस्ते पार पडला.

वादविवाद मंडळ प्रा. लताताई पाटणकर यांच्या उत्साही व कार्यक्षम नेतृत्वाखाली सबंध वर्षभर विद्यार्थ्यांना विविध विषयाबाबत औत्सुक्य निर्माण करून विद्यार्थ्यांच्या विचाराला चालना देण्याचे काम सातत्याने करीत आहे. वाङ्मय मंडळाचे कार्य व मार्गदर्शन प्रा. राजा महाजन यांच्याकडे आहे. आपल्याच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या- श्री. एकनाथ देशमुख वाङ्मयीन कार्याची प्रगती व प्रशंसा हे एकच

उदाहरण वाङमय मंडळ योग्य दिशेने काम करीत असल्याचे निदर्शक आहे. सायन्स असोसिएशन व भूगोल मंडळ ही नेहमीप्रमाणे कार्यरत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना प्रा. दि. ह. महाजन यांच्या नेतृत्वाखाली व त्यांच्या इतर साहाय्यकांच्या उत्साहपूर्ण सहकार्याने विद्यार्थ्यांत सेवाभाव व श्रमदानाची महती पटविण्याचे कार्य अगदी मिशनरी पद्धतीने करीत आहे. प्लॅनिंग फोरम प्रा. राणे यांनी चांगला कार्यप्रवण ठेवला.

या वर्षी एन्. सी. सी. विभागात ले. कर्नल सी. व्ही. नेरूरकर ह्यांनी कमांडिंग ऑफिसर म्हणून १ जून पासून सूत्रे हाती घेतली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कॅप्टन खडके व त्यांच्या इतर साहाय्यकांनी नेहमीप्रमाणेच सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तीत व सुव्यवस्थित पार पाडले. या वर्षी एन. सी. सी. चे सिल्व्हर ज्युबिलीचे वर्ष असल्याने खासदार प्रा. भाइसाहेब महाजन यांच्या अध्यक्षतेखाली श्री राम जेठमलानी यांचे प्रमुख पाहुणे म्हणून भाषण झाले. दोघांचीही भाषणे तरुणांना स्फूर्तिदायक ठरली एन. सी. सी. यापुढे अधिक भरीव काम करून आपल्या महाविद्यालयाचे कीर्तीत भर टाकील अशी आशा आहे.

## स्नेहसंमेलन–

दुसऱ्या सत्रात स्नेहसंमेलन चांगले पार पडले. वर्ग–प्रतिनिधींच्या निवडणुका होऊन जनरल सेक्रेटरी म्हणून श्री. श्रीधर चौधरी यांची निवड झाली. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्वांनी स्नेहसंमेलन उत्तम प्रकारे पार पाडले. विशेष कौतुकाचा भाग म्हणजे पहिल्या दिवशीचा महाविद्यालयीन विविध करमणुकीचा कार्यक्रम सर्वांनी योग्य प्रतिसाद देऊन कौतुकास्पद उत्साहाने व रसिकतेने पाहिला व ऐकला.

पहिल्या दिवसाचा विविध मनोरंजनाचा कार्यक्रम हा कॉलेजांतील विद्यार्थी–विद्यार्थिनींचा सादर करावा असे ठरले. त्याप्रमाणे मनोरंजन समितीचे प्रा. रा. वा. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध मनोरंजनाचा कार्यक्रम तयार करण्यात आला. कार्यक्रमात विविधतेबरोबर वेधकताही यावी या हेतूने नाटिका, सिनेगीते, नकला, नृत्ये, आकाशवाणी अशा बहुरंगी प्रकारांचा समावेश कार्यक्रमात करण्यात आला.

स्नेह-संमेलनाच्या पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमास दि. २०–१२–७३ रोजी बालगंधर्व खुले नाट्यगृहात संध्याकाळी बरोबर ५ वाजता प्रारंभ झाला. सुरवातीस वसंत सबनीस लिखित 'आम्ही सौजन्यात आहोत' या मराठी नाटिकेचा प्रयोग सादर करण्यात आला. कलाकारांनी आपल्या भूमिका समजून–उमजून करण्याचा प्रयत्न केला. सिनेगीतांचा कार्यक्रम आपल्याच विद्यार्थ्यांनी मोठ्या दमदारपणे पेश केला. झंकारमधील काही वादक कलाकारांची त्यांना योग्य ती साथ मिळाली. चांगरे व श्याम देशपांडे यांच्या सुरवातीच्या सिनेगीतांनाच विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीची



पावती दिली. श्री. आर. डी. पाटील व धांडे यांच्या गीतांनी तर विद्यार्थ्यांची मने पुरतीच जिंकली. श्री. सुरेश पाटील यांच्या 'हाल क्या है दिलों का' या कव्वालीवर तर विद्यार्थी बेहद्द खूष झाले. मनोहर निफाडकर, मोहन कुळकर्णी यांच्या सुरेल बासरीवादनाने व जयंत चौधरी व श्याम जोशी यांच्या मस्त धुनांनी कार्यक्रमास वेगळीच रंगत आणली. लोखंडेच्या नकलांनी प्रेक्षकांना पोटभर हसविले तर जैन व पाळीवाल या दुकलीच्या जादूच्या प्रयोगांनी प्रेक्षकांना विस्मयाचे गोड धक्के दिले.

नृत्यात दोन भांगडा–नृत्ये व एक कोळी–नृत्य अशी विविधता होती. एक भांगडा व्यास व त्यांच्या इतर कलावंत मित्रांनी सादर केला. दुसरा भांगडा–जहांगीर व इतर कलाकार विद्यार्थी–विद्यार्थिनींनी मिळून सादर केला. जोश, उन्मुक्त लय व बेहोशी दोन्ही नृत्यात दिसून आली. साळुंखे, नेवे व गुलाब पाटील या मंडळीने पेश केलेले कोळी–नृत्यही लक्षणीय होते. नेटक्या अभिनयातून व सूचक हावभावातून नेमका आशय सूचित करण्याचे त्यांचे कौशल्य प्रशंसनीय होते. श्री. एल्. टी. देशमुख यांच्या उपहास–गर्भ वार्ता–पत्राने श्रोत्यात चांगलीस खसखस पिकली. श्री. चव्हाण यांनी कार्यक्रमाचे जे उद्घोषण केले त्यातही मार्मिकता होती.

प्रा. रा. वा. पाटील यांच्या संयमी व समंजस स्वभावामुळे कार्यक्रमात उद्भवणाऱ्या पेचप्रसंगाची सोडवणूक सुयोग्य रीतीने झाली. काही विद्यार्थ्यांच्या अडवणुकीची वृत्ती मात्र अनाकलनीय आहे. दुसरे दिवशीचा कार्यक्रमही– म्यूझिकल मेलडी–चांगला झाला. शेवटी शेवटी झालेला थोडासा गोंधळ वगळता बाकी सर्व कार्यक्रम बरा झाला.

## वसतिगृह -

प्रा. रा. वा. पाटील यांना सहाय्यक म्हणून या वर्षी प्रा. खारूल हे लेडीज होस्टेल चा विभाग उत्तम प्रकारे सभाळीत आहेत. शिवाय श्री. ए. पी. चौधरी हेही प्रा. पाटील यांना मदत करीत आहेत. सर्वांच्या नेहमीच कार्यरत असण्याच्या स्वभावामुळे वसतिगृह अत्यंत योग्य व शिस्तबध्द रीतीने वाटचाल करीत आहे. वसतिगृहाचा अहवाल त्या दृष्टीने चांगलाच बोलका आहे. या वर्षीच्या वसतिगृहाच्या स्नेहसंमेलन प्रसंगीचे आपले पूर्वीचे प्राचार्य व खासदार भाइसाहेब महाजन यांचे विचार–प्रक्षोभक भाषण तर अविस्मरणीय आहे.

## ग्रंथालय -

उप–प्राचार्य प्रा. म. ना. अदवंत यांच्या मार्गदर्शनाखाली वाचनालय सुयोग्य वाटचाल करीत आहे. यंदा २७५७ ग्रंथांची भर पडली. वाचनालयाची नवीन इमारत केव्हा पुरी होईल याची सर्व जण वाट पहात आहेत. सध्याच्या इमारतीत आता

कपाटांची फारच गर्दी झाल्याने बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. खासदार व आपले आवडते प्राचार्य भाऊसाहेब महाजन यांनी या वर्षी २५०० रु. किमतीची ४०० पुस्तके देणगी रुपाने महाविद्यालयास दिली. त्यांच्या पुस्तकवेड्या स्वभावास व उदार वृत्तीस हे सुयोग्यच आहे. महाविद्यालय त्यांची ही अमोल देणगी कृतज्ञ-पूर्वक सांभाळील अशी खात्री आहे. तसेच बोहरा समाजाचे धर्मगुरू हिज होलिनेस सेठना महमद बुराउद्दीन साहेब यांनी रु. ३०००।-, शास्त्रातील पुस्तके विकत घेण्याकरिता व गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीकरिता देणगी देऊन महाविद्यालयास उपकृत केले आहे याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो देणगीबद्दल संस्था आभारी आहे.

## प्राध्यापक–

या वर्षी कॉलेज सोडून गेलेल्या प्राध्यापकात कु. व्हेगस ( इंग्रजी विभाग ) व श्री. एच. एस. साने ( हिंदी विभाग ) हे विद्यार्थी-प्रिय प्राध्यापक आर्टस विभागात कार्य करीत होते. कु. व्हेगस यांच्या आकर्षक व्यक्तिमत्वाची व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाची आठवण विद्यार्थ्यांना सतत होत राहील. प्रा. साने हे आपल्या अभ्यासू वृत्तीमुळे व मनमिळाऊ स्वभावाने सर्वांच्याच आवडीचे झाले होते त्यांची उणीव सतत भासेल. सायन्स विभागातील कु. इंदू दाभ.डे (बॉटनी) (आता सौ. फाटक) यांचीही आठवण सर्वांनाच राहील. कॉमर्स विभातील नाणावलेले व अनुभवी प्रा. श्री. डी. एस्. बोरवले ( अकौंटन्सी ) व श्री. के. यू. कुळकर्णी (मर्कंटाइल ॲन्ड इंडस्ट्रियल लॉ ), श्री. एस. जी. पाटील (स्टॅटिस्टिक्स) यांची ही अनुपस्थिती जाणवेल.

### या वर्षी नवीन आलेले प्राध्यापक–

१) श्री. बी. आर. पाटील ( इंग्रजी )
२) श्री. टी. जे. चौधरी ( हिंदी )
३) श्री. एस्. जी. देशपांडे ( कॉस्टिंग )
४) श्री. पी. बी. भंगाळे ( मर्कंटाइल ॲन्ड इन्डस्ट्रियल लॉ )
५) श्री. जे. डी. नांदोडे ( बॉटनी )
६) श्री. ए. पी. चौधरी ( भूगोल )

प्राध्यापकांच्या विशेष उल्लेखनीय गोष्टी म्हणजे उपप्राचार्य प्रा. म. ना. अदवंत यांची त्यांच्या ' मराठीतल काही कथाकार ' पुस्तकाबद्दल मुंबई विद्यापीठाने केलेला गौरव. प्रा. म. ना. अदवंत यांच्या आतापर्यंतच्या वाङमयीन व विशेषतः टीकात्मक लेखनाच्या कामगिरीचा झालेला गौरव त्यांच्या अभ्यासू वृत्तीची व ज्ञानलालसेची ग्वाही देणाराच आहे. प्रा. इक्तिकार अहमद यांनी अत्यंत प्रतिकूल



परिस्थितीत अत्यंत परिश्रमपूर्वक व चिकाटीने अभ्यास करून डॉक्टरेट मिळवली आहे. त्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. दोघांचाही स्टाफ तर्फे अत्यंत उत्साहाने सत्कार व गौरव करण्यांत आला. त्याची छायाचित्रे अन्यत्र छापली आहेत.

ऑफिसमधून या वर्षी श्री. नांदोडे ( क्लार्क ) व हेड प्यून श्री. रामसिंग हे निवृत्त झाले. श्री. नांदोडे यांच्या शांत व धिम्या वृत्तीची आठवण सर्वांनाच सतत राहील. श्री. रामसिंग यांचे व्यक्तिमत्व व नेतृत्वगुण तर सर्वांच्याच कौतुकाचा विषय झालेले आहेत. त्या दोघांनाही दिलेला प्रेमाचा निरोप व केलेला गौरवही सुयोग्यच आहे.

या वर्षापासून दोन नवीन विषय सुरू केले गेले. मिलिटरी स्टडीजचा अभ्यास-क्रम श्री. दिक्षित हे त्यांच्या प्रदीर्घ एन्. सी. सी. मधील अनुभवाने व त्यांच्या ह्या विषयावरील प्रेमामुळे उत्तम रीतीने पुरा करून घेत आहेत. श्री. डी. एच. महाजन हे समाजशास्त्र विषय अत्यंत परिश्रमपूर्वक अभ्यासून विद्यार्थ्यांना शिकवीत आहेत. दोन्ही विषय सर्व एस्. वाय. च्या विद्यार्थ्यांत अत्यंत आवडीचा झाला आहे

प्रा. अदवंत प्रा. पु.तांबेकर व प्रा. नेमाडे यांची प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांची माहिती खाली दिली आहे

| | |
|---|---|
| **१] प्रा. म. ना. अदवंत–** | ज्ञानेश्वरी अध्याय १७. (सहकार्याने)<br>ज्ञानेश्वरी अध्याय ६ वा. (सहकार्याने)<br>मुंबई विद्यापीठाचे दादोबा पांडुरंग तर्खडकर पारितोषिक– ' मराठीतील काही कथाकार ' या ग्रंथास. |
| **२] प्रा. धो. ८. पुणतांबेकर–** | १) कलंकरेखा ( कादंबरी )<br>२) हरियाली और कांटे (कादंबरी)<br>३) बचाओ, मुझे डॉक्टरोंसे बचाओं ।<br>( विनोदी एकांकिका संग्रह )<br>४) रेडीमेड कपडे ( विनोदी लेखसंग्रह ) |
| **३] प्रा. द. स. नेमाडे–** | १) स्वाध्यायातून भौतिक शास्त्र ( इ. ९ वी) |

या सर्वांचेच त्याबद्दल अभिनंदन

या वर्षीपासून जळगाव शहरातील पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सर्व कॉलेजमधील प्राध्यापकांची एक टीचर्स असोसिएशन स्थापन झाली आहे. ती सर्व जिल्ह्यातील महाविद्यालयातील प्राध्यापकांची प्रातिनिधिक संस्था असावी असा तऱ्हेचे प्रयत्न सुरू आहेत. प्रा. अदवंत यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. डी. व्ही. पाटील यांच्या कार्यक्षम देखरेखीखाली ही संघटना स्थिरावेल असे वाटते.

## सन्माननीयांच्या भेटी–

(१) श्री. गं. बा. सरदार (२) डॉ. कुमार सप्तर्षी (३) श्री. पु. भा. भावे (४) प्रा. न. का. घारपुरे (५) डॉ. बाबा आढाव (६) श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे (७) श्री. सेतुमाधवराव पगडी (८) श्री. गोदावरीबाई परुळेकर (९) प्राचार्य एम्. एस्.

गोसावी (१०) श्री. विष्णूजी क्षीरसागर (११) प्रा. व्ही. एस्. देशमुख (शहादा) (१२) श्री. एस. एन्. सुब्बाराव (१३) डॉ. विद्याधर पुंडलीक (१४) श्री. गो. बा. लिमये (१५) डॉ. गोरेकर (मुंबई) (१६) प्रा. आर. आर. मधुरे ( डहाणूकर कॉलेज ) (१७) श्री. राम जेठमलानी ( चेअरमन बार कॉन्सिल ) (१८) डॉ. सुधाकर भोसले (प्रा मराठी विभाग पुणे विद्यापीठ) एम्. ए. मराठीसाठी दोन व्याख्याने (१९) प्राचार्य चित्रे ( चाळिसगाव ) (२०) न्यायमूर्ति दाऊद (२१) श्री. राजाभाऊ मंत्री (२२) डॉ. सिंधूताई चौधरी (२३) श्री. एम्. बी. रणसिंग ( मॅनेजर, स्टेट बँक )

वरील सन्माननीय व्यक्तींनी या वर्षी कॉलेजला भेटी दिल्या.

## त्रैवार्षिक इन्स्पेक्शन कमिशन

खालीलप्रमाणे सन्माननीय व्यक्ती दि. ७-२-७४ रोजी त्रैवार्षिक इन्स्पेक्शन कमिशनमधे आल्या होत्या.

१) डॉ. एम्. पी. मंगुडकर ( चेअरमन ) २) डॉ. एच्. के. तोडमल ३) डॉ. व्ही. के. फणसाळकर ४) प्रा. एन्. बी. सप्रे ५) प्रा. बी. जी. जोशी ६) डॉ. बी. बी. लाड ७ ) डॉ. जी. एस. कामत

## संख्याशास्त्रविभाग-

बी. ए. जनरलच्या वर्गासाठी मॅथेमॅटिकल स्टॅटिस्टिक्स या विषयाकरिता कायम संलग्नतेसाठी प्रा. पी. व्ही. पटेल, गणित विभाग प्रमुख, एच्. पी. टी. कॉलेज, नासिक यांनी ता. २४-१-७४ रोजी भेट दिली. तसेच याच दिवशी प्राचार्य गो. हु. महाजन, तळोदा कॉलेज यांनी तृतीय वर्ष स्पेशल भूगोल विषयाच्या कायम संलग्नतेसाठी भेट दिली.

एस. वाय्. बी. एस्सी., संख्याशास्त्र विषयाच्या प्रॅक्टिकल परीक्षा केंद्रासाठी प्रा. डब्ल्यू. एस्. काळे, शिवाजी कॉलेज, अमरावती यांनी १४-१२-७३ रोजी भेट दिली. प्रा. आर. आर. मधुरे, डहाणूकर कॉलेज, मुंबई यांनी एस्. वाय. बी. एस् सी., भूगोल प्रॅक्टिकल परीक्षा केन्द्राकरिता दिनांक ११-२-७४ रोजी भेट दिली.

## आभार -

ह्या अंकाच्या संपादनाच्या कार्यात सर्वच संपादक मंडळाचे सहकार्य व प्राचार्य पोतनीस यांचे सुयोग्य मार्गदर्शन लाभले याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत. विद्यार्थी-वर्गाचेही सहकार्य चांगले लाभले त्याबद्दल आभार.

अंकाच्या छपाईचे काम श्रीकांत मुद्रणालय यांनी उत्तम व सुबक करून दिले. पुण्याचे श्री. जोशी यांनी कव्हर व ब्लॉक्स् छपाई चांगली केली. जाहिरातदारांनी बहुमोल सहकार्य दिले आहे. सर्वांचे आभार.



# अजिंठा

## मराठी विभाग

### शब्द -

आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें ।
शब्दांचींच शस्त्रें यत्नें करूं ॥
शब्दचि आमुच्या जीवाचें जीवन ।
शब्दें वांटूं धन जनलोकां ॥

— तुकाराम

## पा ख रां नो !

– राजा महाजन

पाखरांनो ! जा उडोनी, आकाश तुमची वाट पाहे ।
क्षण वियोगाचे जपावे हेच मज संचीत लाहे ॥

पंख तुमची झेप तुमची जीवनाचे छंद प्यारे
स्वप्नशाखा बहरलेल्या आज तुम्हा वाहताहे ।१।

मंदिरी मूर्ती असावी आजि वाटा दूर जाव्या
प्राक्तनाची ही कहाणी मीच माझी गात आहे ।२।

छेडिले जे सूर तुम्ही पावले डोळा उमटली
भाग्यचिन्हे तीच माझी पापणी रेखीत आहे ।३।

क्षितिज तुमचे विश्वस्पर्शी दशदिशांना लोभ तुमचा
मी गतीचे भस्म ल्यालो अन् स्थितीचा स्तंभ आहे ।४।

सोबतीचा काळ थोडा अन् स्मृतीचा गोफ वेडा
मृगजळाच्या वाळवंटी चांदणे शिंपीत राहे ।५।

ईश्वरी आशीस तुम्हा ईश्वरी आनंद लाभो
स्वप्नि माझ्या रोज तुम्ही चंद्रतारे शोभताहे ।६।

## लेणं

लेखक– रवींद्र माहुरकर
T. Y B. Sc.

कचकन् ब्रेक लावून सुरेन्द्रनं मोटरसायकल थांबविली. नेहमीपेक्षा कमी वेळात आलो असं त्याला उगीचंच वाटलं. अवखळ वाऱ्यामुळं विस्कटलेले केस त्यानं हातानंच दाबल्यासारखे केले. 'राजदूत' स्टॅंडवर लावताना त्यानं चौफेर नजर टाकली. सारा परिसर हिरवागार झाला होता. आठदहा दिवसाच्या पावसानं केवढी किमया केली होती. डोंगर–दऱ्यांच्या हिरव्या चादरीला सूर्यप्रकाशानं सोनेरी काठ लावल्याचं भासत होतं. ठिकठिकाणी पाण्याचे ओहळ खळखळ करीत होते. पशु–पक्षी आनंदानं गात बागडत होते. ग्रीष्माच्या प्रखर तापानं निष्प्रभ झालेली सृष्टी नवचैतन्यानं फुलली होती. नुकतंच स्नान केलेल्या षोडशवर्षीय सुंदर तरुणीप्रमाणं सारी सृष्टी टवटवीत दिसत होती.

अमोल हिरा ज्याप्रमाणे कोंदणात ठेवल्यावर शोभतो तसं डोंगरदऱ्यांच्या हिरव्या कोंदणात जडवलेलं कलेचं अमोल रत्न असलेलं अजिंठ्याचं लेणं शोभत आहे असं त्याला वाटलं. एखाद्या लेखकासारखी आपली कल्पना आहे या विचारानं त्याला हसू आलं. त्याचा चेहरा उजळून निघाला. सुदृढ शरीर आणि सुंदर चेहरा त्याला लाभला होता. त्या मानानं त्यानं आपलं शरीर प्रमाणात राखलं होतं. कसेही कपडे त्याला शोभून दिसत. गोड नि लाघवी बोलण्यानं त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा स्पष्ट पडायचा. त्याचं फक्त हास्यही समोरच्या व्यक्तीचं मन जिंकायला पुरेसं होतं. हाताची घडी करून राजदूतला टेकून तो सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेताना हीरोच वाटत होता. मन उबगलं, कंटाळा आला की तो आपली राजदूत लेण्याकडं पळवीत असे. दोनतीन तास लेण्यात घालवल्यावर तो ताजातवाना होई. आता तो असाच आला होता. परंतु आज त्याला थांबावंसं वाटलं नाही. त्यानं निघायचा विचार केला अन् मोटरसायकल स्टार्ट करून तो बसणार इतक्यात " एक्स्क्यूज मी सर... " असे शब्द त्याच्या कानावर आदळले. त्यानं मागं वळून पाहिलं. आश्चर्यानं त्याचे डोळे विस्फारले. आवाजावरून स्त्री असावी हा त्याचा तर्क खरा होता.

सर्वस्वी अपरिचित असलेली ती स्त्री, नव्हे तरुणी, जवळच उभी होती. गोऱ्या वर्णाची, नितळ कांतीची ती २४-२५ वर्षांची तरुणी भारतीय निश्चित नव्हती. निळ्या रंगाची बेलबॉटम पॅंट तिला शोभून दिसत होती. त्यावरचा फॅशनेबल शर्ट तिचं उमलतं तारुण्य लपवायला असमर्थ होता. चेहरा तर अद्वितीय होता. डोळे सरोवरासारखे शांत

आणि निळे; किंचित् अपरं नाक; गुलाबाच्या पाकळ्याप्रमाणं रसरसलेले ओष्ठद्वय, निमुळती हनुवटी तिचे बॉब केलेले सोनेरी केस दोन्ही खांद्यावर पडत होते. त्यामुळं तिच्या चेहऱ्याला सुंदर पार्श्वभूमी लाभली होती. क्षणार्धात टिपलेल्या या स्त्रीसौंदर्याचं कोडं त्याला अद्याप उलगडलं नव्हतं. त्याचं आश्चर्य कायम होतं. ती अजून तेथेच उभी होती. तिच्या हातातील पर्स लंबकाप्रमाणं हेलकावे खात होती. दोन्ही हात दुमडून छातीजवळ घेऊन ती त्याच्याकडं बघत होती. सुरेननं मानेनंच 'काय ?' असं विचारलं.

हळूहळू पावलं टाकीत ती अधिक जवळ आली. जवळून ती अधिक सुन्दर आहे असं त्याला आढळलं. त्याचा निरुत्साह मावळला. तिनं मोहक हास्य केलं नि विचारलं, 'आर यू गोइंग टू अजिंठा सर ? आय वॉन्ट टू गो देअर फॉर शॉपिंग.' तिच्या चेहऱ्यावर आर्जव आणि डोळ्यात आशा होती आणि स्त्री-हट्ट. त्याला नकार देववला नाही. अजिंठ्याला जायचं नसूनही त्यानं होकारार्थी मान हालविली. आणि हातानंच मागच्या सीटवर बसायला खुणावलं. ती आनंदानं मोहरली. खारीच्या चपलतेनं ती मागे बसली.

ती तरुणी त्याच्या खांद्यावर हात ठेऊन बसली होती. तिच्या नाजुक हाताचा स्पर्श त्याला जाणवत होता. परंतु अशा प्रसंगाची त्याची पहिलीच वेळ नव्हती. कॉलेजजीवनात सुरेननं अनेक उन्मादाचे, प्रसंग अनुभविले होते. सुदृढ शरिराचा वारसा त्याला वडिलांकडून मिळाला होता. सुंदर चेहऱ्याची देणगी आईची होती. आईवडिलांचा एकुलता एक आणि सुखवस्तू घर. कॉलेजचं जीवन त्यानं बेफिकरीनं आणि जीवनाचा आनंद चाखीत घालविलं होतं. कॉलेजात जवळ जवळ सर्वच खेळात भाग घेऊन त्यानं प्राबीण्य मिळविलं होतं. कॉलेजचा हीरो तोच होता. अशा वेळी समवयस्क तरुणींची ओळख आणि मैत्री अपरिहार्य होती. ओळख आणि मैत्रीच काय परंतु चांगल्या मुलींदेखील त्याच्याशी बोलायला धडपडत. कॉलेजतल्या अशा सुंदर तरुणींची मैत्री त्यानं विशिष्ट लक्ष्मणरेषेअलिकडे ठेवली होती. तसं पाहिलं तर त्याचे वडील पुराणमतवादी व आंतरजातीय, आंतरप्रांतीय विवाहांचे विरोधक नव्हते. परंतु त्याला प्रेम-विवाहाच्या यशाबद्दल शंका होती. आईवडिलांनी ठरविलेल्या विवाहापेक्षा प्रेमविवाहामुळं अनंत अडचणी आणि त्रास होतो असं त्याचं मत होतं. शिवाय 'ब्यूटी इज ऑन्ली टु सी नॉट टु टच' यावर त्याचा पूर्ण विश्वास होता. म्हणून आता नोकरी मिळाल्यावरही तो प्रेमाच्या भानगडीपासून दूर होता.

अजिंठा आलं तसं त्यानं मोटारसायकल थांबविली. ती चटकन् खाली उतरली. त्याच्याकडं पाहून पुन्हा तशीच हसली. बोलण्याला सुरवात करण्यापूर्वी हसायची तिची लकब एव्हाना त्यानं ओळखली होती. इकडंतिकडं भिरभिर पाहात तिनं प्रश्न केला. 'व्हेअर इज द मार्केट ? व्हेअर आर द शॉप्स् ?' सुरेननं उत्तर देण्याऐवजी प्रश्न





केला, "व्हॉट् डु यु वॉन्ट ?" "आय वॉन्ट फिल्म". तिनं पर्समधून कॅमेरा काढून दाखवत उत्तर दिलं. त्याला हसू आलं. तसा तिचा चेहरा गोरामोरा झाला. तिला हवी असलेली फिल्म इथे मिळणार नाही हे तिला पटवितांना त्याला वेळ लागला. कारण तिला इंग्लिश इतकं कळत नव्हतं आणि हिन्दी तर समजतच नव्हतं. कामापुरतं इंग्लिश बोलणं तिला जमत होतं. ती फ्रेंच होती. मारथा तिचं नाव आपल्या मित्र-मैत्रिणी-बरोबर ती भारतात आली होती. आज ती अजिंठ्याचं लेणं पहायला आली होती. आणि अचानक फिल्म संपल्याचं लक्षात आल्यावर तिनं सुरेनकडं धाव घेतली होती. ओळख नसताना आपल्या मित्रांना सोडून तिनं आपल्याबरोबर यावं याचं सुरेनला आश्चर्य वाटलं. तिला घेऊन तो परत लेण्याकडे निघाला. रस्त्यावरच एका झाडाखाली एक माणूस आंबे घेऊन बसला होता. सुरेन्द्रच्या मनात विचार आला. त्यानं आंबे-वाल्याजवळ मोटरसायकल थांबविली व आंबे विकत घेतले. कसे खायचे ते दाखवून त्यानं मारथाला आंबे दिले. अमृतासारखे गोड आंबे खाऊन ते दोघे लेण्याकडे निघाले.

लेण्याजवळ मारथाच्या मित्रांची कार होती. परंतु तेथे कोणीच नव्हतं. लांबून हसण्याचा आवाज ऐकू येत होता. सुरेन नको नको म्हणत असताना ती त्याला तिकडं ओढत घेऊन गेली. मारथाची मित्र-मैत्रिणी वर्तुळाकार बसून हसत खिदळत होते. हातात व्हिस्कीचे ग्लास होते. मारथाने त्याची सर्वांशी ओळख करून दिली. दोघांपुढे व्हिस्कीचे ग्लास आले. सुरेननं हसून नकार दिला. तसं तिनंही मान उडवून नकार दिला "लेट अस् सी केव्हज्" ती सुरेनला म्हणाली, "टेल मी अबाउट पेंटिंग्ज. गाईड मी" सुरेननं होकार दर्शवितांच ती उड्या मारत त्याच्याबरोबर लेण्यात आली. तिची सारखी बडबड चालू होती. भारतीय लोक एकाच स्त्रीशी विवाह करतात, आयुष्यात एकाच स्त्रीला पत्नी मानतात, व्हिस्की पीत नाहीत, सर्वांसमोर किस घेत नाहीत याच तिला नवल वाटत होतं. सान्या स्त्रियांना आई-बहिणीप्रमाणे वागवतात याच तिला आश्चर्य वाटत होतं. आणि तिच्या संस्कृतीचा तिरस्कार, दुर्गुण ती स्पष्ट सांगत होती.

लेणं पाहाणाऱ्यांची खूपच गर्दी होती. सुरेन तिला प्रकाशानं न्हाऊन निघालेल्या लेण्याची माहिती सांगू लागला. भगवान बुद्ध भिक्षेचं पात्र हातात घेऊन का भीक मागत आहेत हे तिला कळेना. कारण बुद्ध राजकुमार होते ना ! आता भगवान बुद्ध राजप्रसाद सोडून जात असलेला प्रसंग उजळून निघाला. आपली पत्नी यशोधरा आणि मुलगा राहूल यांच्याकडे पाहात शेवटच्या क्षणी सर्व वैभवाचा त्याग करायला निघालेले बुद्ध 'द मोमेंट हि लेफ्ट पॅलेस' हिज् वाइफ ॲन्ड सन. ही इज् लुकिंग ॲट देम. ही वॉन्ट्स टु लीव्ह ऑल." सुरेन मारथाला सांगत असतांनाच लाइट गेली. सर्व गुहेत अंधार झाला. पुन्हा लाइट आली. बुद्ध राजवाडा सोडत असल्याचा प्रसंग पुन्हा उजळून निघाला आणि दुसऱ्या क्षणी अंधाराचं साम्राज्य आलं. पुन्हा लाइट गेली होती.

या वेळी मात्र लाइन परत आली नाही. क्षणापूर्वी उजळून निघालेला प्रसंग मारथाच्या डोळ्यासमोर तरळत होता. इतर प्रवासी बाहेर जाऊ लागले. सुरेननं मारथाला शोधण्यासाठी हात पुढे केला. तो नेमका तिच्या वक्षस्थळाला लागला. त्या स्पर्शाबरोबर त्याच्या अंगावर रोमांच फुलले. सरसरून काटा आला. काळ्याकुट्ट अंधारात त्याच्या मुद्रेवरचा फेरबदल त्यालाच कळत होता. त्याच्या मनात वासनेचा पशू जागा होऊ लागला. तिला हात धरून जवळ घ्यावं, घट्ट मिठी मारावी, तिच्या रसरसलेल्या ओठांचं दीर्घ चुंबन घ्यावं असं त्याला वाटू लागलं.

' व्हॉट ए ग्रेट मॅन ! ग्रेट आइडिया ! लीव्हिंग हिज पॅलेस. ओन्ली वन् वाइफ ॲन्ड सन् ! ग्रेट ! ऑल इंडियन्स् आर ग्रेट... " मारथा म्हणत होती. मध्येच ती हसली आणि निष्पापपणे तिनं त्याचा हात धरून बाहेर निघावं असं सुचवलं. मारथाच्या हसण्यानं सुरेन एकदम भानावर आला. तिच्या शेवटच्या वाक्यात त्याचा वासनेचा पशू घाबरला. मोहाचा त्याग करणाऱ्या भगवान बुद्धाचं चित्र फ्लॅशलाइटप्रमाणं त्याच्या मनःपटलावर उजळून निघालं. तिचा मोकळेपणा, तिनं टाकलेला विश्वास त्याला आठवला आणि वासनेची जागा सहानुभूती आणि प्रेमानं घेतली. आतापर्यंत न केलेलं घाणेरडं कृत्य केलं नाही यामुळं त्याला संकटातून सुटल्यासारखं वाटलं. आपल्यातली मानवता, भारतीय संस्कृती यांचा साक्षात्कार त्याला झाला होता.

त्यानं तिला कारपर्यंत आणून पोचविलं. त्याला निघायचं होतं कोणत्या शब्दांनी तिचा निरोप घ्यावा ते त्याला कळेना " गुड्बाय मारथा.... माय् सिस्टर. " सुरेन म्हणाला. मारथानं चमकून त्याच्याकडं पाहिलं. आपल्याला सिस्टर म्हटलं याचा तिला आनंद झाला. तिचे डोळे पाणावले. तोपर्यंत सुरेननं राजदूत स्टार्ट केली होती. मारथा त्याच्याजवळ आली आणि पुन्हा तशीच हसली. " सुरेन माय ब्रदर... आय मस्ट गिव्ह यू ॲ गिफ्ट... गुडबाय् " असं म्हणत आपलं पेन तिनं त्याला दिलं. सुरेनला खूपच कांहीतरी मिळाल्यासारखं वाटलं. इतके दिवस न दिसलेलं, अद्भुत, अनमोल, लेणं त्याला गवसलं होतं आणि आपल्या हृदयावर ते लेणं लेऊन तो निघाला.




Gymkhana Managing Committee



Gathering Managing Committee

# बसस्टॉप

– कु. वंदना गगडाणी

बस स्टॉपवर येऊन मी उभी रहाते. बस निघून गेल्याचं लगेच जाणवतं. रोजच्यासारखं आज आल्याबरोबर मैत्रिणचं हास्य वाट्याला येत नाही कारण ती कॉलेजला निघून गेलेली असते. घराबाहेर पडताना आडवी गेलेली मांजर उगीचच आठवते. मीच माझ्यावर रागावते. खरं तर सकाळी उठण्यापासून प्रत्येक गोष्ट वेळेवर झालेली नसते. उशीर होण्याचं कारण हे असतं. मांजरावर तो दोष ढकलणं शहाण्या झालेल्या मनाला पटत नसतं.

भरभर चालत आल्यामुळं वाढलेली श्वास घेण्याची गती आता मंदावते. मी सुद्धा रिकाम्या असलेल्या बाकाच्या टोकाला थंडपणे येऊन बसते. इकडं तिकड नजर भिरभिरायला लागते. हल्लीचा हा बसस्टॉप पूर्वी बसस्टेशन होतं. लहानपणच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व असलेलं ठिकाण हे. कुठं गावाला जाण्याचा, नवीन कपडे घालण्याइतकाच आनंद ! भांड्यातून दूध जसं उतू जावं तसा हा मनात न मावणारा आनंद उड्या मारण्यातून आणि बडबडण्यातून इथं बाहेर पडायचा. बसच्या त्या भल्या मोठ्या शरिरात आपलं शरीर ढकलून यायची घाई व्हायची ! आपण स्वतः बसून माणसांपासुन झाडांना पळताना पाहायची उत्कंठा शिगेला पोचायची ! आता गावाला जायचं असलं म्हणजे नवीन बसस्टेशनवर जावं लागतं. बसही लहानपणात आवडायची तशी आवडत नाही. रोजच्या तिच्या भेटीने तिच्या विषयीचं कुतूहल मारून टाकलंय् मुळी. माणसांच्या गर्दीनं आणि माणसांच्या आवाजाचं शत्रू बनलंय मन. झाडांचं पळणं खोटं आहे हे खरं कळण्यानं प्रवासाचा निम्मा उत्साहच गिळकृत केलाय्. वस्तुस्थिती समजण्याच्या क्षणिक आनंदानं कायमची डोके-दुखी विकत घेतलीय् ! पूर्वी व्हायची तेवढी गर्दी इथं नाही. गडबडीपेक्षा विषण्ण-पणाच भरून राहिला आहे. वातावरण, भूतकाळ झालेल्या तारुण्याकडे डोळे भरून पहाणाऱ्या एखाद्या वृद्धेच्या मनासारखं भासतं भकास, ओकं ओकं ! एकदम जाणवतं, स्टॉप रागारागानं पाहातो आहे सगळ्यांकडं. त्याची अशी परिस्थिती करायला आम्ही माणसच कारणीभूत आहोत ना ! त्याच्या त्या नजरेची भीती वाटते मला डोळ्यांवर चट्कन पापण्यांचा पदर ओढते मी. खाली वळलेले डोळे हातातल्या पुस्तकांवर स्थिर होतात. क्षणभर संताप येतो पुस्तकांचा. दरवर्षी फक्त जाडी वाढते आहे यांची. ज्ञान मिळवून देताहेत ही मला? छे ! ज्ञान नव्हे, पदवी ! माझा संतापही या विचाराबरोबर हसतो. पुस्तकांना मी सावरते. माणसांच्या प्रतिष्ठेच्या गरजातली

एक गरज झालीय् आता ददवं. नाहीतर दुसरं काय ? काही वेळेला आपण का शिकतो आहे तेच कळेनासं होतं. असच शाळेतही व्हायचं. सर जेव्हा आमच्याकडून ' प्रतिज्ञा ' म्हणून घ्यायचे ना, तेव्हा ! वाटायचं, काय मिळत आहे हे म्हणून ? यापेक्षा सरांनी एखाद्या भगतसिंगासारख्या देशभक्ताची गोष्ट सांगावी. तो काल्पनिक फाशीचा दोर, हृया निव्वळ अर्थ घेऊन येणाऱ्या शब्दापेक्षा कितीतरी प्रभावी संस्कार करून जाईल ! प्राणापेक्षा भक्ती–श्रध्देचं मोल किती मोठं आहे ते शिकवून जाईल ! भक्तीविना अशक्त झालेल्या मनाला शक्ती देऊन जाईल ! जे शिक्षण आमच्या मनाचा दुबळेपणा घालवू शकत नाही ते शिक्षण काय कामाचं ?... पण ' प्रतिज्ञा ' म्हणायची, तशीच शिकते आहे...का ? उत्तर काही सापडत नाही. मी अस्वस्थ होते. पुन्हा नजर वर करते. समोरच्या बाकावर हात-पाय पोटाजवळ घेऊन झोपलेल्या मुला– कडे मी पाहाते. त्याच्या शांत झोपेचा हेवा वाटतो. एवढ्या गोंधळात तो झोपू तरी कसा शकला याचं आश्चर्य वाटतं ! कालची अर्धी रात्र झोपेच्या विनवण्या करीत मी घालवलेली असते. शिवाय त्याच्यासारखं बाकाबरोबर शरीरालाही वेडंवाकडं मला करावं लागलेलं नसतं. माझ्याकडे झोप आली असती तर मऊमऊ गादीवर ती सुध्दा अगदी निवांत झोपली असती. तरीही ती आलेली नसते. की तिलाही काही लाच द्यावी लागते ?

तेवढ्यात एक भिकारीण माझ्या गयावया करीत, हात पसरत पुढं येते. तिला भीक दिल्यानं काय काय चांगलं होणार आहे ते पटवून द्यायला लागते. तिच्या आवाजात लाचारी असली तरी नजरेत हक्काचं पाणी असतं. कुठलही व्यंग मला तिच्यात दिसत नाही. अंगावरचे कपडे फारसे फाटके नसतात. तिच्याकडं मी दुर्लक्ष करते. त्यामुळं ती डिवचली गेल्यासारखी होते. आवाजातला दीनवाणेपणाही जातो. त्याची जागा जरब घेते. मांजरीनं उंदराकडे पहावं तशी माझ्या पर्सकडे ती पाहाते. मी घाबरून पर्स घट्ट पकडते. वाटतं, याचनेसाठी पसरलेले हे हात ही पर्स ओढायलाही कमी करायचे नाहीत. सुदैवानं तसं काहीच होत नाही. माझा उध्दार करीत ती पुढं निघून जाते

मी घड्याळाकडे पाहाते. बस यायला अजून अवकाश असतो. इतक्यात हातात दंडुका घेतलेला एक पोलीस येतो. बाकावर झोपलेल्या त्या मुलाच्या पाठीला दंडुक्याने टोचत खेकसतो, " उठ बे ! तेरे सोनेके लिए रखा है क्या ये बेंच सरकारने ? " सवयीप्रमाणं आईच्या हाकेनं जागं व्हावं तसा तो मुलगा उठतो. पाठमोऱ्या झालेल्या पोलिसाच्या दंडुक्याकडं खिन्नपणे पाहातो, खिशात हात घालतो. लगेच उठतो आणि चालायला लागतो. काही मिनिटातच परत येतो. हातात पाव असतो. त्याच्या पायात घोटाळत एक कुत्राही त्याच्या मागोमाग येतो. मुलगा



बाकावर येऊन बसतो. कुत्रा त्याच्या समोर जीभ बाहेर काढून त्याच्या हातातल्या पावाकडे पाहात बसतो. पावाचा एक तुकडा तोडून तो त्या कुत्र्यापुढं भिरकावतो अन् स्वतःही खायला लागतो. पाव संपल्याचं पाहून कुत्रा निघून जातो. कुठल्यातरी गावाची बस येऊन उभी रहाते. धावत त्या बसजवळ तो जातो. ' हमाल, हमाल ' करत ओरडतो. त्याला हमाली मिळते. डोक्यावर दोन सुटकेसेस्, गळ्यात बॅग, हातात पिशवी अशी त्याची स्वारी सामानाच्या मालकामागून निघते. मघाशी त्याच्यामागून येणाऱ्या कुत्र्याची मला विनाकारण आठवण होते. शांत झोपेचं कोडं उलगडतं तो भिकारीण अन् हा मुलगा. दोघांचीही जीवनं उघड्यावरचीच, निराधार. तो स्वतःची हाड झिजवून पोट भरतो आहे आणि ती दुसऱ्याच्या घामाच्या पैशातून पैसे वेचते आहे.

गेलेली भिकारीण पुन्हा घाईघाईनं येताना दिसते. रिकाम्या बाकाकडे पाहून कपाळावर आठी आणते. माझ्याकडे पाहून अन् त्या बाकाकडे बोट दाखवून म्हणते, "हयो, कुठं गेला ?" मी म्हणते, " आताच गेला तो, कुणाचं तरी ओझं डोक्यावर घेऊन. का ? " तिचा राग मावळतो. आठी जाते. म्हणते, " का म्हणजे ? म्हाया ल्योक हाय तो ! " आली तशीच निघून जाते.

मी अगदी गोंधळून गेलेली असते. मनातून ती दोघं जायला तयार नसतात. त्यांना आई-मुलगा मानायला मन तयार नसते. दुसऱ्या गोष्टीत मनाला रमवायचा माझा प्रयत्न निष्फळ ठरतो. काहीही केलं तरी त्या दोघांना ते चिकटून बसू पहातं. माझी बस येते. शरीर सवयीप्रमाणं धावतं. बसमध्ये येऊन मी बसते. मी बसले होते तो बाक रिकामा असतो. मी नीट पहाते... रिकामा नसतो तो. मन तिथंच घोटाळतं उभं असतं. शरीर आणि मन यांची फारकत करणाऱ्या अशा प्रसंगांना मी फार घाबरते. त्यांना टाळायचा माझा नेहमीच यत्न असतो. त्यांचं भांडण मला परिचयाचं असतं. मनानं शरिराला आंधळं म्हणणं... शरिरानं मनाकडं वेड्याकडं पाहावं तसं पाहून हसणं... त्यात दोघांनी मला विसरणं. पण शेवटी मनालाच नमतं घ्यावं लागतं. पांगळ्या झालेल्या मुलानं घरातून पळून जाण्याचं वेड घ्यावं तसंच आहे ह्या मनाचं. आता सुद्धा मला कल्पना आहे तसंच होणार. शरीर बसमधून मनापासून दूर जात आहे. थोड्यावेळानं मन त्याच्यामागं धावा टाकत येणार आहे. शरीर उपकार केल्यासारखं त्याला आपल्यात समावून घेणार आहे !

# माणूस

–अनिल गोविंद राव
तृतीय वर्ष, वाणिज्य

तुम्ही माणसे आहात
मीही एक माणूस आहे.
अगदी माणसाऱ्या जातीचा
मीही एक माणूस आहे.
माझ्या रापलेल्या कातडीखाली
माझे एक मन आहे.
अगदी लोण्यासारखे मऊ आहे.
खरे तर विरघळणे त्याचा धर्म आहे
पण तो ते विसरला आहे.
कित्येकदा ते ठेचाळले आहे...
रक्ताळले आहे..., दुखावले आहे,
आवर्तात सापडले आहे,
भोवऱ्यात गुरफटले आहे.
अशा अनेक आघातांचा थर
त्यावर साठला आहे.
लोण्यासारखे माझे मन,
वज्र झाले आहे.
टक्कर द्यायला उभे,...
ठाकले आहे.
दुबळेपण तर केव्हाच विरले आहे...
अन्यायाला सामोरे जायला धजले आहे...
...अशा अभेद्य कवचाखाली सुरक्षित आहे.
लोक म्हणतात...
पत्थरदिल झाला हा,
...पण अरे, डोकावून पहा जरा...
या पत्थराखाली माझे मन लपले आहे.
अरे, ..जरा जवळ या,
म्हणजे पटेल मनाला मनाची खूण,
मन म्हणाल,...,या पत्थराखाली एक कोमल मन आहे...
कारण—
तुम्हीही माणसे आहात,
मीही एक माणूस आहे
माणसा–माणसातले आपले नाते,
खरोखरच अभेद्य आहे.
खरोखरोखरच अभेद्य आहे.





B. Sc. Ist Class with distinction, March 73


V. S. Sirvaiya


S. B. Patil


H. G Tidke


G. D. Deore


S. B. Namdas


A. G. Rao


J. K. Gurav

Best Students 73–74


V. J. Deshpande
1st in University
P. D. Science Oct. 73

## B. Sc. Ist Class with distinction March, 73


P. G. Patil


S. S. Mahajan


D. H. Jangale


G. S. Shravge


Miss A. M. Karnik


K. C. Patil


N. E. Dhake


A. L. Chaudhari


G. Z. Chaudha

## First Class First in M. J. College University Exam. March 73


P. M. Kelkar
F. Y. B. Sc. A Group


D R. Rao
F. Y. B. Sc. B. group


P. K. Deore
P. D. Arts


S. G. Deshdande
P. D. Com.

S. B. Gajare
P. D. Science


B. N. Shastri
Best Sportsman
73–74


Miss Rashida Master
Ist in Javelin throw
Inter Collegiate Sports



Shridhar Chaudhari
General Secretary
Annual Social
1973

Scretaries



Prakash Hartalkar
Magazine



Prem Kogta
Debating Union



A. H. Norkhede
Geography Assn.



Prin, Potnis distributing Sweets to Remand Home boys on Nehru Jayanti 1973, on behalf of New Maths. Training Class

# प्राध्यापक व विद्यार्थी यांचे संबंध

लेखक–
अरुण सुरजमल झवर
एस्. वाय. बी. कॉम्

विद्या ही गुरूच्या पायाशी बसून संपादन करावयाची असते असे म्हणतात. पूर्वीच्या काळी शिष्य गुरूंच्या निवासस्थानी जाऊन त्यांची सेवा करून अत्यंत विनम्र भावाने ज्ञानोपासना करीत. गुरूंच्या दर्शनाने विद्यार्थी आनंदी होत. त्यांना आनंदी पाहून गुरुजींना समाधान मिळे. विद्यार्थ्यांच्या मनात गुरुजनांविषयी नितांत आदर व प्रेमभावना वसे आणि गुरुजनांनाही आपल्या शिष्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान वाटे. प्राय: सर्व गुरुजन आपल्या आवडत्या शिष्यांसाठी काहीही हातचे राखून न ठेवता विद्यादान करीत. त्याच विद्येत पुढेमागे शिष्याकडून आपला पराभव झाला तर स्वतःस धन्य समजत. विद्यार्थी आणि गुरुजन यांच्याविषयी अशा अनेक उदात्त भावना आपण आजपर्यंत जतन करून ठेवलेल्या आहेत.

शिक्षणाची मूलभूत तत्त्वें ही सर्व काळात सारखीच असतात. परंतु त्यांच्या परिपालनास कालमानानुसार मुरड घालावी लागते. आजच्या काळातील शिक्षणाचा अत्यंत झपाट्याचा प्रसार लक्षात घेता पूर्वीच्या बऱ्याच कल्पनांचा व कार्यपद्धतींचा लोप होणे हे केवळ अपरिहार्य आहे. समाजाच्या या कल्पना आणि श्रद्धा कितीही प्रिय असोत, आज ना उद्या त्यापैकी काही कठोर मनाने सोडून देण्यातच शहाणपणा आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. समाधानाची गोष्ट ही की आपले आजचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालक हे तिन्ही गट मोठे चिकित्सक असूनही समजस आहेत. म्हणूनच लोकसंख्येच्या वाढीबरोबरच शिक्षणाच्या प्रसारातही जरी खूप वाढ झालेली असली तरी शिक्षणाचा दर्जा खाली आलेला नाही ही गोष्ट मोठ्या अभिमानाने सांगण्यासारखी आहे. आज कोठल्याही शाळेमधील, हायस्कूलमधील किंवा कॉलेजमधील सर्वसामान्य (ॲव्हरेज) विद्यार्थी घ्या तो शिस्तप्रिय, आदरशील व बुद्धिमान आहे असे दिसून येईल. दुसरी गोष्ट अशी की जुन्या जमान्यातील विद्यार्थ्यांप्रमाणे हा विद्यार्थी आपल्या शिक्षकांवर खूप विसंबून आहे असे दिसणार नाही. तो स्वतंत्र वृत्तीचा आहे. आपल्या गुरुजींवर तो बाजवीपेक्षा जास्त भार टाकताना दिसत नाही, कारण तो आपल्या विद्वान् गुरुजींच्या अडचणी जाणतो. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत हे अधिक खरे आहे. असा हा विद्यार्थी आपल्या शिक्षकांकडून कमीतकमी वेळात जास्तीत जास्त शिकून घेतो. या हाडामासांच्या गुरू शिवाय या नव्या विद्यार्थ्यांचा आणखी एक गुरू आहे; आणि तो म्हणजे काळ. आजचा काळ हा एक अत्यंत प्रतिभावान् शिक्षक आहे. आजच्या घटकेस

शिक्षणाची इतकी क्षेत्रे उघडलेली आहेत आणि या सर्व क्षेत्रात कमीत कमी वेळात जास्तीत जास्त शिक्षण देण्याची आपल्या शिक्षणतज्ज्ञांनी जी व्यवस्था केली आहे ती लक्षात घेता देशाच्या भावी नागरिकांबद्दल मनांत निराशा निर्माण होण्याची भीती नाही असेच म्हणावे लागेल.

अशा ह्या अत्यंत गतिमान जीवनामध्ये फुरसत ही चीज अत्यंत दुर्मिळ झालेली आहे. शाळेतील मुले गुरुजींच्या संगतीत आपला बराच वेळ घालवितात. हायस्कूलमध्ये हा वेळ बराच कमी होतो. कॉलेजमध्ये तर प्रत्यक्ष शिकविण्याखेरीज प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे संबंध फारच कमी येतात. शिवाय कॉलेजमधील वर्ग हा सामान्यतः दीडदोनशे मुलांमुलींनी भरलेला असल्यामुळे वर्षाच्या शेवटी देखील प्राध्यापकांना आपल्या वर्गातील मुलांची नांवे तर दूर राहोत पण चेहरेही अपरिचित राहणे अगदी शक्य आहे. यांत दोष कोणाचाही नाही; दोष असल्यास तो परिस्थितीचा आहे. दुसरा भाग असा की महाविद्यालयातील विद्यार्थी हे वयाने मोठे म्हणजे तारुण्यावस्थेतील असतात. या वयात मनांत जे विचारांचे काहूर केव्हा केव्हा उठते त्यांचे शमन करण्यास पालकांपेक्षा शिक्षकासच अधिक संधी असते हे कोणीही मान्य करील. तेव्हा या संक्रमणशील वयातच विद्यार्थ्यांना धीर देणारा, जीवनाचा अर्थ साधेपणातून समजावून सांगणारा, थोडक्यात म्हणजे एखादा जाणकार पण निर्भीड मित्र हवा असतो. लहान वयात शिक्षकाच्या सहवासाची जितकी आवश्यकता असते तितकीच, किंबहुना जास्त ती मोठ्या वयात म्हणजे महाविद्यालयीन शिक्षण घेताना असते.

परंतु सद्यःस्थिती अतिशय वेगळी आहे. विद्यार्थी जसजसा वयाने वाढतो तसतसा तो आपल्या गुरुजींच्या सान्निध्यास पारखा होत राहतो. म्हणून खऱ्या प्राध्यापकाचे यश केवळ त्याच्या विद्वत्तेवर अवलंबून नाही. तर हे बुद्धिवादी प्राध्यापक भावनांचा ओलावा कितपत निर्माण करू शकतात, विद्यार्थ्यांमधील ज्ञानलालसा कितपत जागृत करु शकतात, किंबहुना आपल्या अष्टपैलू व्यक्तित्वाचा ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर कितीसा उठवू शकतात त्यावर अवलंबून आहे. प्राध्यापकाला थोडा वेळ पुस्तकातील अभ्यास बाजूला ठेवून विद्यार्थ्यांशी फक्त गप्पा करता आल्या तर एखाद्या मंदबुद्धी मानण्यात आलेल्या विद्यार्थ्याच्या मनात उजेड पडून त्याला अभ्यासाची गोडी लागण्याचा संभव असतो कॉलेजमध्ये साधा प्रश्नही वर्गामध्ये महिनेच्या महिने विचारला जात नाही. तसे करणे शक्यही नसते हे सुद्धा खरे आहे. या बाबतीत युनिव्हर्सिटीने खास निर्माण केलेली सेमिनार्स आणि ट्युटोरियल क्लासेस फार मोठी मदत देऊ शकतील. फक्त त्यांचा उपयोग अधिक कौशल्याने आणि कल्पकतेने व्हायला हवा अशा वर्गामध्ये फक्त ३० - ३५ विद्यार्थ्यांचा मेळावा असतो त्यामुळे प्रश्न विचारण्याची उत्तरे काढण्याची आणि इतर बोलण्या-चालण्याची संधी फार चांगल्या प्रकारे मिळू



शकते. अशा वर्गातच विद्यार्थी व शिक्षक यामधील भिंती निखळून पडतात व त्यांच्या मनाचे कप्पे हळूहळू उघडू लागतात. शिवाय विद्यार्थी व शिक्षक यामधील निकट संबंधातून निर्माण होणाऱ्या चांगल्या गोष्टींच्या फायद्यासाठी 'शिक्षक मार्गदर्शक योजना' ( Teacher Guidance Scheme ) सारखे प्रयोग अवश्य करुन पाहण्यासारखे आहेत.

आणखी एक मुद्दा जाता जाता नमूद करावासा वाटतो. ज्याप्रमाणे विद्यार्थी शिक्षकांकडून खूप शिकू शकतो त्याचप्रमाणे शिक्षकही आपल्या विद्यार्थ्यांकडून काहीना काही शिकू शकतो. प्रश्न फक्त मनोवृत्तीचा आहे. ही देवाण-घेवाण जितकी मोठ्या प्रमाणावर होत जाईल तितका आपला समाज खऱ्या अर्थाने सुशिक्षित होत जाईल. शिक्षक हा आपल्या विद्यार्थ्यांना मित्र, मार्गदर्शक आणि तत्त्वज्ञ ( Friend, guide and philosopher ) वाटावयास हवा. परंतु 'विद्या विनयेन शोभते' असे म्हणतात. तेही आपण लक्षात ठेवावयास हवे. म्हणूनच शिक्षक हा एका अर्थाने आपल्या विद्यार्थ्यांचा विद्यार्थी व्हावयास हवा. इंग्रजीत जॉफ्रे चॉसर नांवाचा एक महान् कवी होवून गेला. समाजातील विद्वान आणि आदर्श शिक्षकाविषयी त्याने लिहिले आहे :

" Gladly would he learn and gladly teach. "

## तुझे गीत

-प्रकाश हरताळकर
टी. वाय्. बी. ए.

साऱ्या दिशा मोकळ्या आहेत
तुझे स्वर घुमविण्यासाठी
सप्तसूरही जुळून आहेत
फक्त...तुझे गीत गाण्यासाठी- !

सुखदुःखाचा हा आपपरभाव
मिटून जाऊ दे या क्षणात
पेटवून घे ती मशाल
अंधाराची सोबत आहे म्हणून-!

दूरवर...कोठवर, तुझ्या
मैफलीत येऊ कसा मी ?
साथीला आहे ही एकतारी
लावीन...तुझे गीत गाण्यासाठी- !

## दव

- दत्तात्रय कोल्हे
एस. वाय. बी. ए.

पहाट फुटते
पक्षी उडती
गवत झुलत
फूल फुलत
फूल फुलतं
तलम साडी थरथरते
पाण्यात घागर डुचमळते
खळकन् पाझरत
आभाळाच्या मनातलं...
ओल ओल ओलसर
निळं निळं निळसर




स्वा न्दे श

सर्व प्रकारचे व आधुनिक पद्धतीचे नंबरचे चष्मे, तसेच उत्तम प्रतीचे गॉगल्स मिळण्याचे खान्देशातील

एकमेव ठिकाण—

ऑप्टिकल कंपनी

खान्देश ऑप्टिकल कंपनी
चष्म्याचे व्यापारी; १०५ नवीपेठ,
(माहिजी बाजार) जळगाव.

प्रो.- जी. आर. देशपांडे

[ एक वेळ आमच्या दुकानास अवश्य भेट द्या ]




## कविवर्य तांबे व ड्रॅमॅटिक् लिरिक्स्

- सौ. कुंदाबाला खांडेकर
ज्यु. एम्. ए.

मी न मनुज का ? काय न मज मन ?
नच विकार का ? लहरि उठति मनि, काय सांगु तुज !

परभावनेचे अविष्करण कवीने मोठ्या सामर्थ्यानिशी वरील ओळीत केले आहे. बहुधा कवीची नैसर्गिक प्रवृत्ती ही आत्मलक्षी असते. स्वतःच्या भावना निरनिराळ्या प्रतिमाद्वारे वा प्रतीकांद्वारे कवी मोठ्या हळुवारपणे व्यक्त करीत असतो. त्या भावनांचे साधर्म्य वाचकांच्या भावभावनांशी असतेच परंतु त्या व्यक्त करण्याची तरलता कवी-जवळ असते. आणि म्हणूनच व्यवहारातील अनुभूतींची जाळी कवी आपल्या काव्यरज्जूंनी अशा आकर्षकपणे गुंफतो की जेणेकरून रसिक त्या जाळ्यात आपणहून खेचला जातो व ह्या भावानंदात समाधिस्थ होतो.

परंतु ह्यापेक्षाही कठीण व्रत कोणते असेल तर ते परमनप्रवेशाचे. केवळ मनात प्रवेश करून भागत नाही तर तेथील भावनांचा झिरझिरीत पडदा मोठ्या नाजूकपणे रसिकाला सादर करावा लागतो आणि ड्रॅमॅटिक् लिरिक्सचे हे प्रमुख अंग होय. कविवर्य तांबे यांना हे बेमालूमपणे साधले. नशिबाने कमकुवत ठरलेल्या एका विधवा स्त्रीच्या मनात शिरून समाजाच्या दुष्ट रूढींमुळे कोंडून गेलेला मनाचा बांध तांबे ह्यांनी मोठ्या कळवळ्याच्या उद्‌गारांनी फोडून काढला आहे. वरील ओळी वाचताच पोलादी समाजाच्या घातक रूढींमुळे कळवळणारी एक विधवा अबला केवढ्या आवेशाने ' मी, माणूस नाही का ? मला मन नाही का ? ' म्हणून विचारते हे लक्षात येते आणि तोच आवेश ' काय सांगु तुज ! ' ह्या उद्गाराच्या वेळी आर्त झाला आहे किंवा

नीरस वेलिस फुले उमलती
खिन्न नभाला तारे भेटति,
रिक्त सरोवरि कमळे फुलती
का मज कथिता हे विधवेला ?

नीरस वेल, उघडे आभाळ किंवा निरर्थक सरोवर सगळ्यांना फुले तारे, कमळांचा दिलासा आहे पण जिचे नशीबच रिते आहे त्या विधवा बाईसमोर कशाला ह्या भरल्या कुंभाच्या गोष्टी ? त्या तिच्या मनाला किती डंख मारतात हे कवी तांबे त्या विधवेच्या मनात शिरून समर्थपणे सांगू शकतात. तांबे ह्यांच्या विधवाविषयक सगळ्या कविता ह्या ड्रॅमॅटिक लिरिक्स होत.

दुसऱ्याच्या अंतःकरणातील भावभावनांचे नाट्य प्रगट करणे हा प्रकार पाश्चात्यांचा मागोवा घेऊन आपल्याकडे आला. ड्रॅमॅटिक लिरिक्सला आपण नाट्यगीते म्हणू लागलो. पाश्चात्य कवी ब्राउनिंग् ह्याने प्रथम नाट्यगीताचे दालन रसिकांना खुले केले. तांबे ह्यांना ब्राउनिंगच्या कवितांनी मोहिनी घातली होती. त्यांनी मोठ्या विदग्धपणे ब्राउनिंग आपल्या अंतःकरणात समाविष्ट करून घेतला आणि परभावनांचे चित्रण करून तो मराठी रसिकांप्रत पोचविला.

चुकलेली, पश्चातापदग्ध परंतु परिस्थितीशी समरस झालेली एक गृहिणी वाटेच्या वाटसराला मोठ्या तळमळीने सांगते:

असावधपणी शद्व गेला कधीं काळीं,
भरल्या ससारात नको फोडू रे किंकाळी–

खरोखर संसारात रमलेली, आपल्या लहानग्याला पायाजवळ धरून पूर्वीच्या चुकीला वाचा न फोडण्याविषयी विनवणारी, सावरलेली स्त्री डोळ्यासमोर उभी राहते आणि तिच्याविषयीच्या सहानुभूतीकडे आपले मन झुकते.

मी टाकितो येथ काळीज हें फूल
वायो ! खुणव तोस, ने वास वाहोनि !

केवळ दुःखाच्या भावना माणसाचे मन अधिक कोमल, ओढाळ बनविते पण वायो ! म्हणून वाऱ्याला संबोधून काळजाच्या फुलाचा सुगंध प्रेयसीपर्यंत वाहून नेण्याचा हा मिष्किल संदेशही रसिकाला खुलविते. हे आल्हादकारक नाट्य रसिकाच्या चेहऱ्यावर नक्कीच स्मितरेषा उमटवते.

करुण भावनांचा किंवा हर्षभरित भावनांचा नाट्यमय अविष्कार तांब्यांच्या अनेक कवितातून होतो. चंद्राच्या गालावरचे डाग पाहून आईचे वात्सल्याने भरलेले ओठ ' माहेरच्या आठवणीत ' दिसतात तर पन्नास वर्षानंतर हरपल्या, दिवंगत झालेल्या मूर्तीची हुबेहूब सावली कोणाच्यातरी डोळ्यासमोर येते, किंवा एखादी पत्नी ग्रीष्मातील उन्हाने तप्त झालेल्या कांताचे पाय धवून वारा घालण्यास मोठ्या प्रेमाने वसत आहे, तर चौघड्याच्या आवाजानेही पोळलेले एखादे हृदय धडधडे होते. अशा विविध भावभावनांचा नाट्यमय अविष्कार त्यांच्या निरनिराळ्या नाट्यगीतातून दिसतो.

ड्रॅमॅटिक लिरिक्सचे प्रधान अंग म्हणजे संवाद. हे संवाद तांबे ह्यांनी त्या त्या भूमिकेला अनुरूप भाषाशैलीने मांडून आपल्या कवितेतील व्यक्ती सजीव केल्या आहेत. त्यांचा जमादार–



मालिक तुम् मैं नौकर कवराणीसाब, सही
पर बंदा हुक्म का हूं, पहरें का काम बुरा !

अशी हिंदी भाषेमध्ये आपल्या कामाची कैफियत मांडत आहे, तर तरुण मन ह्या जगात उपलब्ध असणारे ताट ओढण्यास–

तरुणा, पिसे सोड,
भरले किती गोड,
रे ताट ते ओढ
जे लभ्य लोकीं,

आपल्या मनाला बजावीत आहे. तर त्याच सहृदयाला(!)

तुला न देई मोहरेलाही ! दुव्यास परि पैशाला !
कसा गिऱ्हाइक बाइ फुलांचा ! " पूस तुझ्या जीवाला. "

माळीण मोठ्या अवखळ भाषेत, प्रणयी लज्जेने ' कसा गिऱ्हाइक ' म्हणून म्हणते. येथे तांबे यांचे संवाद–कौशल्य अक्षरशः माळिणीचा मुरका मारते.

ह्याप्रमाणे आज ' फिरुनि कां दारि ' किंवा ' राजकन्या व तिची दासी ' इ. कवितांतून संवाद-कौशल्य डोकावते.

ब्राउनिंगच्या ड्रॅमॅटिक् लिरिक्स्मधून गद्यामध्ये नाट्यछटांची भर पडली तर पद्यामध्ये नाट्यगीतांचे माप भरले.

तांबे ह्यांनी ह्या नाट्यगीतांची मराठी वाङ्मयात भर घातली. १९०२ ते १९०८ ह्या कालखंडात ह्या नाट्यगीतांनी तांबे ह्यांच्या मनाचा संपूर्ण ताबा घेतला आणि ह्यापुढील त्यांच्या सर्व कविता बाह्य रूपाच्या दृष्टीने जवळजवळ याच एका स्वरूपात अवतीर्ण झाल्या.

पुढे गूढगुंजन, भक्तिरसप्रधान काव्याकडे जेव्हा तांबे वळले त्यावेळी ह्या रचना-वैविध्यामुळे ह्या नाट्यगीतांचा क्षय झाला. प्राचीन कवी परकीयांच्या भावभावना व्यक्त करण्यापेक्षा घटना, प्रसंग वर्णनांकडे जास्त लक्ष देत असत तर नवीन संप्रदायातील कवींची प्रवृत्ती आत्मलक्षी व आत्मानुभवावर आधिष्ठित भावना व्यक्त करण्याकडे असते. ह्या दोन्हींचा सुवर्णमध्य तांबे ह्यांनी गाठला व परमनात प्रवेश करून त्यांच्या भावनाही कवी किती समर्थपणे व्यक्त करू शकतो हे त्यांनी ड्रॅमॅटिक लिरिक्स्च्या द्वारे दाखवून दिले.

## ती एक फॅशन आहे !

– भागवत लाला भोई
बी. कॉम. पार्ट–

एक म्हातारा गर्दीमध्ये
भीक मागत फिरत आहे
कटिंग–अभावी केस त्याचे
खूप लांब वाढले आहेत
आणि शहाणं जग म्हणतंय–
" तो एक घाणेरडा भिकारी आहे "

एक तरुण गर्दीमध्ये
लाइन मारत फिरत आहे
विस्कटलेले केस त्याचे
खूप लांब वाढले आहेत
परंतु शहाणं जग म्हणतंय–
" ती एक फॅशन आहे "

शहाण्या अशा जगामध्ये
हेच शहाणपण चालू आहे
नावीन्याच्या नावाखाली
नव्या फॅशन्स निघत आहेत
माझ्यासारखे वेडे म्हणतात–
" ती एक फॅशन आहे "

---

## ' स्वप्ने '

– कु चित्रा भानगावकर
द्वितीय वर्ष, कला

स्वप्नातल्या स्मृतींची
 ही तार छेडताना
कोशातल्या कळीला
 कोशात वेढताना

हितगूज पापण्यांचे
 नेत्रांतुनी जुळावे
हे शिल्प वास्तवाचे
 वास्तूत पूर्ण व्हावे !

हृदयातल्या सुराला
 ही साथ लोचनांची
गीते तशी फुलावी
 बरसात सुस्वरांची

सारीच मुग्ध स्वप्ने
 सत्यात धुंद व्हावी
आसावरी तयांची
 तुझिया सवेच गावी !

---





## मृगजळ

– कु. मीना वि. कुलकर्णी
S. Y. B A.

रुक्मीबाईंनी सुनीताला आपली कहाणी सांगायला सुरुवात केली. वरून एवढी हसरी वाटणारी ही बाई आतून काळजाला घरे पडलेली असावी ह्याचे तिला वाईट वाटले. रुक्मीबाई सांगत होत्या, " अगं सुनीता, ते तुझ्याच गावला नोकरी करतात. घरी फक्त थोडेच पैसे पाठवतात. मला वडिलांची इस्टेट मिळाली म्हणून बरं चाललं नाहीतर काही खरं नव्हतं. चांगला मुलगा म्हणून वडिलांनी माझं ह्यांच्याशी लग्न लावून दिलं पण त्यांचं वागणं ठीक नाही. ... बरं जाऊ दे. माझं आपलं नेहमीचंच. बस हं, तुला कॉफी आणते. " सुनीता खिन्न झाली. तिनं सहज म्हणून जवळ पडलेला अल्बम चाळायला घेतला. त्यातील फोटो पाहून ती सदंच झाली. आपण आता भोवळ येऊन पडणार असं तिला वाटलं. तिनं एकदम विचार बाजूला सारण्याकरता डोळे मिटले, परंतु विचार तिच्या मनात पिंगा घालू लागले.

सुनीता एस्. एस्. सी. ला असताना तिचे वडील कोणातरी बाईबरोबर घरातून निघून गेले. सुनीता धरून पाच भावंडे होती. त्यांचा भार आईवर पडला. आईने मोलमजुरी करून कसेबसे चार घास मिळवले. मधून मधून उपाशी राहून त्यांनी दिवस काढले. नंतर ती प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाली. परंतु पुढील शिक्षणाबद्दल विचार करणे शक्यच नव्हतं. तिनं एका ऑफिसात क्लार्कची नोकरी मिळवली. तिथे ती पाठ–पोट एक होईपर्यंत काम करी. थकून घरी आली म्हणजे शांततेऐवजी तिच्याभोवती धाकट्या भावंडांचा गराडा पडे. आणि मागण्या सुरू होत. " ताई मला पुस्तक, मला वह्या, मला युनिफॉर्म. " ती त्या पूर्ण करू शकत नसे. म्हणून तिने संध्याकाळी शिकवण्या सुरू केल्या. तिचे मन त्रस्त होई. पण एक मन म्हणे, नाही सुनीता तू मोठी आहेस, सर्व जबाबदारी तुझ्यावर आहे. आता दोन्ही भाऊ हाताशी झाले की तू मोकळी होशील. काही दिवस कळ काढ.

काळ संथपणे पावलं टाकीत होता. भावांच्या आधाराची ज्योत मनात तेवत ठेऊन ती दिवस रेटत होती. त्यातच आई कष्टानं आजारी पडली होती. तिचा खर्च ! तिचा जीव सुकतच जाई. तरी तिनं एका भावाला कॉलेजला घातलं पण त्यानं युद्धात उडी घेतली. तो जो युद्धासाठी गेला तो परत आलाच नाही. ते आघात आईला सोसवला नाही. तिनं हाय खाल्ली. मरताना तिनं सुनीताला सांगितलं ' बेटा, माझं आता खरं नाही. तूच आता तुझ्या धाकट्या भावंडांची आई आणि वडील हो. '

ह्याच काळात तिनं दुसऱ्या भावाला कॉलेजला घातलं दोन्ही बहिणी मोठ्या झाल्या होत्या. त्यांची लग्न तिलाच करावी लागणार होती. ह्या सर्व काळजीनं ती खगू लागली. तिचा स्वभाव चिडका, अबोल बनला. आधार तुटलेल्या वेलीप्रमाणं तिचं जीवन जात होतं. पण काही दिवसांनी तिच्या ऑफिसात मकरंद देशपांडे म्हणून एक माणूस बदलून आला. तो अविवाहित होता. त्याचा स्वभाव दिलदार, मनमिळाऊ होता. त्याला आई, वडील, भावंडं कोणीच नव्हतं. तो सुनीताशी आस्थेनं बोले. तिचं खंबीरपणाबद्दल कौतुक करीत असे.

एक दिवस त्यानं सुनीताला मागणी घातली. पण ती संकोचून म्हणाली, ' मी सध्या लग्न करू शकणार नाही. माझ्या बहिणी व भावांची लग्नं करून दिल्याशिवाय मी कर्तव्याच्या पाशातून मोकळी होणार नाही. मला माफ करा.... ' पण तो तिची समजूत घालीत म्हणाला, " मला तर कोणीच नात्याचं नाही. तुमच्यासारखी प्रेमळ पत्नी मला मिळाली तर मी सुखी होईन. कितीही वर्षं मी तुमच्यासाठी थांबेन. "

ह्यामुळं तिला उत्साह आला. नव्या उमेदीनं ती कामं करू लागली. उरलेला वेळ त्याच्या सहवासात घालवू लागली.

काही वर्षं गेल्यावर अनिल–तिचा भाऊ-ग्रॅज्युएट झाला आणि सुदैवानं नोकरीलाही लागला. तिनं त्याला म्हटलं, ' अनिल, आता या दोघींची लग्नं आणि नंतर तुझे चार हात झाले की मी सर्व बंधनातून मुक्त होईन. आता दोघींसाठी खटपट कर. ' पण तो काहीच बोलला नाही. उलट काही महिन्यानंतर त्यानं लग्न केलं व घरातील सामान घेऊन वेगळा राहू लागला. ह्या प्रसंगानं सुनीता अतिशय नाउमेद झाली; पण मकरंदन तिला धीर दिला. आपल्या लग्नासाठी तू आपल्या बहिणींच्या कर्तव्यातून लवकर मोकळी हो म्हणून सांगितलं.

काही दिवसानंतर तिनं कर्ज काढून दोघींची लग्नं करून दिली. कर्ज फिटलं की ती स्वतःच्या लग्नाला मोकळी होती. आता तर सुनीता मकरंदच्या सहवासात आनंदात रहात होती लवकरच ती सौ. मकरंद होण्याची स्वप्नं पहात होती. पण एखादी व्यक्ती जन्माला येते ती केवळ कर्तव्य करूनही निराशा पत्करण्यासाठीच ! त्यातलीच ती एक होती हे तिला लगेच कळलं.

एक दिवस मावशीकडे लग्नाला म्हणून ती गेली असता रुक्मीबाईंशी तिची ओळख झाली. त्यांनी सुनीताला आग्रहानं घरी नेऊन व गप्पांच्या ओघात स्वतःच्या पतीची माहिती सांगितली. ती तर मकरंदशीच मिळतीजुळती होती. आणि आता अल्बममधील फोटो पाहून तर तिची खात्रीच झाली की तो मकरंदच आहे. केवळ मकरंदशी लग्न करण्याच्या इच्छेच्या जोरावरच तिनं सर्व कष्ट उपसले होते. दुःखातही खंबीरपणानं दिवस काढले आणि आता तिनं जे पाहिलं त्यामुळं तिला सर्व जगच आपणाभोवती फिरत आहे असं वाटलं रुक्मीबाईंबद्दल वाईट वाटतानाच स्वतःबद्दलही ती निराश झाली. कारण दोघींना दुःखी करणारी व्यक्ती केवळ मकरंदच होती. दोघींच्याही दृष्टीनं ते केवळ मृगजळ होतं व पुढेही ते रहाणार होतं केवळ मृगजळ !

---





# आई

– दत्तात्रय कोल्हे
S. Y. B. A.

वासरू मेलेलेच जन्मले ! त्याच्या लाल चुटुक देहाचा गोळा जमिनीवर पडला तेव्हा त्यात प्राण नव्हता. त्याचे छोटेसे डोके मानेवर झुकलेले होते. आजूबाजूला उभे असलेल्या लोकांनी माना खाली घातल्या. ज्या शेतकऱ्याची ती गाय होती, त्याच्या बायकोने एक लांब उसासा टाकला, आणि ती म्हणाली, " जशी देवाची इच्छा ! " प्रसूतीच्या वेदना असह्य झाल्याने गाय कण्हत होती. तिचे डोळे विस्फारलेले होते. आपले डोळे तिला जणू काही जमिनीत गाडून घ्यावयाचे होते. मेलेल्या वासराचा पुन्हा पुन्हा वास घेऊन ती जोरजोराने आक्रोश करीत होती. काही वेळाने ती त्याला चाटू लागली. शेतकऱ्याच्या बायकोने आपल्या गाईच्या डोक्यावरून हात फिरविला. तिच्या डोळ्यातून दोन थेंब गाईच्या अंगावर पडले. अखेर तीही एक आईच होती.

वेदना अगदी असह्य झाल्या तेव्हा गाय तेथून उठून जरा दूर जाऊन मान खाली घालून उभी राहिली. तेथे उभे असलेल्या लोकांनी ओढीत ओढीत तिला शेताच्या एका कोपऱ्यात नेले. कुंपणावर मान टाकून अस्वस्थपणे एकसारखी शेपटी आपटीत ती तेथे उभी राहिली

वासराचे पाय धरून ओढीत ओढीत लोक त्याला कुंपणाच्या बाजूला घेऊन गेले. तेथून पुढे दुसऱ्या शेतात, असे ओढीत अखेर टेकडीवर नेऊन तेथून तो मृत देह समुद्रात फेकून देण्यात आला. खालच्या एका मोठ्या शिलाखंडावर तो पडला. परत येताना शेताच्या आजुबाजूची विस्कटलेली कुंपणे वगैरे सारखी करून ते लोक गाईजवळ परत आले. शेतकऱ्याच्या बायकोने गाईला गरम गरम कुगऱ्या आणि गुळ खायला घातला. पण गाईने तोंड फिरविले. म्हणून तिचे तोंड बळजबरीने उघडून लोक तिला खाऊ घालण्याच्या उद्योगाला लागले. थोडे काही गाईच्या पोटात गेले, परंतु बरेचसे तिने मान हलवून हलवून बाहेरच थुंकून टाकले.

दुसरे शेतकरी आपापल्या घरी निघून गेले. पण शेतकऱ्याची बायको वासरू मेल्याचे दुःख करीत, तिथेच उभी राहून परमेश्वराची करुणा भाकू लागली.

बराच वेळपर्यंत गाय बाजूच्या कुंपणावर मान टाकून उभी होती अंतःकरणातील व्यथा अगदी असह्य झाली तेव्हा ती उभ्या असलेल्या जागेवरून एक उडी मारून मागच्या बाजूला वळली आणि तिने आपली मान इकडून तिकडे फिरविली. काही अंतर ती धावूनही गेली. मग ती तेथल्या तेथेच वाटोळी फिरली आणि इकडे तिकडे

पाहात मोठमोठ्याने ओरडू लागली. परंतु तिचे सारे प्रयत्न फुकट गेले. तिला काहीच दिसले नाही. आपले काहीतरी हरवले आहे याची तिला जसजशी अधिकाधिक जाणीव होत गेली तसतशी ती अधिकाधिक उन्मत्त व व्याकुळ झाली. तिचे डोळे भयानक दिसू लागले. मध्येच ती त्या दुःखाने वेड्यासारखी धावू लागे, मग खाली लोळण घेई.

ज्या ठिकाणी तिने काही वेळापूर्वीच प्रसववेदना सहन केल्या होत्या व जेथील कोवळे कोवळे गवत तिच्या भरल्या देहाच्या वजनाने दबले गेले होते ती जागा अखेर तिने शोधून काढलीच. इथेच तिने आपल्या प्राणप्रिय वासराला जन्म दिला होता ! इथल्या जमिनीवर बरीच पावले इकडे तिकडे उमटली होती. लाललाल माती सुद्धा उकरली गेली होती. वासरू जिथे पडले होते तेथे तिने आपले नाक घासले. गवतावर ताजे डागही होते. तिने ते डाग पाहिले आणि मग जमिनीला नाक लावून ज्या ज्या जागेवरून लोकांनी तिचे वासरू ओढीत ओढीत नेले होते त्या जागेचा वास घेत घेत ती कुंपणापर्यंत आली.

तेथे ती बराच वेळ उभी राहिली. पुढच्या रस्त्याचा तिला माग लागला नव्हता. तरीही आपल्या बुद्धीप्रमाणे ती शोध घेत घेत धावत होती; ओरडत होती. ओरडत ओरडत तिने एकदा जोराने कुंपणावर धडक मारली. नागफणी आणि बाभळीच्या काटयांमुळे तिच्या अंगातून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. तरीही तिने पुन्हा प्रयत्न केला... आणि कुंपणात एक फट पडली... छोटासा रस्ता तयार झाला. त्या तुटक्या कुंपणातून पलीकडे जाताना तिच्या डाव्या जांघेत फार मोठी जखम झाली. तरीही वेदना विसरून ती जोराने श्वास घेत पुढे धावू लागली.

धावता धावता मान वर करून ती ओरडत होती. तिचा दुःखी आणि व्याकुळ आवाज क्षणभर सर्वत्र एखाद्या वावटळीसारखा घुमला. दुसऱ्या कुंपणापाशी जाऊन ती थांबली. पुन्हा तिने जोराने धडक दिली. कुंपणात पुन्हा फट पडली; रस्ता मोकळा झाला. तिच्या डोक्यातून रक्त वाहू लागले. डाव्या जांघेतील जखम आणखी चिघळली आणि आजूबाजूची सफेद चामडीही लालीलाल झाली.

मैदानातील रस्त्याने धावता धावता ती एका भीषण कड्यावर येऊन पोचली. तेथून तिला विशाल उफाळत्या सागराचे दर्शन घडले. ती शहारली. शरीरावर रोमांच उभे राहिले. ती थांबली. परंतु आपल्या वासराचा वास घ्यायला, त्याला चाटायला, ती फार अधीर झाली होती. आजूबाजूच्या वातावरणात वास घेण्याचा तिने प्रयत्न केला. परंतु समुद्रावरील वाऱ्या हवेखेरीज



तिच्या नाकात काही शिरले नाही. दुःखाने ती एकादा जोराने हंबरली. खूप जोराने घेतलेल्या श्वासामुळे तिच्या दोन्ही कुशीतील बरगड्या स्पष्ट दिसल्या. या खेपेला बऱ्याच कसोशीने तिने मान पुष्कळच उंचावून पाहिले. तेव्हा खाली शिलाखंडावर पडलेले आपल्या मेलेल्या लेकराचे शरीर तिला दिसले.

....

आणखी काय पाहिजे ? अत्यंत उल्हासित मनाने ती जोराने हंबरली आणि दोन पावले मागे सरली. मग इकडे तिकडे पाहात ती आजुबाजूला फिरली. खालच्या शिलाखंडाकडे जाण्यासाठी ती रस्ता शोधीत होती. भटकून भटकून अखेर ती पुन्हा त्या कड्यावरच आली. तिचे मागचे दोन पाय एकमेकावर घासले गेले. आजूबाजूच्या टेकाडांवर डोके आपटीत ती खाली उतरण्याचा रस्ता शोधू लागली. परंतु एवढ्या उंच टेकाडावर नीट पाय टेकायलाही जागा नव्हती. खाली शंभर फूट खोल तिचे मेलेले वासरू पडले होते.

आपल्या देहाची जराही हालचाल न करता ती बराच वेळ तेथे तशीच उभी राहिली. काही वेळाने ती पुन्हा हंबरली. ओरडून ओरडून जणु ती आपल्या वासराला बोलावीत होती. भरतीने वाढलेले समुद्राचे पाणी आता त्या शिलाखंडावर येऊन वासराच्या चारी बाजूंना पसरले होते. गाईने पुन्हा एक हंबरडा फोडला. समुद्राच्या लाटांनाच जणु ती आव्हान देत होती. प्रत्येक लाटेसरशी वासराचे मृत शरीर आपल्या जागेवरून पुढे पुढे सरकत होते. ते दृश्य पाहून हंबरत-ओरडत, आपली मान प्रयत्न-पूर्वक उंचावीत ती जणु काही समुद्राच्या लाटांना थोपवून धरण्याचा प्रयत्न करीत होती.

एवढ्यात एक मोठी जबरदस्त उंच लाट येऊन शिलाखंडावर आदळली आणि वासराला आपल्या कवेत समावून घेऊन परत फिरली.

–आणि पाठोपाठ एक प्रचंड चीत्कार करून गाईने कड्याच्या टोकावरून खाली उडी टाकली !

# कधीच काही मागितलं नाही.... !

कु. अंजली कुळकर्णी, ज्यू. एम्. ए.

कधीच काही मागितलं नाही रे...
उघड्या आसमंतात एक छोटं घरटं दे...
मिटल्या आभाळाच्या कुशीत सुरवंटाला
फुलायला, एक रेशमी कोष दे... !
साऱ्याच वाटा कुठेतरी जाणाऱ्या... कुठेतरी नेणाऱ्या
साऱ्याच दिशा कुठेतरी मिळणाऱ्या
विझत्या संध्याकाळचे दिवे केव्हातरी काळोखात बुडणार
...मिट्ट अंधाराची काजळ–रेषा मला लेवू दे
कधीच काही मागितलं नाही...
मरण सुद्धा मागितलं असतं...
पण, मला फुलत फुलत जगायचंय...
माझ्या भोवतीच्या रातराणीचा सुगंध पांघरून
गुलाब नाही होता आलं...पण
सुकल्या बकुळीचा सुगंध होऊन जगू दे...
कधीतरी...काहीतरी वाटलं तरी...
सारं कसं पुसट आहे... पाण्याच्या क्षणिक तरंगासारखं
...एक मऊ मोरपीस असंच जपून ठेव तू...
फक्त एवढंच कर...माझ्यासाठी...
वास्तवतेत जगायला विस्मरणाचं दान दे... दान दे.

# नेहमीचेच एक दृश्य

– उषा मुंदडे
T. Y. B. A.
(मराठी स्पेशल)

' काय रे कॅन्टीनला जाऊ या ? '

' आज कोणती गुलछडी आहे रे तिथं !– ' चलशील तर यार, काय चिकन ाहे म्हटलं '– मागच्या बेंचवर बसलेल्या ' अस्मादिकम् शिष्टम् ' ग्रुपच्या गप्पांना कळी फुटत असते आणि प्रो. अदवंत एकदम रोखून पहातात. ( पण त्यांना साधं ागावताही येत नाही. )

मी मुकाट्यानं ऐकू लागतो. सर ' विरहतरंग ' शिकवत असतात. ते सांगत ागतात, ' प्रभाकर ( कथेचा नायक ) म्हणतो, अशी सुंदरी ( इंदू–नायिका ) सुश्रूषा रण्यास असल्यावर कोणाला निरोगी रहाणे आवडेल बरे ?–' मी माझ्या ंगाला हात लावून पाहतो. मला माझं अंग थोडंसं गरम वाटतं. मी कल्पनेच्या ्निल दुनियेत विहार करू लागतो. स्वप्नात मी ऊर्फ स्वरूप बावळे आजारी ड्याचं ढोंग करीत अंथरुणावर पडलो आहे आणि क्षमा शहाणे माझी ेवासुश्रूषा करीत आहे.

– ' डोकं दुखतंय गं क्षमा फारच '–अस्मादिकम्.

' अगबाई, थांबा हं. मी तुम्हाला अमृतांजन लावून देते हं. ' इति शहाणे. ्बाप रे आली का पंचाईत ? माझं ' दिल धडकधडक ' करू लागतं; मला अक्षरशः ोकेच मोजावेसे वाटू लागतात. इतकी पांघरुणं घेऊनही मला थंडी वाजू लागते. माझे ातपाय गार पडतात, अगदी बर्फासारखे !...

' –अरे ओ स्वरूप ! साल्या एवढं काय लक्ष देतोस रे ?' तो साठ्या चिमटा ाढतो, ऐन मोक्यावर. साल, नशिबच फुटकं. क्षमाचा तो नाजुक हात अमृतांजन ावायला माझ्या कपाळापर्यंत आला आणि...

–म्हणजे एवढा वेळ नुसती तंद्रीच होती वाटतं. तेवढ्यात तास संपतो. दवंत सर माझ्याकडे पहात पहात वर्गाबाहेर पडतात ( का मला भास होतो रच जाणे. )

साठे, पाटल्या दत्त्या आणि मी कॅन्टीनला जायला निघतो. खिशातल्या ांनी केव्हाच संप पुकारलेला असतो. सकाळीच पैशाची मसालेदार चटणी झालेली

असते- त्या चटणीची चव आठवत असते. पण मनंच मानत नाही मी त्या मारवाड्याकडून ४० पैसे उसनवार घेतो आणि आमचा मोर्चा कॅन्टीनकडे वळतो.

कॅन्टीनमध्ये जातो; ते रिकामेच असते. कारण १२॥ वाजता मराठीचा तास संपून हिंदीचा सुरू झालेला असतो]( आम्ही दांडी मारून आलो हे सांगू का बर? नाहीतर " भोला शंकर " रागावतील. )

मी ऐटीत ऑर्डर सोडतो, ' चार बटाटेवडा लाव ! ' – ' अहो रावसाहेब, आज महाशिवरात्र आहे. ' माझा थेट ' पचका ' होतो ( म्हणजे महाशिवरात्रीलाही कॉलेज असतच ). हसण्याचा मंजुळ ( ? ) आवाज येतो. ' पचकी ' पचवूनही, घाम पुसत मी पहातो तर अहाहा ! क्षमा शहाणे आणि तिच्या मैत्रिणी इकडेच येत असतात. मी ' सावरून ' बसतो. साठ्या कॉलर ताठ करतो, दत्त्या ' शीळ ' वाजवतो आणि पाटल्या ' कोंबडा ' नीट करतो

आम्ही बटाटा चिप्सची ऑर्डर सोडतो ( आता आपल्या कँटीनला मिळतात म्हणे ) तो कॅन्टीनमधला राम्या मुद्दामच आधी त्या शहाणे कंपनीकडे वळतो. ' चार चहा आण ' सुलभा किनरेचा असाडा आवाज ऐकू येतो. अस्मादिक चिप्सचा नाद सोडून चहाच मागवतात.

खो‌ऽ खो‌ऽ .. हास्याच्या स्फोटानं कॅन्टीनवरचे पत्रे उडतात की काय असं मला वाटतं. तेवढ्यात पोऱ्या चहा आणतो. मला कपानं प्यायची सवय नसते कारण घरी बशीत चहा ओतून पिण्याची ( गावठी ) सवय लागलेली असते. तरी पण मी कप तोंडाशी लावतो. हात थरथरत असल्यानं कपाचा ' कटकट ' आवाज येतो. मी सावरून बसतो आणि फुरकन एक घोट घेतो, जिभेला चटका बसेल अशा अपेक्षेने. पण अहो आश्चर्यम ! चहा थंडगार झालेला असतो. आजूबाजूला पहातो तर मित्र गायब अन समोर शहाणे कंपनी माझ्याकडे रोखून बघत असते मी नजरेला नजर भिडण्यापूर्वीच थोडा चहा माझ्या शुभ्र शर्टवर सांडतो.

' गावंढळच,किनई ! ' एक तान ऐकू येते मी पाण्यानं डाग काढत तिकडं हळूच बघतो. ती सुलभा किनरे बोलत असते. चहा अर्धवटच सोडून मी माझ्याच तंद्रीत जायला निघतो आणि कॅन्टीनवाला ओरडतो अहो बावळे, ( हसू नका, माझं आडनाव आहे. ) आधी पैसे द्या. रुपयाचं बिल आहे ' – ' म्हणजे...त्यांनी पैसे दिले नाही का! '

' नाही, ते म्हणाले बावळे आमचे पैसे भरणार आहे ! '

मी खिशातले ४० पैसे व माझे पेन त्याच्यापुढे ठेवतो आणि त्या कॅन्टीनवाल्याला विनंती करतो, ' एवढं ठेवा, मी आता पैसे आणून देतोच, '

कशीतरी त्याची समजूत घालतो आणि बाहेर पडतो– कुस्ती जिंकल्याच्या आविर्भावात !



# मुलींचे लग्न

– पाटील नरेंद्र काशिनाथ
(द्वितीय वर्ष, वाणिज्य)

आजकाल रॉकेलचे शॉर्टेज, साखरेचे शॉर्टेज, अन्नधान्याचे शॉर्टेज आहे तसेच आजकाल जावयांचेही शॉर्टेजच आहे. कारण पैसा, सोने सर्व परिस्थिती अनुकूल असल्यावर सुध्दा मुलींची लग्ने होत नाहीत. म्हणजेच काय ? जावई मिळणे ही सुध्दा एक दुर्मिळ गोष्ट होऊन बसली आहे. ही जी दुर्मिळता म्हणावी लागते. याला कारण म्हणजे आमच्या जावयांचा भाव. हा भाव कोठवर चढेल याची कल्पनाच येत नाही.

आजच्या परिस्थितीत सर्वच लोक श्रीमंत आहेत असे नाही. कोणत्याही वस्तूचे तीन भाग पडतातच कनिष्ठ, मध्यम आणि उत्तम. तसेच परिस्थितीचे सुद्धा आहेत. अर्थात श्रीमंत लोकांची गोष्ट सोडून द्या. परंतु एक गोष्ट लक्षात असू द्या गरिबापेक्षा श्रीमंतावर जास्त बोजा असतो. त्याला मुलीचे लग्न करणे म्हणजे तर एक पहाडच दिसतो; परंतु वरवर श्रीमंतीचा आव राखून मुलीचे लग्न मोठ्या थाटाने करावे लागते. श्रीमंताची ही दशा तर गरीब व मध्यम वर्गाची विचारूच नका. गरीब बिचारा एक सांज भूक सहन करतो. भूक सहन करून सुद्धा त्याला ही वाढती महागाई परवडत नाही. त्यातून सुद्धा शिल्लक टाकलेला पैसा असतो. आणि त्यात तो मुलीचे लग्न करण्याचे धैर्य ठेवतो पण त्यात त्याला ही जावयांची दुर्मिळता आणि वाढती महागाई कार्य सिद्ध होऊ देत नाहीत.

आज मुलीचे लग्न करणे म्हणजे एव्हरेस्ट शिखर गाठणेच होय. लग्न झाले म्हणजे आपण एव्हरेस्ट शिखर गाठले असे समाधान मुलीच्या वडिलांना लाभते. आज जी हुंड्याची देवाण घेवाण होते ती दोन्ही पक्षांच्या परिस्थितीवर. आज तर हुंडा देण्याचे भाव ठरलेलेच आहेत. त्या भावापेक्षा कमी हुंडा मिळाला तर स्थळ रद्द होते. ते भाव खालीलप्रमाणे––

| पात्रता | सोने | रुपये |
|---|---|---|
| १) शेतकरी | १) १२ ते २० तोळे | २००० |
| २) एस्. एस्. सी. | २) १५ ते २० तोळे | २५०० |
| ३) पदवीधर BSc. Bcom. B. A. | ३) २० ते २५ तोळे | ३००० |

हे झाले पदवीधरापर्यंतचे भाव. परंतु यापुढे ( M. A. M. B. B. S. ) २५ ते ३० तोळे आणि अशा स्थळाबाबत विचारूच नका ! दवाखाना तर सासरे-

बुवाच काढून देतात. दवाखानाच काय वरून हजारोने रुपये मिळतात. का सासरेबुवा जावयाला खरेदी करतात. मुलीच्या लग्नामध्ये मुलीच्या वडिलांचे क काय मानसिक त्रास असतील ते तोच जाणू शकतो. ही परिस्थिती ' शेळी ज जिवानिशी खाणारा म्हणतो वातड कशी ' अशी असते. सासरेबुवाचे काहीही झाले त जावयाचे चोचले संपतच नाहीत.

वर शोधणे म्हणजे एखादी नोकरीच शोधण्यासारखे होऊन बसले आ कारण नोकरीला वशिल्याची जरुरी असते. इथे सुद्धा वर शोधायचा म्हणजे वशिला हवा. वशिला म्हणजे काय ? हे स्थळ रामभाऊंच्या हातात आहे. म्हणजे वशि रामभाऊंकडेच आहे. त्याशिवाय लग्न जमतच नाही.

एकदाचे लग्न ठरले म्हणजे झाले असे आपण मानतो पण लग्न लागेप जावईबुवा अॅंबेसेडर गाडी मागतात ! इतके असून सुद्धा त्याची हाजी हाजी करावी लागते. जसे काही सासरा मुलगी देतो म्हणजे काही जावयाचे उपकार फेडतो. ज काही सासरेबुवांनी मागच्या जन्मी काही पाप केले असेल त्याचे प्रायश्चित आ त्यांना जावयाकडून मिळत आहे.

मुलगी म्हणजे आज पापी समजली जाते. परंतु एक वेळ अशी येईल काय तीच पुण्यवान समजली जाईल ? आज मुलगा वधू बघावयास गेला असता निरनिरा प्रश्न विचारतो आणि मुलगीही उत्तर देते. एक महाभाग एका मुलीला काय प्र विचारतो आणि त्याला उत्तर काय मिळते ?

मुलगा:– तुम्ही दुसऱ्या मजल्यावर येतांना किती पायऱ्या लागल्या ?

मुलगी:– एक ही नाही !

मुलगा:– मग तुम्ही काय उडून आलात वाटते ?

मुलगी:– लागल्या म्हणजे काय ? किती पायऱ्या ' मोजल्या ' म्हणा !

इथेच मुलीने या महाभागाचे अज्ञान उघड केले. असेच काही स्वत अति शहाणे समजणारे असतात.

लग्नामध्ये मुलापेक्षा मुलाच्या वडिलांचा, नातेवाइकांचा आणि भाऊबंदा तर तोरा काय असतो ते सांगावयासच नको. लग्न ठरते वेळी मुलगा म्हणत अस की 'बाबा मला ती नारायणरावांचीच मुलगी पसंत आहे.' वडील म्हणतात, ' परंतु हु कमी मिळेल त्याचे काय ? ' म्हणजे जसे काही मुलगा फक्त लग्न लावण्याचाच माल असतो. पसंती मात्र वडिलांचीच असते.



असेच जर शेवटपर्यंत चालत राहील तर समाज सुधारेल काय ? ज्या समाजात ही प्रथा अवलंबिली जात आहे तो समाज तरी खास सुधारत नाही. वाचकहो, तुमच्यापैकी काहींना बहिणी नसतील त्यांना कदाचित् हे लिखाण आवडणार नाही, खटकेल. परंतु खटकण्याचे मुळीच कारण नाही. घरोघर मातीच्या चुली असतातच. म्हणजे जरी आज आपल्याला बहीण नसेल, तरी पुढे स्वतःला मुलगी नसणार कशावरून ? आणि तसे जर असेल तर मात्र ठीक आहे. आणि तुमच्या विरोधालासुद्धा माझी पूर्ण संमती आहे.

–x–

## दुसऱ्यांना जगविण्यासाठी

– रमेश रोकडे
द्वितीय वर्ष वाणिज्य

फाटक्या अंथरुणात मुले शांतपणे झोपली. दिवसभरच्या श्रमाने बिचारी पारू तान्हेल्याच्या अंगावर एक हात टाकून झोपली होती. बिचारीला आपल्या पांघरुणाचेही भान नव्हते. मुलांच्या पलीकडे कोंडीबा मात्र तळमळतच पडला होता.

त्याला झोप येत नव्हती. सारखा या कुशीवरून त्या कुशीवर तो वळत होता.

काय करावे ? कसे करावे ? हे भाल्याप्रमाणे मनाला टोचीत होते अन् ते विचारे तडफडत होते–भाल्याने टोचलेल्या जिवाणूसारखे.

त्याला काहीच सुचत नव्हते. आज तीन वर्षे झाली. पावसाने पार दडी मारली होती. शेतात पिकत नव्हते. दुष्काळ–सर्वत्र दुष्काळ. महागाईचा राक्षस तर तांडव नृत्य करीत होता. अन् उत्पन्न ! ते तर उतरणीवर पडलेल्या वस्तूप्रमाणे घसरतच जात होते. मात्र खाणारी तोंडे वाढतच होती. त्यात कमतरता नव्हती.

पार ग्रासून टाकलं होत त्याच्या संसाराला या राहूकेतूंनी. शेतात दाणाही पिकला नव्हता. बैलांना खायला गवत देखील उगवले नव्हते. काय खाणार ?

पहिली दोन वर्षे बरी गेली; पण आता ! आता तर महागाईचा वणवाच पेटला होता. गरिबांचे संसार जाळून टाकीत होता. त्याला कुणी विझवत नव्हते. जे बापजमान्यात जे बघितले नव्हते ते आज अडीच रुपये किलो ज्वारी ! अबब ! बाप जमान्यात जे बघितले नव्हते ते आज

वधावे लागत होते. सर्वच वस्तूंचे भाव कडाडले होते. दुष्काळी कामावर त्याला त्याच्या बायकोला मिळून पांचसहा रुपये मिळत होते.

त्यातून कारकून आप्पांची अडत.... उरलेल्यात पाच कच्च्याबच्च्यांची आ त्या दोघांची पोटं भरणे अशक्यच-अशक्यच नव्हे असंभवनीय.

बिचाऱ्याने कर्ज काढली, तगाया काढल्या, उसनवाऱ्या केल्या. पोटाला पुरे म्हणून घरातील भांडी कुंडी विकली. वडिलांनी कमावलेला हा संसार ! तो विकता त्याला रडू कोसळत होते. जीव नकोसा होत होता. पण त्याला पर्यायच नव्हता. ए करूनही पडलेला खड्डा बुजत नव्हता. बिचारा फाटलेल्या आकाशाला को कोठे ठिगळ लावणार ? सारे घर धुतले गेले होते. त्याच्या, पोरांच्या कपड्यांच्या चिंध्या झाल्या होत्या.

गाडग्या मडक्यांच्या फाटक्या तुटक्या संसारातून गरिबी हसत हसत वाकु दाखवीत होती.

राम राम राम, काय हा जमाना आला. पोटचे लेकरू जड झाले. माणू माणसाला ओळखत नाही. काय हा जमाना ! कोणत्या जन्मीचे पाप आपण हे भोग आहोत. ते बघण्यासाठी डोळे उघडे तरी कसे ?

नाही तर पूर्वीचा जमाना ! त्याचे मन नकळत भूतकाळात भराऱ्या मा लागले. त्याचे वडील साधारण शेतकरी. पण माय माउली चांगली पिकत असे. व राजाची कृपा दृष्टी होती. लोक खाऊ पिऊन सुखी, सरळ मनाचे आणि उदार हो एके दिवशी एका गरीब म्हाताऱ्याला त्याचे वडील घरी घेऊन आले अन् तो त दिवसापासून त्यांचा म्हणून राहिला. शेवटपर्यंत; कोणाचा कोण तो पण त्याला उदार आश्रय दिला गेला.

कोंडीबाच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. आज ? आज अगदी त्याच्या विरुद्ध चित्र दिसत होते.

महागाई, दुष्काळ, अन्याय वगैरे दुष्ट घोडे जोडून काळाचा रथ दौडत होता. त्याच्या टापांखाली गरिबांचे संसार तुडविले जात होते.

काय करावे ? यातून सुटकेचा मार्ग कोणता ? अंधारात प्रकाश कोठू येणार ? त्याचे विचारचक्र सारखे चालू होते. विचारे मन विचाराशी टक्क देतच होते.



विचारांच्या या बिनतळाच्या विहिरीत पडलेले मन सतत पडतच होते, ठेचाळत होते, गटांगळ्या खातच होते, खोल खोल जात होते. पण त्याला शेवट नव्हता. ते सतत चालू होते सतत-सतत-

नाही ! नाही ! हे संपलेच पाहिजे. मी ते संपवणार. मी हे संपवणार...

कोंडीबाचे विचारचक्र चालूच होते. यावर उपाय-आत्मनाश ! आत्महत्या ! आत्मत्याग ! कोंडोबा घाबरा झाला. त्याच्या तोंडाला कोरड पडली. अंगाला घाम सुटला. त्याच्या कानाशी हजारो कर्णपिशाच्चे ओरडू लागली ? 'आत्महत्या ' आत्म नाश... ' न्हाय न्हाय मी आत्महत्या करणार न्हाय ' तो स्वतःशीच बडबडला. " माझ्यामधी तेवढी ताकद न्हाय " त्याच्या अंगावर सरसरून काटा उभा राहिला.

पण-पण यातून सुटलेच पाहिजे. या पेटत्या वणव्यातून बाहेर पडलेच पाहिजे. दूर कोठे तरी निघून जायचे. बायका पोरे सोडून दूर दूर... पळून जायचे. झाले, त्याच्या मनाने निश्चय केला उद्याच कुठे तरी निघून जायचे. पुन्हा कधी तोंड दाखवायचे नाही.

दूर दूर पळून जायचे...

त्याला नकळत झोप लागली.

तो उठला तेव्हा चांगलेच ऊन पडले होते. पारू आधीच उठली होती. कामावर जायची तयारी करीत होती. चूळ भरून तो ओट्यावर बसला. शेजारच्या राघोबाने हाकारले, " अरे कोंडीबा चलतू न्हवं ! " " तू व्हय पुढं मी येतूच " त्याने तंद्रीतच उत्तर दिले. राघोबा निघून गेला. कोंडीबालाही निघायचेच होते...

तो आढ्याकडे पाहत बसला. लहानगा कल्या त्याच्याजवळ आला. त्याच्या गळ्यात हात टाकून म्हणाला, ' बापू, जिलेबी आणशील कार ? आज बाजार हाय ' कोंडीबा बोलला नाही. त्याच्याहून थोडा मोठा नाम्या त्याच्या पाठीवर चढून म्हणाला ' बापू मला बुशकोट आण. हा लय फाटला बघ " कोंडी बोलत नव्हता. " मास्तरांचा रवी नवा बुशकोट घालतो. मी म्हटलं मला बी आणणार हाय माझा बापू " कोंडीबाच्या डोळ्यातून पाणी आले. नामू त्याला आणखीच बिलगला, "बापू तू रडू नगं, मी हाफीसर म्हणार हाये, मंग तुला मोटरीत बसवीन बघ "

कोंडीबाला आता सुचत नव्हते. पुन्हा विचाराचे दुष्ट चक्र... नामू त्याला म्हणाला, ' काल मास्तर म्हणत व्हता, की बाप लई चांगला असतो. तो आपल्याला

खाऊ घालतो. तू लई चांगला हाय बापू. मग आणशील ना मला बुशकोट ? ' कोंडीबाला एकदम रडूच कोसळले.

कोंडीबा पुरा कोंडीत सापडला होता. कसा सोडून जाऊ या पिलांना ? पंखही आले नाहीत त्यांना; मी गेल्यावर दारोदार भटकतील बिचारी. 'न्हाई न्हाई, मी जाणार न्हाय. मला रहायचंय्. '

सगळ्यांना मिठीत घेत तो बडबडला, ' न्हाय न्हाय, मी कधीच जाणार न्हाय. तुम्हाला सोडून कुठंच न्हाय, कुठंच न्हाय. "

त्याने डोळे पुसले. उठला. कुदळी फावडे खांद्यावर टाकून बाहेर पडला. त्याला जगायचं होतं— दुसऱ्यांना जगविण्यासाठी.

---

# तिसऱ्या वर्गातून प्रवास

– मोहन प्रभाकर ठोसर

प्रथम वर्ष, वाणिज्य

काशी–यात्रा करणे जसा मनुष्याच्या जीवनातील एक वेगळाच प्रसंग आहे तसेच तिसऱ्या वर्गातून रेल्वे प्रवास करणं मनुष्य जीवनातील एक वेगळाच प्रसंग आहे. ज्या व्यक्तीने रेल्वेच्या तिसऱ्या वर्गातून प्रवास केला नाही अशा व्यक्तीने जीवनातील निरनिराळे अनुभव घेण्याची सुसंधी दवडण्यासारखेच आहे.

तिसऱ्या वर्गाच्या प्रवासाची सुरुवात ही संकटातून होत असते. सर्वांत पहिली अडचण ही की तिकीट मिळविणे. तिकीट खिडकीपाशी शेकडो प्रवाशांची रांग लागलेली असते, लोक तिकीटे मिळवण्यासाठी एकमेकांशी धक्काबुक्की करीत असतात. या अग्निदिव्यातून सुटल्यानंतर गाडीमध्ये डब्यात उभे राहण्यास देखील जागा मिळत नाही. लोकांमध्ये जागेसाठी भारतीय युध्द सुरू होते. डब्यात कोणी शांततेने पडलेला असतो तर कोणी दुसऱ्याला धक्का देत असतो. बोचकी–बाचकी फुटबॉल सारखी फेकली जात असतात.

तिसऱ्या वर्गाच्या डब्यातील सर्व गोष्टी काही औरच असतात. यातील सर्व प्रवासी अजबच असतात. ते बहुधा मध्यम वर्गातील व कनिष्ठ वर्गातील असतात. तरी



पण गरीब आणि श्रीमंत, आस्तिक आणि नास्तिक, शेतकरी आणि कारागीर, साक्षर आणि निरक्षर इत्यादि सर्वांचा जो संगम या ठिकाणी आढळतो तो दुसरीकडे दुर्लभच असतो. खरोखरच ह्या ठिकाणी पूर्ण समाजवादाचे दर्शन होते. तिसऱ्या वर्गाच्या डब्यातून कधी कधी संगीताची मैफल, तर कधी एखाद्या भिकाऱ्याचे करुणार्द्र गीत, तर कधी फेरीवाल्यांचे विचित्र आवाज ऐकावयास मिळतात. ह्या सर्वांच्या सहवासात वेळ अगदी नदीच्या प्रवाहासारखा वाहून जातो.

तिसऱ्या वर्गातील प्रवाशांचा स्वच्छतेशी काही संबंध नसतो. डब्यातच पानाच्या पिचकाऱ्या मारणे, संत्री, केळी यांची सालपटे टाकणे, पाणी सांडणे, विड्यांचा धूर सोडणे आणि मोठमोठ्याने गप्पागोष्टी करणे हे तर प्रवाशांचे तिकिट-सिद्ध अधिकारच आहेत. भांडण मारामारीच्या बाबतीत तर ह्यांची बरोबरी जर्मनांची पलटणसुद्धा करू शकणार नाही.

तिसऱ्या वर्गातील प्रवासी भाषण– स्वातंत्र्याचा पुरेपूर उपभोग घेत असतात. आर्थिक, सामाजिक, धार्मिक, नैतिक विषयावर आणि राजकारणावर मनमोकळेपणाने चर्चा केली जात असते. जनतेचे विचार आणि आचार जाणून घेण्यास तिसऱ्या वर्गाच्या डब्याइतकी सोइस्कर जागा आणखी कोणतीच नसेल. त्यात मानव स्वभावाचे प्राथमिक ज्ञान मिळू शकते. हे ज्ञान बुद्धी सतेज करते आणि हृदयाला विशाल बनवत असते. खरोखरच तिसऱ्या वर्गाच्या डब्यात आपल्याला समानता आणि सहिष्णुता यांचे ज्ञान होते. भारतीय समाजाची एकता मजबूत करण्यासाठी तिसऱ्या वर्गाला महत्त्व द्यावे लागेल.

खरोखर रेल्वेच्या तिसऱ्या वर्गामधून प्रवास म्हणजे विविध आणि विलक्षण अनुभवांची रेलचेल आहे. हा प्रवास म्हणजे मानवाच्या सहनशीलतेची आणि माणुसकीची कसोटीच आहे. भारतीय समाजाचे निरीक्षण करावयाचे झाल्यास मनुष्याने तिसऱ्या वर्गातून अवश्य प्रवास केला पाहिजे.

# खळगा

– प्रकाश उर्फ बापू गिरधर पाटील
व सुभाष श्री. पाटील
तृतीय वर्ष, साहित्य

दीस बुडाला होता. काळोख चांगलाच पडला होता, तरी रामू कामोशी पडक्या सपरात भीतला पाठ टेकून आढ्याकडं पहात होता. काय करावं हेच त्याला उमगत नव्हतं. आज दुसऱ्या दिवशी भी सपरात चुल्हंग पेटलं नव्हतं. त्यानं आपली दोन्ही पोरं आनपाण्यावाचून गोधडीत थोपाट घालून झोपवली होती. पर ती लेकराची जात ! त्यातलं एक मधूनच उठे, बापाकडे आशेने टकटक बघे आणि मुसकाड पसरून केकाटे– "बापा, लय जोरात भूक लागली ! भाकर–भाकर."

तव्हा रामू उठायचा, कुतऱ्ह्यासारखा खेकचायचा. 'जपतू का नाह्य ?' अन् मग पोरं गोधडी थोबाडघावर ओढून पडायचे. पोटाच्या खळग्यामंधी हाताच्या मुठीचा वरोटा करून फिरवायचे.

पोराच्या पायथ्यालगतच रामूची गर्भार बाई भी भुईवरच पसरली व्हती. दोन दीस पोटामंधी अन्नाचा कण न गेल्यामुळं तिला असह्य वेदना होत होत्या. पन तिलं तिला काहीच वाटत नव्हतं. तिला तिच्या पोराच्या खळग्याची खंत लागली होती. पोराच्या दाढा हलविण्यासाठी डबड्यात पिठाचा कण देखील नव्हता. पिठाचं डबडं दोन दिवसापूर्वीच चाटूनपुसून काढलं होतं. शेवटी न राहून रामूची बायको उठली. मग केविलवाणेपणानं म्हणाली– 'काय इचार ?'

बिचारा पहाडासारखा धडधाकट रामू त्यावर काय जबाब देणार ? थोबाडावर मारल्यागत तो पायाला तिढा घालून बसला. आईच्या बोलण्यानं पोरं जराशी सुधीवर आलीत नि किलकिल्या नजरनं बापाकडं बघू लागली. रामला हे पाहवत नाह्य. पण रामू भी करणार तरी काय ?... बाहेर जाऊन कण्हेरीच्या कळ्या कचाकच कतरून खाऊन जीव सोडावा असंही त्याला वाटलं. अन् त्या विचारासरशी तो बाहेर निघाला. तशी गोधडीवर पसरलेली पोरं सुटक्याच्या आशेनं बापाच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहू लागली.

वहाळातील कण्हेरीच्या झाडाजवळ रामू आल्यावर त्यानं सगळं न्याहाळून घेतलं. कोणी आसपास कोणी नाही ह्याची खात्री पटल्यावर तो एका झुडपाच्या बुडाशी वाकला, तोच पाठीमागं पावलं वाजली. रामूनं दचकून मागं पाहिलं. गावातला परशा कोळी उभा दिसला. त्याच्याकडं लक्ष देत परशा म्हणाला–



'काय रामू, काय करतुयास इथं ?'
'जीव देईन'–
'जीव देना काय वाटवर पडलाय ! अरे बांगड्या... बांगड्या भर हातामंदी'
'आरे पर खायला नाही, दोन दिवस झाले चुल्हंग पेटलं न्हाय. पोरं उपाशी पडलीय.'
त्यावर परशा रामूच्या पाठीवर थाप मारत म्हणाला–
'अरं तुला आन पाहिजे न्हं ?'
'व्होय'
'मंगन आज दिस बुडाल्यावर चाल माझ्या बरबर.'
'पर कुटं जायचं ? आन कोण देणार ?'
'कर्मठ्याला बाजार लूटायला जायचं'
'कर्मठ्याला हाय तरी काय आज ?'
'आरं कर्मठगावचा आज बजार आहे कर्मठगावला माझा साडू हाय त्येनंच पहाटे पोरगं धाडलं व्हतं.'
'पन बाजार कोण लूटणार हाईत ?'
'समदं गाव.'
'पर बेपाऱ्यांना ही कुनकुन लागली असल ?'
'बिल्कुल गपचुप इचार ठरलाय.'
'मंगन देवबाप्पाच पावला–पर कायरे परशा इतक्या लांब जायचं म्हंजी कशानं जाणार ?'
'आपलं कामासाठी किती भी लाम असलं तरी चान्हच पडणार'
'मंग मी येतोय तुझ्याबरोबर.'
'दे टाळी...'

त्यावर एकमेकांनी टाळ्या दिल्या. केव्हा निघायचं हे ठरल्यावर रामू पाळसवाडीतील आपल्या पडक्या सपरात परतला. बाप्पानं काहातरी खायले आणलं असलं म्हणून पोरं गोधळीतून उठून बसली. त्यांच्याजवळ जाऊन रामूनं त्यांना थोपटीत म्हटलं. पोरान लय सोसलय. असंच रातभर काडा. रामा काही न बोलता चूपचाप बाहेर पडला. त्यानं पाळसवाडीतील सपराकडे पाहलं. प्रत्येक जण लहान थोबाड करून बसलेला होता. त्या सर्वांना ही बातमी सांगावी असं रामूला वाटलं पण त्याला सांगण्याचं धाडस नव्हतं.

कर्मठ्याला दुपारी बाजार चांगला टेचून भरला होता. बाजार भरला होता तो धान्याचा. बाकी काहीच बाजारात नव्हतं. जो तो बेपाऱ्यांना भरपेट पैसे देऊन धान्य घेत होता. बेपारी भलताच नफा कमवीत होते.

दिवस केव्हा मावळला हे कोणालाच समजलं नाही. त्याच वेळी बेपाऱ्यांच्या तंबूवर घाड पडली. ते खपाट्या पोटाचे भुकेकंगाल लोक होते. जेवढं धान्य हाताला लागलं तेवढं घेऊन ते घर गाठत होते. बिचाऱ्या त्या बेपाऱ्यांचं मात्र ह्या प्रकारामुळं धाबं दणाणलं. कैक बेपारी भरलेली धान्याची पोती ठेऊन घाबरून पळून गेले. ज्यांनी बाजार लुटला त्यांपैकी एकानंही बेपाऱ्याच्या गल्ल्याला हात लावला नाह्य. हात लावला तो फक्त धान्याला– जे धान्य भरमसाट नफ्यानं विकलं जात होतं.

रामू कामोशी मिळालेलं जोंधळं– बाजरी घेऊन पाळसवाडीच्या वाटेला लागला. कोणी आपल्याला पाहात तर नाही हे न्याहाळून तो आडवाटेनं जाऊ लागला. त्या जोंधळ्याकडं टक लावून रामूची बायको पोटात उठलेल्या कळा सहन करत उठली. उंबरठ्यावर आल्याबर पोरांनी आंथरुण सोडून त्याला घेरलं. आता आपला दोन दिवसाचा खळगा भरणार म्हणून पोरं तर नाचू कूदू लागली.

बायकोला जात्याची पाळ झाडतांना पाहून रामू म्हणाला,

‘ अगं तू काय करतीयास ? ’

‘ दळाया पाह्यगं कि नाह्य ’ ?

‘ म्हंजी शान भान मालूम होऊ दे साऱ्या पाळसवाडीला की रामूच्या घरांत जातं घरघरतय म्हणून. ’

‘ मक काय करू म्हणता ? ’

‘ जोंधळ्याच्या भुगऱ्याच घाल. त्याच खाऊनसनी उताणं पडू. ’ त्यावर रामू कामोशाच्या बाईनं चुल्यांड चेटवलं आणि दणादण जाळ घातला. थोड्याच वेळात भुगऱ्या शिजून फाडफाड आवाज करू लागल्या. जेवणवेळ झाली तेव्हा रामूनं म्हटलं ‘ चाल वाड आता. ’ बरं म्हणून ती वाढू लागली. तोच रामू म्हणाला, ‘ अगं दार तरी वढून घे. ’

‘ काम्हून ? ’ त्याच्या बायकोन त्याच्याकडे पाहत म्हटलं.

‘ अगं पर एखादा पाव्हणा आला तर. ’

‘ यय, ना जेवून जाईल ’

‘ अगं पर तो म्हणील रामूच्या हियं चुल्ह पेटली व्हती. ’

नवऱ्याचं बोलणं टाळक्यात आल्यावर तिनं दाराची कडी पक्की लावली.

बचोण्यातून जोंधळ्याच्या भुगऱ्या थाळीत वाढल्यावर रामूच्या बायकोनं स्वतःही वाढून घेतली रामून पहिलाच घास तोंडाजवळ नेला तो दारावर आवाज आला. रामूच्या हातचा घास भी गळून पडला. बाहेरून आवाज आला,

‘ चोरा दार उघड ’

‘ पर तू आल्यं तरी कोन ? काय पाह्यजे ? ’

‘ तुजा बाप ह्यय– बाप ! ’

‘ मक म्हसणटीत कां. ? ’

‘ जमादार आहे मी कर्मठ गावचा, दार उघड. ’



कर्मठ गावचा जमादार आलेला पाहून रामू दचकला. आपला सुगावा त्याला परड्याच्यां साळूनं दिला असावा. हे त्यानं ताडलं. पण आता काय उपयोग ? घराचं दार न उघडता रामू बायकोपोरांना म्हणाला, ‘ घ्यारं आटपून ! अन तुमचं पोट भरलं. म्हंजी माझं भी भरलं ’ तुमच्यासाठी तर यवडं केलं. ’

पण कुणीच घास घेईना. म्हणून रामूनं भुगरीचा घास छोट्या पोराच्या तोंडाजवळ नेला व म्हणाला, ‘ खा माझा राजा. ’ बापाच्या त्या मायेनं पोरगं विरघळलं त्यानं आपलं धाकटं तोंड वासलं– बापाच्या हातातील अन्नासाठी.

दार उपडून जमादार आणि दोन पोलीस आत आले. लाथाबुक्यानी त्यांनी रामूला बडवलं. पोलिसांनी रामूला पकडून नेलं.

मागे राहिला तो जमादार. रामूच्या सपरातील मडक्या-रांजणाची तोंड फोडून टाकल्यावर त्यानं पुराव्यासाठी सापडलेले जोंधळे घेतले आणि तो जाऊ लागला. तशी रामू कामोशाची बायको पुढं झाली. हातातील सगळे शिजवलेलं अन्न तिनं जमादाराच्या थोबाडावर फेकून मारलं आणि म्हटलं.

‘ मेल्या ह्योवी न्हेना. तुह्या मड्यावर ठेवाया. खपाट्या खळग्यानं दिस काढणं ह्यय आमच्या नशिबामंदी. ! ’

पद्याळे व रेडिओ
विशेषत :
विक्री व दुरुस्ती
० अनुभवी, कुशल कारागीर
० त्वरित व गॅरंटीची सर्व्हिस ० अचूक वेळ
० किफायतशीर मोबदला
— हेन्द्री सँडोज, केमी, रिको, सिको घड्याळे
तसेच– सीझनल नॉव्हेल्टीज
० इलेक्ट्रिकल गुड्स, स्टील फर्निचर
गॉगल्स व फाउंटन पेन्ससाठी.
टेलिरॅड रेडिओचे अधिकृत विक्रेते —
नॉव्हेल्टी एम्पोरिअम
१९३, महात्मा गांधी रोड जळगाव (महाराष्ट्र)

## प्रश्न

– भागवत लाला भोई
बी. कॉम्. पार्ट– १

तू दूर असतोस तेव्हा–
तुझी आठवण येत असते
व्याकुळलेल्या मनाने मी
वाट तुझी बघत असते ॥ १ ॥

तू जवळ असतोस तेव्हा–
स्मरण तुझे संपलेले असते
व्याकुळलेले मन माझे
तुला कंटाळलेले असते ॥ २ ॥

तू दूर असतोस तेव्हा–
ओढ तुझी लागलेली असते
तुझ्या अखंड दाहक विरहात
मन माझे जळत असते ॥ ३ ॥

तू जवळ असतोस तेव्हा
ओढ तुझी संपलेली असते
तुझ्या अखंड त्या सहवासात
मन माझे विटलेले असते ॥ ४ ॥

प्रेमाचा हा सारा खेळ
असाच का रे असतो ?
मनात माझ्या नेहेमी
हाच प्रश्न उभा राहतो ॥ ५ ॥



## चित्रपट आणि नीतिमत्ता

– घ. वि. जोशी
S. Y. B. Com A

प्रत्येक राष्ट्राची काही जीवनमूल्ये ठरलेली असतात. विशिष्ट जीवन-पद्धतीच त्या राष्ट्राला अभिप्रेत असते. त्या राष्ट्रांत जो जन-समुदाय राहतो, त्या जन-समुदायाच्या चांगल्या व वाईटाच्या काही कल्पना असतात. आपण अमेरिकेचे उदाहरण घेऊ. अमेरिकेत युवक-युवती अगदी स्वच्छंदपणे कुठल्याही प्रकारची भीड-मुर्वत न बाळगता हिंडत असतात. तेथे कुमारी माता असणे यांत काहीच विशेष असे त्या लोकांना वाटत नाही. परंतु भारतात जर एखादा तरुण मुलगा आणि तरुणी सायंकाळच्या वेळी हातात हात घालून वाटेल तशी भटकू लागली तर ते चालणार नाही. म्हणजेच याचा अर्थ असा की, एखाद्या देशात एक गोष्ट चांगली म्हणून स्वीकारली जात असेल, तर दुसऱ्या देशात त्या गोष्टीकडे आक्षेपार्ह म्हणून बघितले जाईल.

याच दृष्टिकोनातून आपण भारतातील नितिमत्तेच्या कल्पनांचा विचार करू. जेव्हा एखाद्या वेळी अशा नीतिकल्पनांवर समाजकंटकांकडून आघात केला जातो, ती जोपासलेली चांगली नैतिकमूल्ये तुडवण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा त्या समाजातील लोकांना गंभीरपणे या बाबीचा विचार करावा लागतो. कारण त्या समाजाचा सर्वच आधार ती चांगली मूल्ये असतात. आणि जर या गोष्टींचा विचारच त्या समाजातील लोकांनी केला नाही, तर ते राष्ट्र विनाशाच्या खोल गर्तेत जाण्याची शक्यता असते. भारतामध्ये अशा रीतीने सामाजिक नीतिमत्तेचा भयानक ऱ्हास करणारी साधने समाजात सर्रास उघडपणे वापरली जात असताना समाज-धुरीणांनी ती साधने अगर कारणे शोधून काढून ती नष्ट केली पाहिजेत. चित्रपट हे एकमेव साधन आज भारताच्या सामाजिक नीतिमत्तेला कीड लावून ती अगदी नष्ट करण्याचा प्रयत्न करीत आहे.

राष्ट्र कोण घडवते ? आपल्याला असे दिसून येईल की त्या राष्ट्रातील कर्तृत्व-संपन्न, जबर महत्त्वाकांक्षी, तारुण्याने रसरसलेली, स्वाभिमानी अशी युवक मंडळी ही त्या राष्ट्राची संपत्ती असते. ' राष्ट्र कसे आहे? ' असे विचारले तर त्या राष्ट्रातील तरुण कसे आहेत याचाच प्रामुख्याने विचार केला जातो. एक महान कवी म्हणतो, ' मला फक्त तुमच्या देशातील तरुणांच्या ओठावर कोणती गाणी असतात ते सांगा मी तुमच्या देशाचा भविष्यकाळ सांगतो. ' मग जर भारताचा या दृष्टिकोनातून

विचार केला तर भीषण असा अंधःकारच देशाच्या पुढे उभा आहे असे आपल्याला दुर्दैवाने म्हणावे लागेल. भारताचे वर्तमान चित्र आपणा सगळ्यांच्या डोळ्यापुढे आहेच. काय काय दिसते या देशात ?

तरुणांच्या मनात राष्ट्रीय संपत्तीचा नाश करण्याची प्रबळ इच्छा, राष्ट्र विघातक शक्तींचे सरहद्दीवरील भयानक चाळे, समाजकार्याबाबत उदासीनता. सर्वच क्षेत्रात भारत मागेच आहे. अजूनही भारतात एकाच रक्तमांसाच्या बनलेल्या हरिजनांवर अत्याचार केले जातात. संस्कृती, राष्ट्र, चांगले विचार हे या पिढीला जुनाट, बुरसटलेले असे वाटतात. विद्यार्थी-क्षेत्रात सुध्दा कॉपी–प्रकरणे, परीक्षांबद्दल नाराजी सर्रास आढळतात. आजचा विद्यार्थी असंतुष्ट आहे. भ्रष्टाचार, बलात्कार, खून, दंगे, जाळपोळ, बंद, संप, लाचलुचपत, काळाबाजार, वशिलेबाजी व शेकडो दुर्गुण समाजपुरुषात शिरलेले आहेत व त्याचप्रमाणे दिवसानुदिवस वाढतच आहे. राष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या सु-शिक्षण, निवारा, आरोग्य, सकस अन्न इ. प्राथमिक गरजा सुद्धा पूर्ण होत नाहीत. झोपडपट्टीतील लोक हा विचारी लोकांपुढे रात्रंदिवस प्रश्न आहे.

अशा सर्व प्रकारच्या गलिच्छ, घाणेरड्या, मागासलेल्या परिस्थितीमध्ये समाज चित्रपटांचे अनुकरण करतो. चित्रपट हे एक साधन आहे. ते अगदी जेथे एस टी. बस सुद्धा नसेल तेथे पोचले आहे. सपाटपोटांपासून ते नगारपोटांपर्यंत ते पोचले आहे. 'स्वस्तात मस्त ' असे ते आहे परन्तु या साधनाचा उपयोग आजचे चित्रपट- निर्माते घाणेरड्या पद्धतीने करीत आहेत. जनतेच्या विकृत भावना चाळवून जनतेच्या अज्ञानीपणाचा फायदा घेऊन समाजातील घाण, किळसवाणी दृश्ये, विकृत कल्पना पडद्यावर आणतात. या चित्रपटांच्या जाहिराती तर अगदी मंदिरांपासून चित्रपटगृहांपर्यंत पसरलेल्या असतात. नग्न दृश्ये, चुंबनाचे प्रकटपण वगैरे बीभत्सपणा असा रस्त्यारस्त्यावर लावून फुकटात दाखविला जातो. शाळा–कॉलेजेस मध्ये जाणारे विद्यार्थी अगदी थांबून थांबून ही दृश्ये, पोस्टर्स बघतात. त्यामुळे त्यांच्या बोलण्यात अगदी सकाळपासून निजेपर्यंत तेच विषय घोळतात. या चित्रपटातील गाणी तरी निदान चांगली असावी परंतु छे! ती सुद्धा कशी " हम–तुम एक कमरेमे बंद हो " अशी. तसेच " दुनियाको हमने दिया क्या, अरे ! दुनियासे हमने लिया क्या ? " अशी निरर्थक व बाष्कळ असली गाणी लहान मलांच्या तोंडी असतात. या चित्रपटाच्या गाण्यांमध्ये प्रेम, इश्क याशिवाय काहीच नसते. पाश्चात्य चित्रपट–सृष्टीचे अनुकरण हा तर अगदी नव्याने दिसणारा दोष आहे. तोचतोचपणा अतिरंजित वर्णन हे तर नेहमीचेच झालेले आहे.

या चित्रपटांचा आज तरुण मनासमोर आदर्श आहे. राजेश खन्नाने बेल बॉटम वापरली तर लागलीच तीच सगळीकडे प्रचलित झाली. चित्रपटातील दृश्ये बघून दिल्लीला काही विद्यार्थ्यांनी अगदी जशाच्या तसा पाहिलेला दरोडा बँकेवर घातला.



प्रेयसीने नकार दिल्यामुळे आत्महत्या केल्याचे उदाहरण तर नेहमीचेच होऊन बसलेले आहे. चित्रपटातील नायक–नायिकांच्या कपड्यांचे, हावभावांचे, सहीनसही अनुकरण तरुण करतात. चित्रपटांमधून चांगली दृश्ये अगदी क्वचितच दृष्टीस पडतात. हिप्पी–संप्रदाय हा सुद्धा जीवनातील उदासीनतेमुळेच निर्माण झालेला आहे. अनिर्बंध उपभोग व स्वैच्छाचार हेच त्याचे जीवन झालेले आहे. आणि हे चित्रपट–निर्माते काय बोडखं शिकवणार लोकांना ? आज बहुतेक चित्रपट निर्माते केवळ " गल्लाभरू " चित्रपट निर्माण करणे हा हेतु डोळ्यासमोर ठेवून तसे चित्रपट काढतात. हेच आदर्श आजच्या तरुण–पिढीपुढे आहेत. दिवसभर वाटेल तसा वेळ काढायचा, सायंकाळी चौका–चौकांवर उभे राहून आया–बहिणींचे (आपल्याच) धिडवडे काढावयाचे, छातीचे खोके होईपर्यंत धूर सोडायचा व बीभत्स गाणी व अपशब्द वापरावयाचे. तिकडे आई–बाप आपल्या पोटच्या गोळ्यासाठी रात्रंदिवस काबाडकष्ट करणार. पोर इकडे शाळा बुडवून १।। १।। तास चित्रपट गृहांवर रांग लावणार !

अशा या चित्रपटांना काय केले नाही म्हणून सांगू ? हे असे घाणेरडे चित्रपट बघून व बाईट गाणी ऐकून मुले घरात तसेच वागतात. करू नये ते करतात. तरुण व कोवळ्या मनाची, निष्पाप मनाची बालके वाममार्गाला लागतात. त्यामुळे सध्या सगळा समाज आळशी, चैनी, पौरुषत्वहीन असा झालेला आहे. आणि ज्याला कोणाला मनापासून हा समाज चांगलाच रहावा असे वाटत असेल त्यांनी या चित्रपट–सृष्टीला चांगले स्वरूप द्यावे. नाहीपेक्षा जळवांप्रमाणे नीतिमत्तेचे शोषण करणाऱ्या यांचा कायमचा बंदोबस्त करावा.

---



# अपना टेलर्स

महात्मा ज्योतिबा फुले मार्केट,
दुकान नं. ९७, जळगाव.

★

स्पेशालिस्ट- शर्टस्

पँटस्

सूटस्

एकवेळ अवश्य भेट द्या.

# विनंती

**–कु. मंगल धर्माधिकारी**
T. Y. B. A.

खूप रस्ता चालायचा आहे
आता मला अडवू नको.

तुझ्या रस्त्याला येऊ दिले नाहीस
माझा रस्ता अडवू नको.

तू रडू नकोस
मलाही रडवू नको

मला आता हसायचे नाही
व्यर्थ प्रयत्न करू नको.

मला माझ्यातच बुडायचे आहे
तूं किनारा होऊ नको

खूप रस्ता अजून आहे
आता मला अडवू नको.


आदर्श सेवा, सचोटी व योग्य भाव

**वृंदा बुक डेपो ☐ वृंदा लायब्ररी**

**पंजाब नॅशनल बँकेसमोर, महात्मा गांधी रोड, जळगाव**

प्राथमिक माध्यमिक, महाविद्यालयीन पुस्तके व धार्मिक ग्रंथ व शालेय स्टेशनरी

एस्. एस्. सी, प्री डिग्री, एफ वाय, एस्. वाय्., टी. वाय्., आर्टस् व कॉमर्ससाठी अनेक लेखक, नवीन आवृत्त्या, विविध प्रकार

एस. वाय. बी. ए. ( इंग्लिश ) व डि. फार्म परीक्षांच्या उपयुक्त नोट्स्
लेखक– शब्बीरभाई

तसेच
ग्रीटिंग कार्डस, व्हिजिटिंग कार्डस् व आकर्षक लग्नपत्रिका






# स त्सं ग

**– ले. रामदास वाळजी ऊर्फ तात्या सिंगनूरकर, मु. जे. कॉलेज कार्यालय**

माणसाचा स्वभाव हा त्याच्या सोबत्यांच्या गुणावर उमटतो. **" संग जया जैसा, लाभ तया तैसा "** ॥

जशी सोबत असेल तसा त्याच्या बुद्धीचा विकास अगर ऱ्हास होत जातो. दुष्कर्मी व सुकर्मी या व्यक्तींपैकी सुकर्मी माणसात आत्मपरीक्षण करण्याची प्रवृत्ती दिसून येते.

" A man is known by the company he keeps. "

विद्यार्थी दशेत मित्र उत्तम निवडावा. **वाईट मित्रांच्या संगतीने सोन्या-सारखे जीवन मातीमोल होते.**

" समानशीलव्यसनेषु सख्यम् "

सज्जनांना सद्गुणी माणसांचा सहवास व दुर्जनांना दुर्गुणी माणसांचा सहवास आवडतो. थोर माणसांनी ज्या मार्गाचे अनुसरण केले तोच सन्मार्ग समजून आपणही त्याचे अनुसरण केले पाहिजे.

" सुसंगति सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो " ।

या ओळीत तरी काय सांगितले आहे ? दुर्जनांच्या सहवासाचा तिटकारा दर्शविला असून सद्बोधामृताची अपेक्षा केली आहे.

दुर्जनांच्या सहवासाने मती कशी भ्रष्ट होते याची अनेक उदाहरणे इतिहासात व पुराणात सापडतात. सत्संगाचे महत्त्व किती आहे याची साक्ष आपणास दैनंदिन व्यवहारात सुद्धा पटते.

" दुर्जनः प्रियवादी च नैतद्विश्वासकारणम् "

दुर्जन जरी गोड बोलणारा असला तरी त्यावर विश्वास ठेवू नये. **दुर्गुणी माणसांचा स्वभाव बदलणें अशक्य असते.** त्यांच्या संगतीने आपला मानसिक विकास खुंटतो. सात्विकांच्या सहवासात सुविचार सुचतात व नैतिक गुणांचा विकास होतो. वाइटाचे अनुकरण आपण लवकर करतो. पण सात्विक मार्गाचा आपण सहजा–

सहजी अवलंब करीत नाही. जगात दुर्जनांची संख्याच जास्त असते. व्यवहारात प्र गोष्टीचा प्रत्यही अनुभव येतो.

प्रत्येक माणसाला बुद्धीबरोबर भावना असतेच असे मानसशास्त्र म्हणते. **शुद्ध व सात्विक भावना ही सत्संगानेच प्राप्त होते.**

अंत:करणातील दोषांचे प्राबल्य हळूहळू कमी करुन त्यांचे उन्मूलन करण्या जे अनेक उपाय आहेत त्यापैकी सत्संग हा एक आहे. सात्विक बुद्धीमुळे दोषांचे पार हलके करण्याची साहजिकच प्रवृत्ति असते. ती नीट ओळखून आपण आपणा तोलण्यास शिकले पाहिजे.

सत्संगापासून होणारे सुख व आनंद यांचा अनुभव जसजसा येत जाई तसतसी त्यास दुर्जनांच्या संगाबद्दल किळस व तिटकारा उत्पन्न व्हावा हे साहजिक आहे. **अमृताची गोडी चाखल्यानंतर पाणी कोणास गोड लागेल ?**

**सत्संगामुळे उत्पन्न होणारा शुद्ध व श्रेष्ठ आनंद हा वेगळा व कुसंगा-मुळे उत्पन्न होणारी नीच व हलकी आनंदवृत्ति ही निराळी.** अफमुळे येणा तरतरी ही खरी तरतरी नसून त्यामुळे शरीरास थकवा येतो व ते अधिक निर्बल होते.

" ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला, कुसंगे नाडला साधु तैसा "।

यातील गर्भितार्थ व बोधामृत अमोल आहे. कारण दुष्टांची सोबत नाशका आहे हे सांगितले आहे.

दुष्ट माणसांच्या सोबतीत गुरफटल्यामुळे सदैव अविचार सुचतात. सद्विचारां लोप होतो.

स्वतःचे मत बरोबर असो किंवा चूक असो दुसऱ्यावर अन्याय न हो देण्याइतकी सत्संग असलेल्या मनुष्याची बुद्धि जागृत असते.

तसेच **प्रत्येक बाबतीत चांगले पाहण्याची सत्संगी माणसा वृत्ति असते.** असा मनुष्य विचारवंत असल्यामुळे अपमान मनाला लाऊन घेत नाही तो सोशिक, क्षमाशील व धीरगंभीर असतो, कारण त्याला तत्त्वज्ञान समजते.



# मी सासुरवाडीला जातो

- शैलेश जोशी
टी. वाय्. बी. ए.
(मराठी स्पेशल)

तसं पहायला गेलं तर मी काही नवविवाहित नव्हतो. अगदी मुरलेला होतो. स्पष्ट सांगायचं म्हणजे माझा ' त्रिकोण ' कधीच पूर्ण होऊन मी ' चौकोन तयार केला होता आणि आता पंचकोनाच्या तयारीस लागलो होतो. इतकं होतं तरी आमच्या सासरेबुवांना आम्हाला दिवाळीच्या सणाला बोलविण्याची कशी काय बुध्दी सुचली ते देव जाणे ! पण अगदी आग्रह करुन त्यांनी मला आणि माझ्या सौ. ला मुलाबाळांसह दिवाळीच्या सणाला येण्याबद्दल लिहिलं होतं. त्यामुळं जाणं भागच होतं. मी चांगली पंधरा दिवसांची सुटी काढली आणि सौ. ला तयारी करण्यास सांगितलं.

ठरल्याप्रमाणे मी, सौ. आणि आमच्या दोघांची चिल्लीपिल्ली अवि, रवि, प्रवीण आणि छोटी नंदू ! (तिचं खरं नांव नंदिनी. पण तिला आम्ही लाडानं हाक मारतो नंदू ! ) उन्हाच्या आत जावं म्हणून आम्ही सकाळी लवकर निघायचं ठरविलं. पण सौ. च्या तयारीला आणि नट्टापट्टा करायलाच वेळ लागल्यानं गाडी चुकली. दुसऱ्या गाडीनं शेवटी आम्ही निघालो. बस स्टॅंडवर जाऊन पहातो तो ही ऽऽ गर्दी तिकीट मिळणं अशक्य ! शेवटी गाडी लागताच गेलो बसून गाडीत मी मुलांना घेऊन आणि सौ. ला रांगेत उभं केलं तिकीट काढायला. गाडी फुल्लऽऽ भरली. सौ. ला तिकीट काही मिळालं नाही. मोठ्या हौसेनं सिनेमाला जावं पण बाहेरच लावलेली ' हाउस फुल ' ची पाटी पहाताच जसं नाराज होऊन घरी परत यावं तसा सौ. चा चेहरा फोटो काढण्यासारखा झाला. पण मला काहीच विशेष वाटलं नाही. कारण सवय झाली आहे ना !

शेवटी सौ. कडून मी पैसे घेऊन खिशात कोंबले आणि सौ. ला गाडीत येण्यास सांगितलं. एक मोठा बाक मी आमच्या फॅमिलीसाठी रिझर्व्ह करुन ठेवला होता. सौ. तिच्या साड्यांची बास्केट घेऊन माझ्या शेजारीच बसली. पण छोट्या नंदूला मात्र दिलं माझ्या मांडीवर. कारण गर्दीत तिच्या साड्या खराब होत होत्या ना !

कोंबून कोंबून एकदाची बस सुटली ! मी नंदूला घेऊन समोर बसलेल्या एका चवळीच्या शेंगेकडे नजर चुकवून पहात होतो. पण त्यातच सौ. ची वेगळी तऱ्हा. अगदी एखाद्या नववधूसारखी ती वागत होती. माझ्या खांद्याला खांदा लावायची,

लटकेच हसायची ! पण मला मात्र तिचा राग येत होता. त्याच त्या पणात काय अर्थ काहीतरी नवीन पाहिजे. समोर बसलेल्या ' शेंगेच्या ' सौंदर्यानं म्हणा किंवा तिन मधून मधून माझ्याकडे टाकलेल्या मदिराक्षी– नयन– कटाक्षानं म्हणा– पण मी जवळच मगळं काही विसरलो हे मात्र खरं.

बराच वेळ झाला कंडक्टरसाहेब गाडीत तिकिटांचा हिशेब करीत येरझारा घालीत होते. पण त्यांचा हिशेब पूर्ण होत नव्हता. शेवटी त्यांनी अगदी जंगलातच घंटा वाजवली आणि गाडी थांबली. गाडी थांबताच त्यांनी जोरानं ओरडून विचारलं, " तिकिटं घ्यायचं राहिलं आहे का कुणी ? "

पण कुणीच बोलत नाही असं पाहून ते तिकिटं तपासू लागले. झालं; गाडी थांबलेली, हवेचा पत्ता नाही; अंगातून घामाच्या धारा निघसाहेत. हिवाळा असला तरी गरम होतच होतं. शेवटी मी चिडलो आणि म्हणालो,

" कंडक्टर साहेब, लवकर आटपा. आम्हाला वेळ होतोय. पुढच्या गाड्या सापडल्या पाहिजेत की. ज्यांच्याजवळ तिकीट नसेल त्यांना उतरवा खुशाल खाली अन् सुरू करा. खुशाल विदाउट तिकिटानं गाडीत बसतात ! "

" अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं. हाकला त्यांना गाडीच्या खाली अन् करा सुरू गाडी. " इतर प्रवाशांनी मला पाठिंबा दिला. सहाजिकच मला अभिमान वाटला. मी ताठ मानेनं समोरच्या ' शेंगे ' कडे पाहिलं. तिच्या चेहऱ्यावर मात्र मला काहीच आढळलं नाही. काही का असे ना, तेव्हढाच भाव मारायला मिळाला, पुरे झालं. मी सौ. कडे पाहिलं. तोंडाचा आऽऽऽआऽऽ करून सौ. माझ्या खांद्यावर मान टाकून अगदी इंद्रपुरीच्या एखाद्या राजकुमाराबरोबर विहार करतेय की काय असं मला वाटलं.

कंडक्टर साहेब माझ्याजवळ आले. पण का कुणास ठाऊक त्यांनी मला तिकीटच मागितलं नाही. ते तसेच पुढे गेलेले पाहून मी पुन्हा एकदा अभिमानानं समोरच्या गुलछडीकडे पाहिलं. सगळी गाडी चेक झाली. पण विनातिकिटानं प्रवास करणाऱ्याचा मात्र तपास लागला नाही. बिचाऱ्या कंडक्टरची ती केविलवाणी अवस्था पाहून मला बाबूराव अर्नाळकरांच्या कादंबरीची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. खून होऊन सुद्धा खुनी सापडत नाही; अगदी तस्संच झालं हे. (अर्नाळकरांचं साहित्य मी जरी वाचत नसलो तरी सौ. ला मात्र त्याची फार आवड ! त्यामुळे अर्नाळकरांच्या कथा अशा असतात असं सौ. च्या सांगण्यावरून मला समजलं ! )

पुन्हा एकदा कंडक्टर गरजला. मी सुद्धा चिडलो. प्रवाशांनी मला साथ दिली आणि कंडक्टरनं डबलबेल मारली. गाडी सुरू झाली. पण अहो आश्चर्यम् !



कंडक्टरसाहेब माझ्याजवळ तिकीट मागत होते. मी रुबाबानं कोटाच्या खिशात हात घातला. परत काढून पँटच्या खिशात घातला. पुन्हा काढून पँटच्या मागच्या खिशात शेवटी कोटाचे सगळे खिसे चाफलून माझा हात ठिकाणावर आला. मी सौ. ला हाक मारली. इंद्रलोकांतून आपल्याला मृत्युलोकांत कुणीतरी ओढून आणीत आहे असं तिला वाटलं. तिनं हळूच ' ऊँहूं ' करीत डोळे उघडले. आणि काय ? तिनं पटकन् माझ्या गळ्यातच हात टाकला. शेवटी तिनं टाकलेला हात काढून तिचे दोन्ही खांदे गदगदा हलवत मी विचारलं,

" अगं, तिकीट दे ना ! कंडक्टरसाहेब तिकीट मागताहेत ? "

माझ्या या बोलण्यानं ती खडबडून उठली आणि तिनं चट्कन् आपल्या पोलक्यात हात घातला. पोलक्यात बराच वेळ हात फिरवल्यावर तिनं शेवटी हात रिकामाच काढला. बास्केटमधील पर्स उघडली आणि तिकिटं पाहू लागली. पण आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ? सौ. माझ्याकडे पहात म्हणाली, " अहो, माझ्याजवळ नाहीत. तुमच्याच जवळ तर मी दिलीत ! "

" छे, छे ! माझ्याजवळ नाहीत. " मी घोगडं झटकलं.

पण अवीनं दिलेल्या साक्षीनं मात्र सारंच बिंग फुटलं.

" पप्पा, मम्मीनं तिकिटंच काढली नाहीत. पैसे तुम्हाला परत दिले आहेत ना ! " मी चमकलो. खिशात हात घातला. तिकिटाचे पैसे तसेच होते. मी कंडक्टरच्या हातात दिले. माझा चेहरा पाहण्यासारखा झाला. प्रोफेसर अॅबसेंट माइंडेड असतात हे मला पटलं. गाडीतील परिस्थिती बदलली होती माझ्याकडून बोलणारे आता संतापले होते. कंडक्टरचं तोंड सुटलं होतं. मी गप्पपणे सहन करीत होतो. तरीही मी समोर पाहिलं. ती गुलछडी तोंडाला रुमाल लाऊन हसत होती. पुन्हा गाव येईपर्यंत मी तिच्याकडे चुकून सुद्धा पाहिलं नाही.

झालं; एकदाचं गाव आलं. मुलांनी आपापली बॅग उचलली. मी छोट्या नंदूला सौ. जवळ देऊ लागलो. तोच प्रवीण तोंडाला हात लावून जोरानं हसत म्हणाला,

" पप्पा, नंदूनं शी केली. "

मी एकदम् दचकलो. माझ्या नव्या टेरिलीनच्या पँटवर आमच्या कन्यारत्नानं सुंदर नक्षी काढली होती.

त्या दिवसापासून मी कानाला खडा लावला, सहकुटुंब सहपरिवार सासुरवाडीला जायचं नाही. पण काय आश्चर्य ! त्या वेळेपासून सासू-सासरे आणि सगळीच सासरची मंडळी सणावाराला माझ्याकडे येऊ लागली.

—×—

*With Best Compliments From:-*

## विजय

बुकडेपो, विद्यार्थी वाचनालय

ज ळ गा व.

आकर्षक लग्नपत्रिका

## पॅराडाइज

रेडिओ सर्व्हिस, साउंड सर्व्हिस

१२५, नवी पेठ, कॉटन मार्केट, जळगाव

आमचेकडे लाउडस्पीकर भाड्याने मिळेल.
शोभिवंत लाइटिंग आणि–
इले. मोटार रिवाइंडिंग करून मिळेल.

– प्रो. रोटे



# खरं–खोटं

– विजय सुरवाडे
टी. वाय. बी. ए. (इकॉ.)

संजीव आणि राजेश, दोघेही जिवलग मित्र. एकाच वर्गात कॉलेजमध्ये शिकणारे. केव्हाही पहा दोघे बरोबरच ! सूर्य आणि त्याची किरणे कधी कोणी वेग–वेगळी पाहिली आहेत का ? दोघांचे एकमेकावाचून पान हलत नसे. वास्तविक दोघात जमीन अस्मानाचा फरक. राजेश श्रीमंत तर संजीव गरीब. राजेशजवळ काय नव्हते ? सर्व काही होते. मोटार होती, बंगला होता, संपत्ती होती. दिसायला संजीवपेक्षा उजळच होता. तर संजीवजवळ काय होते ? ना मोटार, ना बंगला. मात्र त्याच्याजवळ दुसरं पुष्कळ काही चांगलं होतं. तो एक चांगला वक्ता होता. कॉलेजचा प्रत्येक कार्यक्रम त्याच्या भाषणाशिवाय होत नव्हता. वक्तृत्व–स्पर्धेची त्याने अनेक बक्षिसे पटकावली होती. तो एक चांगल्या प्रकारचा लेखकही होता. कॉलेजने, उत्कृष्ट कथा लिहिल्याबद्दल त्याचा सत्कारही केला होता. आणि असा फरक असून देखील दोघेही मित्र होते; जिवलग.

राजेश आणि संजीव ज्या वर्गात शिकत होते त्याच वर्गात दीपा नावाची अतिशय श्रीमंत व्यापाऱ्याची मुलगी शिकत होती. दीपा खूप सुंदर होती. त्या संपूर्ण वर्गात तिच्यासारखी सुंदर मुलगी नव्हती. आणि तिचे प्रेम होते संजीववर. त्याचे वक्तृत्व, त्याचे लिखाण, हसरा चेहरा आणि आकर्षक व्यक्तिमत्त्व या सर्वांकडे ती आकर्षिली गेली. तिने त्याच्याशी मैत्री केली होती; आणि त्या मैत्रीचे रूपान्तर आता प्रेमात झाले होते. साहजिकच संजीवचे देखील तिच्यावर जिवापाड प्रेम होते. दोघंही एकमेकाचे चाहते होते.

परंतु सध्या आठदहा दिवसापासून संजीवचा मित्र राजेश याचे वागणे दीपाला खटकत होते. नेहमी जेव्हा संजीव व दीपा एकत्र येत तेव्हा तो आपोआप तेथून निघून जात असे परंतु आता तो तसे करीत नसे. उलट संजीव व दीपाच्या जास्तीत जास्त सान्निध्यात येण्याचा प्रयत्न करीत असे. तो तिच्याशी बोलण्याचा शक्य तेवढा जास्त प्रयत्न करीत असे. मध्येच तिच्याकडे पहात असे, हसत असे परंतु ती या गोष्टीकडे दुर्लक्ष करीत होती.

"––नेहमीप्रमाणे आज संजीव कॉलेजमध्ये आला नव्हता. दीपा बेचैन होती राजेश जास्तच खुशीत दिसत होता. दीपाला राहवलं नाही तिनं राजेशला संजीव का आला नाही म्हणून विचारलं. राजेशनं काहीतरी खोटं सांगितलं, आणि दीपाला

म्हणाला, दीपा, आज तू जरा उदासच दिसते आहेस; बरं वाटत नाही का ? चल, जवळच्या हॉटेलात जाऊन चहा तरी घेऊ आणि मग घरी जाऊ. दीपा त्याच्याबरोबर हॉटेलात जायला निघाली ते म्हणजे राजेशनं सांगितलं म्हणून नव्हे तर तिचं दुखणारं डोकं थोडं शांत व्हावं म्हणून.

दीपा आणि राजेश हॉटेलात फॅमिली रूममध्ये बसली. राजेशने वेटरला ऑर्डर दिली आणि दीपाला म्हणाला, ' दीपा, मी कधीची तुला एक गोष्ट सांगणार होतो, पण कसं सांगावं, कुठून सुरुवात करावी हेच कळत नव्हतं. '

' सांग ना काय सांगायचंय ते '

' दीपा कसं सांगू ? कुठून सुरुवात करू, माझं तुझ्यावर प्रेम जडलंय दीपा ! '

' काय ? प्रेम जडलय माझ्यावर ? '

' हो, दीपा प्रेम आहे माझं तुझ्यावर. अगदी खरं, असं म्हणून त्यानं वहीतून एक छोटं गुलाबी रंगाचं पाकीट काढलं आणि तिला देत म्हणाला ' हे घे, वाच. मी लिहिलेलं लव्ह-लेटर आहे हे. मी तुला तोंडी सांगू शकत नाही. तू हे वाच म्हणजे तुला तुझ्यावरची माझी प्रीती कळेल, दीपाने ते त्याच्या हातून हिसकावून दूर भिरकावून देत म्हणाली, तुझं लव्ह-लेटर तुझ्याचपाशी राहू दे आणि याच्या.पुढे असला चावटपणा केलास तर याद राख. संजीवचा जिवलग मित्र ना तू ? असा पाठीत सुरा खुपसतोस होय त्याच्या ? '

' संजीव ! संजीव ! ! संजीव ! ! ! काय संजीव नावाचा जप लावला आहेस एवढा ? नावाचाच फक्त तो संजीव आहे बाकी निर्जीव ! काय आहे त्या भिकारड्या संजीवजवळ ? काय देणार तुला तो ? जरा नीट बघ माझ्याकडे, काय नाही माझ्याजवळ ? मोटार आहे, बंगला, पैसा आहे सर्व आहे माझ्याजवळ. तुला जे लागेल ते देऊ शकेन मी तुला, फक्त माझी हो दीपा ! समोर हिरा असताना तुझं लक्ष कोळशाकडे कसं गेलं दीपा ? "

' तू प्रेम पैशानं घेऊ पाहतोस काय ? ' जगात सगळ्या गोष्टी पैशानं मिळू शकतात, पण संजीवसारखं खरं प्रेम कितीही किंमत मोजायला तयार असलं तरी मिळणार नाही. आणि प्रेम म्हणजे काय एक पक्षी समजलास तू ? की, जे एका झाडावरून दुसऱ्या झाडावर सहज आनंदानं उडू शकेल ? बसू शकेल ? मी संजीवची आहे, त्याची मी पूजा केली आहे. '

' पूजा तू करू नकोस असं मी तुला कुठे म्हटलं ? पूजा कृष्णाची केलीस काय आणि रामाची केलीस काय ? दोन्ही पूजाच होत. मग त्याच्याऐवजी माझी कर ना. देवासारखा प्रसन्न होऊन काही कमी पडू देणार नाही बघ. '



' ते कदापीही शक्य होणार नाही. संजीव तुला जिवलग मित्र मानतो, चांगला समजतो. त्याला जर हे समजलं की, ज्याला देवमाणूस समजलो तो राक्षस निघाला तर तो काय करील माहीत आहे तुला ? ' चल निघ इथून. नाहीतर मीच निघते ' असे म्हणून ती दरवाजाकडे जायला निघाली. त्या अगोदरच राजेश दरवाजात उभा राहून तिची वाट अडवायला लागला.

दीपा म्हणाली, ' जर तू आतां रस्ता सोडणार नसशील तर मी इथे जोरानं ओरडेन आणि तुझी सगळी शोभा होईल. '

पुन्हा राजेशने तिचा हात धरून तिला अडविण्याचा प्रयत्न केला. दीपाचा राग अनावर झाला तिने रागाच्या भरातच टेबलावरची डिश जोरात उचलली आणि त्याला ती मारण्यासाठी हात उंच नेला. तेवढ्यात खाड्कन दरवाजाचा आवाज आला आणि संजीव आत आला. त्याने दीपाचा हात वरच्यावर पकडला. तिनं समोर नीट पाहिले. संजीव होता तो. दीपा संजीवला म्हणाली, ' संजीव, तू याला वाचवण्याचा प्रयत्न करतोस ?

' दीपा शांत हो. मीच सांगितलं होतं याला हे नाटक करायला. '

' काय ? हे नाटक होतं ! आणि तू सांगितलंस ? '

' हो दीपा, मीच सांगितलं होत या राजेशला असं नाटक करायला. खरं-खोटं पाहण्यासाठी. तुझं माझ्यावरचं प्रेम खरं आहे की नाही हे पाहण्यासाठी दीपा. म्हटलं या सुंदर, सुशील आणि श्रीमंत मुलीचं माझ्यावर खरं प्रेम असेल काय ? ज्याला दुरून आपण चमकणारा तारा समजतो आहो ती साधी गारगोटी तर नसावी ना ? माझ्या मनात शंका होती दीपा की, श्रीमंत आणि गरीब यांचं प्रेम खरं असू शकेल काय ? ऐश्वर्य आणि दारिद्र्य एका ठिकाणी सुखानं नांदू शकतील काय ? पण दीपा तू जिंकलीस मी हरलो. तू माझीच आहेस. आजच्यासारखा आनंद मला कधीच झाला नाही. तू माझी म्हणजे माझं जीवन आहेस.

आज दोघंही खुष होते. संजीव राजेशकडे वळून त्याचे आभार मानणार, त्याच्या अगोदरच राजेश इतर मित्रात निघूनही गेला होता.

## तुझ्यासाठी

– पाटील अे. डी.
एस्. वाय्. बी. कॉम, (ए.)

फुले आहेत तुझ्यासाठी
काटे मात्र घेईन मी ।
सुंदर वाट तुझ्यासाठी
आड मार्गाने येईन मी ।
प्रकाश सारा तुझ्यासाठी
अंधारातही चालेन मी ।
सागर सारा तुझ्यासाठी
फक्तकिनारा होईन मी ।
मोती सारे तुझ्याचसाठी
फक्त शिपले उचलीन मी ।
चंद्र सारा तुझ्यासाठी
कलंक त्याचा घेईन मी ।
अमृत सारे तुझ्यासाठी
वीष सुखाने घेईन मी ।



संजय वॉच कंपनी
सर्व प्रकारच्या नवीन घड्याळांच्या–
खरेदीसाठी तसेच दुरुस्तीसाठी
विश्वसनीय—
संजय रेडिओ ट्रेडर्स
मर्फी रेडिओ व ट्रॉन्झिस्टर विक्रेते.



तसेच– इलेक्ट्रिक सामान आणि
रेडिओ स्पेअर पार्टस्साठी—
प्रो. वाणी बंधू
१०२, पोलन पेठ, दाणाबाजार, जळगाव.
एकवेळ अवश्य भेट द्या !



# भिडस्तपणा आणि मी

– श्यामकांत कुळकर्णी
एस्. वाय्. बी. कॉम्.

भिडस्तपणाची सरळसोट व्याख्या करावयाची म्हणजे मानवी स्वभावाचा असा एक नमुना की ज्यामुळे आपल्याला नुकसान विकत घ्यावे लागते. सद्‌गुणांची यादी करतांना प्रथम भूतदया, परोपकार, सृजनशीलता वगैरे लांबलचक यादीत भिडस्तपणाचे शेवटचे स्थान, कारण नामशेष सद्‌गुण असून त्याचे स्थान अढळ होत चालले आहे.

आन्तर-महाविद्यालयीन टेनिस सामन्यांनी पहिल्या टर्मचा गोड शेवट झाला. अनुभवी अशा शाम देशपांडे व मोहन कुळकर्णी या जोडीने आपल्या कौशल्यपूर्ण

खेळाने अंतिम सामन्यात भुसावळ कॉलेज संघाचा सरळ डावांनी पराभव केला
श्री. आप्पासाहेब व्यवहारे व श्री. आबासाहेब देशपांडे यांनी संघाला उत्कृष्ट
मार्गदर्शन केले.

दिवाळीच्या सुट्टीमध्ये क्रिकेटचे सामने धुळयाला झाले. मागील वर्षांचे सर्व नाणावलेले खेळाडू यंदा अन्यत्र गेल्याने, नवीन खेळाडूंनी सातत्याने सराव करून सुरुवातीचे ... उपान्त्य सामन्यात आपल्याच माजी विद्यार्थ्यांनी समृद्ध असलेल्या लॉ कॉलिजशी गाठ पडल्याने निभाव न लागून पराभव पत्करावा लागला व मागील वर्षी मिळविलेले विजेतेपद गमवावे लागले.

हॉकी संघाचा नियमित सराव दिवाळीच्या सुट्टीत श्री. भावसार बंधू व श्री. परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली होत होता. संघबलही चांगले होते त्यामुळे हा संघ विजय टिकवील अशी आशा निर्माण झालेली होती. परंतु धुळे येथे काही विचित्र परिस्थिती निर्माण झाल्याने संघावर दडपण पडून पूर्ण सामना न खेळताच आपल्या संघाला परत येण्याचे दुर्भाग्य पत्करावे लागले. याचा वचपा पुढील वर्षी उत्तम ... करून व खिलाडू वृत्तीनेच आपला संघ निश्चितपणे काढील अशी खात्री वाटते.

विद्यार्थिनींचा खो-खो संघ सरावाच्या अभावी न पाठविण्याचा निर्णय घ्यावा लागला. विद्यार्थ्यांच्या संघामध्ये पूर्वी असलेला जोम यंदा पुन्हा दिसू लागला ... सतत सरावाकरिता श्री. नवगाळे, नांदोडे व मागील वर्षाचे विद्यार्थी प्रतिनिधी श्री. मनसुटे हे रोज मैदानावर मार्गदर्शन करू लागले. अंतिम सामना बहाराचा झाला परंतु धुळयाच्या सायन्स संघाकडून अगदी थोडया गुणांनी आपल्या संघाला पराभव पत्करावा लागला.

एकंदरीत सांघिक खेळांमध्ये आपल्या महाविद्यालयाला पाच विजेतेपदे ४ उपविजेतेपदे प्राप्त झाली हे नमूद करण्यास अभिमान वाटतो.

कुस्ती, वजन उचलणे व मैदानी स्पर्धा यामध्ये फारशी प्रगती आढळली नाही. कु. रशीदा मास्टर हिला भाला फेकीत प्रथम क्रमांक लागला, तर उंच उडीत व लांब उडीत ती तिसरी आली. कु. रेखा महाजन हिला थाळीफेकीत ... क्रमांक आला. श्री. लक्ष्मण पाटील यांना उंच उडीत दुसरा क्रमांक तर कु. उषा मुंदडे यांना १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत दुसरा क्रमांक मिळाला. ४×१०० मीटर ... शर्यतीत आपल्या कॉलेजच्या दोन्ही संघाना तिसरा क्रमांक मिळाला. श्री. बी. आर. ... यांनी वैयक्तिक स्पर्धेतील विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केले.



जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात कॉलेजचे ॲन्युअल स्पोर्टस् घेण्यात आले. श्री. दीपक आठवले व श्री. प्रचंड पी. जे. यांना ॲन्युअल स्पोर्टस् चॅम्पिअनशिप मिळाली.

जिमखान्याच्या सर्व वर्षाच्या कारभारात गोरजाबाई जिमखाना, मारवाडी व्यायामशाळा या संस्थांनी व डी. एस्. पी. साहेब, श्री. गुलाबराव मास्टर, श्री. आबासाहेब देशपांडे व श्री. आप्पासाहेब व्यवहारे आणि सर्वश्री सिताराम बाहेती, नवगाळे, नांदोडे, मनसुटे, शिंदे, भावसार बंधू, परांजपे, जय सावंत यांनी जे अमोल सहकार्य केले त्याबद्दल आम्ही फार ऋणी आहोत. जिमखान्याचा अवाढव्य पसारा सावरण्याकरिता प्राचार्य पोतनीस, उपप्राचार्य थत्ते व अदवंत यांनी वैयक्तिक लक्ष घालून मदत केल्याबद्दल व इतर प्राध्यापक, खेळाडूंनी व सर्व जिमखाना सेक्रेटरींनी व विद्यार्थ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल सर्वांना धन्यवाद.

| प्रदीप मंत्री | प्रा. पु. ग. अभ्यंकर | एल्. टी. देशमुख |
|---|---|---|
| जनरल सेक्रेटरी | अध्यक्ष, सल्लागार समिती | जिमखाना प्रमुख |

## आंतरविभागीय संघात निवड झालेले खेळाडू

| अ. नं | खेळाचे नाव | खेळाडूचे नाव |
|---|---|---|
| १) | बुध्दिबळ | १) श्री. लेले पी. पी. २) श्री. सतीश कुलकर्णी |
| २) | टेबल-टेनिस | १) कु. रशिदा मास्टर, कु. योगिनी भावे, कु. हेमा गोखले व श्री. प्रेम कोगटा |
| ३) | बॅडमिंटन | कु. चिलेकर पी. पी., श्री. शाम देशपांडे |
| ४) | फुटबॉल | सर्वश्री नंदू सावंत, शेख एस्. एल्., बिलवाल, शिंदे आर. ए., अजित पाटील. |
| ५) | कबड्डी | कु. विजया जाधव, कु. सुनंदा खडके, कु. दहाड. |
| ६) | क्रिकेट | श्री. शास्त्री बी. एच्. एम्., श्री. शाम देशपांडे, श्री. मोहन कुलकर्णी, |
| ७) | टेनिस | श्री. दीपक आठवले. |
| ८) | बास्केट बॉल | श्री. आर. डी. पाटील, श्री. मिलवाणी, कु. चिलेकर पी. पी. |
| ९) | खो खो | श्री. आपटे, कु. विजया जोशी, श्री. शरद पाटील |
| १०) | भाला फेक | कु. रशिदा मास्टर |
| ११) | थाळी फेक | कु. रेखा महाजन |
| १२) | उंच उडी | श्री. लक्ष्मण पाटील |
| १३) | १०० मी. धावणे | कु. उषा मुंदडे |

जिमखान्यातील या वर्षाची विशेष पारितोषिके-

बेस्ट स्पोर्टस्मन् – श्री. शास्त्री बी. एन्. एस्.

ॲन्युअल स्पोर्टस् चॅपिअनशिप– १) श्री. प्रचंड पी. जे.
२) श्री. दीपक आठवले.

# पी. टी. [ शा. शि. ] विभाग

पी. टी. फक्त प्री-डिग्रीसाठीच होती. प्री-डिग्रीचे बरेच विद्यार्थी व विद्यार्थिनी पी. टी. साठी होते. कॉमर्स विभाग सकाळी भरत असल्यामुळे कॉमर्स विद्यार्थ्यांची पी. टी. सकाळी ६-५० वाजता होती. आर्टस्च्या विद्यार्थ्यांची पी. टी. दुपारी ३-१५ वाजता आणि सायन्स विभागाची पी. टी. संध्याकाळी ४-१५ वाजता होत होती. अशा रीतीने पी. टी. चे तास आठवड्यातून दोन वेळा सकाळी व दुपारी होत होते. दि. ११ ऑगस्टपासून पी. टी. चे तास रोज होत होते. दि. १५ ऑगस्ट १९७३ रोजी विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पी. टी. चे सुंदर प्रात्यक्षिक करून दाखविले. या वर्षी पी. टी. साठी एकूण ४७० विद्यार्थी व १०९ विद्यार्थिनी होत्या. या वर्षी पुढील प्रमाणे पी. टी. लीडर्स होते. हेड पी. टी. लीडर म्हणून श्री. मिलवाणी व पी. टी. लीडर म्हणून सर्वश्री मनसुटे, काळे, गांधी आणि कु. सुनंदा व कु. ललिता चौधरी व कु. लखोटे यांनी कामे केली.

पी. टी. कार्य करीत असताना मला उप-प्राचार्य अदवंत व वत्ते, उप-क्रीडा-प्रमुख श्री. जे. आर. पाटील व पी. टी. लीडर्स यांनी सहकार्य केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

एल. टी. देशमुख
क्रीडा प्रमुख





Inter-Collegiate Football Winners

Sportsmen Selected for Jalgaon Group



P. T. Leaders



Inter Collegiate Winners



Kabaddi (Ladies)



Table Tennis (Ladies)

Inter-Collegiate Winners



Tennis



Chess

# भू-विज्ञान मंडळ

आपल्या महाविद्यालयात भू-विज्ञान मंडळाचे हे तिसरे वर्ष आहे. या वर्षी मंडळाचा चिटणीस म्हणून तृतीय वर्ष बी. ए. चा विद्यार्थी श्री. अशोक हरी नारखेडे याची निवड झाली. दि. ६-८-७३ रोजी शहादा कॉलेजमधील भू-विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एम. देशमुख यांच्या शुभ हस्ते भू-विज्ञान मंडळाचे उद्घाटन झाले. डॉ. देशमुख यांनी "हिमालयातील परिसरातील" प्रत्यक्ष डोळ्याने पाहिलेल्या निसर्गाचे स्पष्टीकरण भौगोलिक दृष्टिकोनातून केले.

ह्या वर्षी विभागातर्फे 'गोवा' सहल आयोजित करण्यात आलेली होती. परंतु ती डिसेंबरमध्ये जाऊ शकली नाही. मार्चमध्ये निघाली.

विस्तार सेवा केन्द्रातर्फे आयोजित इयत्ता ९ वी भूगोल उद्बोधन शिबिरासाठी मंडळाच्या विद्यार्थ्यांनी जळगाव जिल्ह्याचे विविध नकाशे तयार करून दिले. त्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे मंडळ आभारी आहे.

डहाणूकर कॉलेज, मुंबई येथील प्रा. आर. आर. मधुटे यांनी दि. १२-२-७४ रोजी मंडळाच्या विद्यार्थ्यांना "जीवशास्त्र व तत्संबंधी प्रश्न व त्यावरील उपाय-योजनांकडे पाहण्याचा दृष्टिकोन" या विषयावर भाषण दिले. व मंडळाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना "प्रायोगिक भूगोल" ह्या विषयासंबंधीचे मार्गदर्शन केले.

भू-विज्ञान मंडळाच्या कार्यात ज्यांनी ज्यांनी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष सहकार्य केले त्यांचे भू-विज्ञान मंडळ अत्यंत आभारी आहे.

प्रा. स. दि. सिरसीकर
कार्याध्यक्ष

ए. एच. नारखेडे
चिटणीस

# प्लॅनिंग फोरम

प्लॅनिंग फोरमचे उद्घाटन यावर्षी नासिकच्या बी. वाय्. के. कॉलेजचे प्राचार्य एम्. एस्. गोसावी यांच्या हस्ते दिनांक २३-८-७३ रोजी झाले. " नियोजनाकडे केवळ टीकात्मक दृष्टिकोनातून न बघता विधायक दृष्टिकोनातून नियोजनाचा विचार केला पाहिजे व नियोजन यशस्वी होण्यासाठी स्वयंस्फूर्त संघटना, स्वयंसिद्ध आचार संहिता, नावीन्याची अभिलाषा व लवचिक दृष्टिकोन इत्यादींची आवश्यकता असते " असे विचार त्यांनी आपल्या भाषणात जपान मधील " सामुदायिक व्यवस्थापनाचे " उदाहरण देऊन, अत्यंत प्रभावीपणे मांडले.

प्लॅनिंग फोरमतर्फे दि. १०-१२-७३ पासून १६-१२-७३ पर्यंत साजरा केलेला "नियोजन सप्ताह " हे ह्या वर्षीच्या कार्यक्रमाचे एक वैशिष्ट्य म्हणून नमूद करता येईल. नियोजन सप्ताहाच्या कार्यक्रमाची सुरवात जळगाव जिल्ह्याचे सुप्रसिद्ध कार्यकर्ते व जळगाव जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य श्री राजाभाऊ मंत्री यांच्या " जळगाव जिल्ह्याची औद्योगिक क्षमता " या विषयावरील भाषणाने झाली. जळगाव जिल्हा औद्योगिक दृष्ट्या मागे असून महाराष्ट्राच्या संदर्भात तुलनात्मक दृष्ट्या शेतमजूरांची संख्या जास्त असल्यामुळे ग्रामीण रोजगारीचा प्रश्न सोडविण्यासाठी औद्योगिक विकासासाठी पाणी पुरवठा योजना आखून शेतमालाचे उत्पादन वाढविले पाहिजे म्हणजे शेतमाल प्रक्रिया करणारे अनेक कारखाने काढता येतील व रोजगारीची नवीन संधी तरूणांना उपलब्ध करून देता येईल असे विचार त्यांनी समर्थपणे मांडले.

दि. १३-१२-७३ रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, जळगाव शाखेचे मॅनेजर श्री. एम्. बी. रणसिंग यांचे " बँकांच्या पतपुरवठ्यातील बदलत्या प्रवृत्ती " या विषयावर भाषण झाले. बँकांच्या राष्ट्रीयीकरणापूर्वीचे बँकांचे कर्जपुरवठाविषयक धोरण व राष्ट्रीयीकरणानंतर त्यामध्ये घडून आलेला अमूलाग्र बदल याचे स्पष्टीकरण त्यांनी अनेक उदाहरणे देऊन प्रभावीपणे केले.

नियोजन सप्ताहात प्लॅनिंग फोरमच्या वतीने झालेला विशेष कार्यक्रम म्हणजे " नियोजनामुळे भारतात समाजवादाचा पाया रोवला गेला आहे. " या विषयावर क्षेत्रीय प्रसिद्धी कार्यालयाच्या मदतीने आयोजित केलेली वादविवाद स्पर्धा होय. या वादविवाद स्पर्धेत पुढील विद्यार्थी बक्षिसास पात्र ठरलेत.

१) श्री सुधाकर माळी– पहिले बक्षीस ( बी. एड्. कॉलेज )
२) कु. संध्या धर्माधिकारी– द्वितीय बक्षीस ( नूतन महाविद्यालय )
३) श्री. ए. एम्. देशपांडे– तृतीय बक्षीस ( एम्. जे. कॉलेज )



## PLANNING FORUM

Managing Committee






Farewell to Shri Nandode clerk who retired.

Managing Committee



Science Association



Sahitya Mandal

Felicitation



Prof. Advant—Prize for Critical Study of Marathi Stories 1971



Dr. Iftikar Ahmed qot his Ph, D,

## N. S. S.



Students at Kadgaon Camp



At work—Arhane Camp

ही वादविवाद स्पर्धा नूतन महाविद्यालयात ठेवण्यात आली होता. व त्यावेळी प्राचार्य श्री. आर. जी. शिंदे यांचे सहकार्य व मार्गदर्शन आम्हास लाभले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. क्षेत्रीय प्रसिद्धी अधिकारी श्री. खांडेकर यांच्या सहकार्याचा या ठिकाणी आवर्जून उल्लेख केला पाहिजे. त्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोत. प्रा. डी. व्ही. पाटील, प्रा. जे. एन. चौधरी व प्राध्यापक चव्हाण यांनी परीक्षकाचे काम पाहिले. त्याबद्दल त्या सर्वांचेही आम्ही आभारी आहोत.

आमच्या प्रत्येक कार्यक्रमात प्राचार्य श्री. पोतनीस, उपप्राचार्य श्री. अदवंत व उपप्राचार्य श्री. थत्ते तसेच अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. भावे आणि डॉ. एस. आर. चिरमाडे व इतर प्राध्यापक वर्ग यांनी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

**सुभाष पी. फालक**
**ए. व्ही. मुजुमदार**
विद्यार्थी सेक्रेटरी

**प्रा. आर. डी. राणे**
प्रभारी-प्राध्यापक
प्लॅनिंग फोरम

# राष्ट्रीय सेवा योजना

## युवकांची दुष्काळाशी झुंज—

१९७२–७३ हे वर्ष दुष्काळी वर्ष होते. म्हणून अनेक दुष्काळी योजना या वर्षात राबवण्यात आल्या. या योजनात भाग घेऊन दुष्काळाशी मुकाबला करण्याचा आपला वाटा युवकांनी उचलावा म्हणून अखिल भारतीय पातळीवर 'युवकांची दुष्का-ळाशी झुंज' कार्यक्रम स्वीकारण्यात आला. या योजनेखाली आमच्या महाविद्यालयातील रा. से योजनेमार्फत दि. ७ मे ते ३१ मे १९७३ पर्यंत २५ दिवसांचे श्रमशिबीर घेण्यात आले. वाघूर प्रकल्पातील कालवा खोदण्याचे काम घेण्यात आले होते. शिबीर स्थळ हे तरसोद-भादली रस्त्यावरील श्री. ओंकार चौधरी यांचे मळ्यात होते. शिबीरातील कालवा खोदण्याचे काम जवळ जवळ २००० क्यूबिक मीटर इतक्या लांबीचे पूर्ण करण्यात आले. जळगाव तालुका तसा शेती पाणीपुरवठा योजनेच्या बाबतीत उपेक्षित राहिलेला असल्याने दुष्काळी परिस्थितीवर मात करण्याच्या दृष्टीने योग्य असे हे काम होते. कालवा १२ फूट रुंद व २॥ फूट खोल खोदायचा होता.

शिबिराचे उद्घाटन सभापति व उपसभापति पंचायत समिती जळगाव यांच्या हस्ते झाले. खोदकाम शुभारंभ श्री. चव्हाण सभापति, समाज कल्याण खाते जिल्हा परिषद, जळगाव यांचे हस्ते झाला. श्री. ल. नी. छापेकर, डॉ. अविनाश आचार्य सुप्रसिध्द सिनेस्टार श्री. श्रीकान्त मोघे, कर्नल एस. डी. जोशी, श्री. वाय. एम्. बोरोले जे. आर. पाटील, प्रा. बोंडे, श्री. म्हात्रे या विद्यार्थी-प्रेमी व्यक्तींनी शिबिरात येऊन मार्गदर्शनपर भाषणे दिली. तसेच जळगाव जिल्हा पत्रकारांनी अचानक धावती भेट देऊन शिबिराची पाहाणी केली. आणि विद्यार्थ्यांच्या साहसाची प्रशंसा केली. मादली बु॥ येथील श्री. वंडू शाहीर आणि पार्टी यांनी शिबीरात दोनदा पोवाड्याचा कार्यक्रम करून विद्यार्थ्यांना स्फूर्ति दिली. तसेच जळगाव येथील श्री. व सौ. शशिकांत राजदेरकर यांनी विद्यार्थ्यांपुढे सिनेसंगीत व इतर मनोरंजनपर कार्यक्रम सादर करून रणरणत्या उन्हात विद्यार्थ्यांना दिलासा दिला. तसेच जळगाव येथील प्रभात सोडा चालकांनी विद्यार्थ्यांना एक दिवसाचे थंड पेय मनसोक्त पुरवून विद्यार्थ्यांच्या या योजनेस प्रोत्साहन दिले.

सरपंच ग्रामपंचायत तरसोद, सर्वश्री पंडीत उखा कोल्हे, सीताराम तोताराम सोनवणे, डॉ. कोंणे, डॉ. रामभाऊ आपटे, डॉ. नारखेडे, डॉ. सुभानराव पाटील, अग्रवालसाहेब अमलगमेटेड कं. जळगाव, जनार्दन रामू चौधरी, जोशी साहेब, एस्. डी. ओ., म्हैणे, डॉ. चित्रे या सर्व मान्यवर व्यक्तींनी शिबिर यशस्वी करण्यासाठी अनेक प्रकारे मदत दिली. त्या सर्वांचे आभारी आहोत.

दिनांक ३१ मे रोजी या शिबिराची सांगता खासदार भाईसाहेब महाजन यांच्या अध्यक्षतेखाली श्री. जोशी साहेब कार्यकारी अभियंता यांच्या हस्ते झाली. शिबीर यशस्वी करण्यात श्री. जोशी साहेब, श्री. म्हेत्रे साहेब यांचा सिंहाचा वाटा होता.

## वृक्षारोपण–

दुष्काळ-निवारण कार्यक्रमाशी संबंधित असा अत्यंत महत्वाचा वृक्षारोपणाचा कार्यक्रम जून महिन्यापासून राबविण्यात आला. एफ्. डी. ओ. श्री. परांडे साहेब यांच्या सहकार्याने आमच्या विद्यार्थ्यांनी ही योजना सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत नवीन राष्ट्रीय महामार्गावर राबविली. संबंध राष्ट्रीय हमरस्त्यावर झाडे लावण्याचा हा कार्यक्रम यापुढे सुद्धा सुरू ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी स्वमेहनतीने ५०० पर्यंत खड्डे खोदून वृक्षारोपणास फॉरेस्ट खात्याला सहाय्य केले.

## आव्हाणे श्रमशिबीर –

आव्हाणे गावाशी या वर्षीच्या सुरुवातीपासूनच संपर्क साधायला सुरुवात केली होती. आव्हाणे हे गाव जळगावपासून फक्त ४ मैल अंतरावर आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याने या श्रमशिबिरात सार्वजनिक शाळा-कोंडवाडा तयार करणे, विहुल मंदीर



ओटा बांधणे आणि रस्त्याच्या कडेला पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी गटार तयार करण्याचे कार्य या शिबिरात पूर्ण करण्यात आले. हे शिबीर ११ ते १४ नोव्हेंबर १९७३ पर्यंत घेण्यात आले. या शिबिरात श्री. एकनाथ देशमुख, श्री. मधु पांढरे यांनी काव्यगायनाचा कार्यक्रम सादर केला. तसेच फील्ड पब्लिसिटी ऑफिसने एक दिवस अनुबोध पटाचा कार्यक्रम घडवून आणला. गावकऱ्यांनी भारुडाचा कार्यक्रम सादर करून शिबिरार्थींची करमणूक केली. गावकरी आणि विद्यार्थी हे सेवाभावनेने निश्चित ध्येय गाठू शकतात हे या शिबिरात प्रत्ययास आले. या शिबिरासाठी सुद्धा जिल्हा परिषद पदाधिकारी, पंचायत समिती सभासद इत्यादींनी बहुमोल सहाय्य केले.

## कडगाव श्रमशिबीर—

या वर्षीचे ३ रे श्रमशिबीर जानेवारी २५ ते २८ पर्यंत घेण्यात आले गावकऱ्यांच्या इच्छेप्रमाणे याशिबीरात गावच्या हायस्कूलच्या इमारतीचा पाया खोदून तो भरण्याचे काम स्वीकारण्यात आलेले होते. ८ खोल्या व व्हरांडा मिळून हा पाया खोदून साधारणतः १ फूटापर्यंत दगड, माती यांनी भरून काढण्यात आला. अंदाजे १००० ब्रासचे काम या शिबिरात पूर्ण करण्यात आले. गावकऱ्यांसाठी फील्ड पब्लिसिटीतर्फे धर्मपुत्र हा सिनेमा दाखविण्यात आला. तसेच या शिबिराचे उद्घाटन श्री. आबासाहेब के. डी. पाटील यांचे हस्ते झाले. श्री. देवरामभाऊ नारखेडे व श्री. एम्. आय. चौधरी, डी. सी. ओ. यांची उद्बोधक भाषणे झाली. शिबिराची सांगता डॉ. अण्णासाहेब बेंडाळे यांच्या हस्ते झाली. विद्यार्थी करीत असलेल्या या विधायक कार्याची त्यांनी प्रसंशा केली. याशिवाय या शिबिराला आमचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्रा. चिपळूणकर, प्रा. केळकर प्रा. रा. वा. पाटील, प्रा. डी. डी. पाटील, प्रा. नेमाडे इ. नी भेट दिली आणि प्रत्यक्ष श्रमदानात भाग घेऊन शिबिरार्थींना मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले. या शिबिरात कडगांवच्या गांवकऱ्यांनी अत्यंत अगत्याने सहभाग देऊन व सहकार्य करून शिबीर यशस्वी करण्यास मदत केली.

## मनोरंजन कार्यक्रम–

तीन वर्षांपासून सुरू केलेल्या या श्रमयज्ञातील गांवकऱ्यांच्या मनोरंजनासाठी आम्ही आमचे एक मनोरंजन पथक तयार केले आहे. त्याचा सुरुवातीचा प्रयोग आव्हाणे गावात झाला. यात गर्बा, कोळीनृत्ये व गाणी इ. कार्यक्रम सादर करण्यात आली. हा कार्यक्रम थोडासा बदलून सामाजिक अनिष्ट प्रथा विरोधी प्रचार कार्यक्रम यापुढे करण्यात येणार आहे.

## प्रशिक्ष --

दर वर्षीप्रमाणे नव्याने या योजनेत नांवे नोंदविलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रशिक्षित करण्यासाठी यावर्षीही जुलैमध्ये प्रशिक्षणक्रम आयोजित करण्यात आला. आमच्या प्राध्यापकांमधून अनेकांनी हे प्रशिक्षण घडवून आणण्यास हातभार लावला. यात प्रामुख्याने प्रा. एस्. एस्. कुळकर्णी प्रा. लता पाटणकर यांनी भाग घेतला.

या वर्षी विद्यार्थी-प्रतिनिधी म्हणून पुढील विद्यार्थ्यांनी काम पाहिले.

| | |
|---|---|
| श्री. राजू महाजन | कु. पत्की |
| श्री. प्रभाकर असोदेकर | कु. तुळसा पाटील |
| श्री. अरुण नेत्रे | कु. सुनंदा खडके |
| श्री. तानाजी भोइटे | |

वरील सर्व कार्यक्रम पार पाडण्यासाठी आम्हाला प्राचार्य पोतनीस उपप्राचार्यद्वय प्रा. अदवंत, प्रा. धत्ते, प्रा. चिपळूणकर व जिल्हा परिषद पदाधिकारी, पंचायतसमिति पदाधिकारी, कलेक्टर साहेब, सप्लाय ऑफिसर श्री. इंगवले श्री. परांडे साहेब, श्री. जोशी साहेब इ. मान्यवर व्यक्तींचे सहाय्य झाले याबद्दल आम्ही या सर्वांचे आभारी आहोत.

तसेच याशिवाय अनेक ज्ञात व अज्ञात व्यक्तिनी आम्हास आमचे वर्षभराचे कार्यक्रम पार पाडण्यास हातभार लावला आहे त्यांचेही आम्ही आभारी आहोत.

| | | |
|---|---|---|
| सर्व रा. से. विद्यार्थी व विद्यार्थिनी | प्रा. व्ही. जे. चौधरी<br>प्रा एम. डी. बोंडे<br>श्री. जी. एन पंडीत<br>साहाय्यक प्राध्यापक | प्रा दि. ह. महाजन<br>प्रमुख<br>रा. से. योजना |





# वसतिगृह

या वर्षी जुन्या व नव्या वसतिगृहात मिळून १५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. मुलींच्या वसतिगृहात या वर्षी ३० विद्यार्थिनींच्या राहण्याची सोय झाली. या वर्षापासून मुलींच्या वसतिगृहाचे स्वतंत्र रेक्टर म्हणून प्रा. आर. जी. खारूल यांची नेमणूक करण्यात आली.

वर्षाच्या प्रारंभी वसतिगृहातील विद्यार्थ्यांची एक सभा उपप्राचार्य धत्ते यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. वसतिगृहात सामाजिक जीवनाचे संस्कार आपणावर कसे घडतात याचे त्यांनी थोडक्यात विवेचन केले.

## अभ्यास-मंडळ

विद्यार्थ्यांना अभ्यासेतर विषयांची माहिती व्हावी व त्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडावी या हेतूने या वर्षीही आम्ही 'अभ्यास मंडळ' चालविले. अभ्यास-मंडळाचे चिटणीस म्हणून श्री. विजयकुमार राणे यांनी काम पाहिले.

अभ्यास-मंडळातर्फे पाच व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रा. केळकर यांचे 'संस्कृत-वाङमयाची तोंडओळख' या विषयावर, प्रा सिरसीकर यांचे 'विश्वाच्या संदर्भात पृथ्वी व चंद्र' या विषयावर, प्रा. चिपळूणकर यांचे 'इंग्रजी वाङमयातील अविस्मरणीय स्वभाव-चित्रे' या विषयावर व्याख्यान झाले.

आपल्या वसतिगृहाचे माजी विद्यार्थी एकनाथ देशमुख यास त्यांच्या 'ओळखी-अनोळखी' या कविता-संग्रहास महाराष्ट्र शासनाने प्रथम क्रमांकाचे बक्षिस दिले याप्रीत्यर्थ श्री. एकनाथ देशमुख यांचा सत्कार प्रा. राजा महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. एकनाथ देशमुख यांच्या बऱ्याचशा कविता वसतिगृहाच्या खोल्यांत व परिसरात लिहिल्या गेल्या आहेत. आपल्या कवितांना कसा-कसा आकार प्राप्त होत गेला यासंबंधी श्री. एकनाथ देशमुख यांनी जे अनुभव सांगितले ते विद्यार्थ्यांना अतिशय आवडले.

## अभ्यास--व्याख्यानमाला

पदवी-पूर्व परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या पाठ्यक्रमावर आधारित अशी अभ्यास-व्याख्यान-माला आयोजित करण्याचा उपक्रम आम्ही सुरू केलेला आहे. सहामाहीच्या अगोदर आम्ही बायॉलॉजी, फिजिक्स व इंग्रजी या विषयांवर प्रत्येकी दोन अशी सहा व्याख्याने आयोजित केली. तसेच मार्च महिन्यात अशाच प्रकारची एक व्याख्यान-माला आम्ही आयोजित केली. या उपक्रमात आम्हांस प्रा. व्ही. वी. शहा,

प्रा. एस्. एस्. पाटील, प्रा. बी. आर. पाटील, प्रा. बोंडे, प्रा. डी. एस्. नेमाडे, प्रा. कर्णिक यांचे बहुमोल सहकार्य लाभले. वरील सर्व व्याख्यात्यांचे आम्ही आभारी आहोत.

## आरोग्य

विद्यार्थ्यांना व्यायामाची गोडी लागावी व आरोग्याकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ नये या दृष्टीने आम्ही एक महिनाभर योगासनांचा वर्ग चालविला. मुलींसाठी योगासनाचा वर्ग फेब्रुवारी महिन्यात आयोजित करण्यात आला. यासाठी आम्हास श्री. राणे डॉक्टर व सौ. विजया पाटील यांचे सहकार्य लाभले. आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

## स्नेह-संमेलन

या वर्षी वसतिगृहाच्या स्नेह-सम्मेलनानिमित्त दोन दिवसांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सर्वश्री धांडे एस्. एल्., चौधरी एस्. वाय्., पाटील एस्. टी., चौधरी मूलचंद, ढाके व्ही. टी., बोरसे बो बी., व कु. मीरा होसकोटे व विद्या काबरे यांनी विद्यार्थी-प्रतिनिधी म्हणून कार्यक्रमाची धुरा वाहिली. श्री. धांडे एस्. एल्. यांनी जनरल सेक्रेटरी म्हणून काम पाहिले.

दि. १२-१-७४ रोजी दुपारी ४ वाजता सम्मेलनाचे प्रमुख पाहुणे खासदार य़ा. शि. महाजन यांचे भाषण झाले. समाजातील दलित व उपेक्षित घटकांच्या विद्यमान परिस्थितीचे विवेचन करून, सामाजिक समतेची दृष्टी अंगी बाणल्याशिवाय व सर्व समाज एकसंघ झाल्याशिवाय आपला देश प्रगत होऊ शकणार नाही हा विचार त्यांनी आग्रहाने मांडला.

दि. १३-१-७४ रोजी सहनाईच्या मधुर स्वरात दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमास प्रारंभ झाला. सकाळी सुई-दोरा, स्लो सायकलिंग, संगीत खुर्ची यासारखे गमतीदार खेळ आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थी-विद्यार्थिनींनी हौसेने भाग घेऊन खेळांचे कार्यक्रम यशस्वी केले. या बाबतीत आम्हास श्री. एल्. टी. देशमुख यांचे व जिमखान्याचे सहकार्य लाभले. आभारी आहोत.

दुपारी बरोबर ४ वाजता विविध मनोरंजनाच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रारंभी जगदीशचंद्र माथुर लिखित 'रीढ़ की हड्डी' या नाटिकेचा प्रयोग झाला. नाटिकेचे दिग्दर्शन प्रा. ए. पी. चौधरी यांनी केले. त्यानंतर पद्माकर डावरे यांची 'कुणी गोविंद घ्या' ही मराठी नाटिका सादर करण्यात आली. या नाटिकेचे दिग्दर्शन प्रा. केळकर यांनी केले. रंगभूषा व वेशभूषा या बाजू प्रा. केळकर व श्री. ग. नी. पंडित यांनी यशस्वीपणे सांभाळल्या. दोन्ही नाटिकांनी रसिकांची मने



जिंकली. प्रत्येक कलावंताने आपापली भूमिका समजूतदारपणे वठवली. त्यातही विद्यार्थी सराफ याच्या अभिनयास रसिकांनी विशेष दाद दिली. झंकार ऑर्केस्ट्राची सिनेगीतेही विद्यार्थ्यांना आवडली श्री. आर्. डी. पाटील व विजयकुमार राणे यांची गीते विद्यार्थ्यांना अतिशय आवडली. प्रा केळकर व श्री. पंडीत यांचे आम्ही आभारी आहोत. बक्षिस-समारंभ प्राचार्य पोतनीस यांच्या हस्ते झाला.

'मिना-बाजार' व 'ट्राय युवर बेस्ट' ही या वर्षाच्या संमेलनातील प्रमुख वैशिष्ट्ये होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. ए. पी. चौधरी यांनी जी मेहनत घेतली तिला तोड नाही.

या वर्षी मुलांच्या वसतिगृहाचे वॉर्डन म्हणून प्रा. ए. पी. चौधरी यांनी काम पाहिले. स्वभावाने गोड व वृत्तीने कामसू असल्यामुळे आम्हांस त्यांचे उत्तम सहकार्य लाभले.

## मेस

मेसचे काम जसे अप्रिय तसेच कटकटीचे. १९७२-७३ या वर्षाच्या अखेरीस सर्व खर्च वजा जाता मेसजवळ अदमासे ३५० रुपयांचा माल शिलकेत होता. या वर्षाच्या सुरुवातीपासून अन्नधान्याच्या टंचाईमुळे मेस चालविताना बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागले. वर्षभरात सेक्रेटरी व स्टॉकमन म्हणून खालील विद्यार्थ्यांनी कामे पाहिली. सर्वश्री जावळे एस्. ए., गाजरे के. एस्., धांडे पी. के., चौधरी आर. टी., चौधरी भागवत, चौधरी व्ही. के., राणे विजयकुमार, सोनार पी. आर., पाटील ए. टी., तायडे जे. के., चौधरी प्रकाश, फेगडे एन्. बी., चौधरी एम्. डी., भारंबे आर्. एन्., पाटील पी. एल्.

## अभिनंदन व आभार

वसतिगृहातील विद्यार्थी श्री. गुरव जे. के. (तृतीय वर्ष, विज्ञान) यास महाविद्यालयातील 'आदर्श विद्यार्थी' म्हणून पारितोषिक मिळाले. अभिनंदन.

या कामात आम्हास प्राचार्य पोतनीस व उपप्राचार्य प्रा. अदवंत व थत्ते यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभत गेले. त्यांचे आम्ही आभारी आहोत.

प्रा. बा. बा. पाटील
रेक्टर,
मुलांचे वसतिगृह

प्रा. आर. जी. खारूल
रेक्टर,
मुलींचे वसतिगृह

# वादविवाद मंडळ

१) वादविवाद मंडळाचे उद्घाटन ह्यावर्षी महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत व समीक्षक श्री. गं. बा. सरदार ह्यांचे हस्ते झाले. महाराष्ट्राच्या वैचारिक वाटचालीचा आढावा त्यांनी अतिशय समर्थपणे घेतला.

२) महाराष्ट्रातील एक युवक नेते व युवक क्रांति दलाचे कार्यवाह डॉ. कुमार सप्तर्षी ह्यांनी 'युवकांपुढील आव्हाने' ह्या विषयावरील आपले विचार अत्यंत परखड-पणे मांडले व युवक-आंदोलनातील आपले अनुभव सांगितले.

३) महाराष्ट्रातील प्रसिद्ध कादंबरीकार, कथाकार व नाटककार श्री. भावे ह्यांचे 'मी नास्तिक का नाही' ह्या विषयावर भाषण झाले. ते एक थोर साहित्यिक असल्याने त्यांनी रसाळपणे आपले विचार मांडले.

४) 'मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व इतर सवलती चालू ठेवाव्यात का नाही' ह्या विषयावर चर्चा ठेवली होती. त्यात श्री. कांबळे, महाजन, भालेराव, सावखेडकर, वाबळे इ. विद्यार्थ्यांनी व प्रा केळकर, प्रा. कुळकर्णी व प्रा. श्रीमती लता पाटणकर ह्यांनी भाग घेतला. उपप्राचार्य श्री. थत्ते ह्यांनी समर्पकपणे समारोप केला.

५) सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत, स्वातंत्र्य चळवळीतले थोर नेते व विधायक कार्यकर्ते श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे ह्यांचे 'आजचे शिक्षण जीवनाभिमुख आहे काय ?' ह्या विषयावर भाषण झाले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरे झाली. अण्णासाहेबांनी अप्पासाहेब पटवर्धनांच्या गोपुरी येथील प्रकल्पांची माहिती दिली.

६) गांधी शांति-प्रतिष्ठानच्या युवक विभागाचे प्रमुख व चंबळ खोऱ्यातील डाकूंच्या आत्मसमर्पणातील एक प्रमुख सूत्रधार श्री. एस्. एन्. सुब्बाराव, दिल्ली ह्यांचे भाषण तर विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध करणारे होते. सुरवातीला त्यांनी अत्यंत मधूर आवाजात २-३ गीते गाइली. त्यांचेबरोबर आत्मसमर्पण केलेले एक डाकू बिचाराम हे होते.

७) 'एक गाव एक पाणवठा' मोहिमेचे एक सूत्रधार व सामाजिक समतेचा ध्यास घेतलेले एक पुरोगामी विचारवंत डॉ. बाबा आढाव ह्यांचे 'एक गाव एक पाणवठा' ह्याच विषयावर भाषण झाले. मंडळातर्फे डॉ. आढावांबरोबर २०-२५ विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक कानडे ह्या गावात ह्याच मोहिमेकरता गेले होते.

८) जळगाव जिल्ह्यातील हुंडा विरोधी समितीच्या कार्यकर्त्या डॉ. सिंधूताई चौधरी व सौ. शामला सरोदे ह्यांनी वरील विषयावर भाषण देऊन आपल्या



कार्याची माहिती दिली. नंतर २-३ विद्यार्थ्यांनी पण ह्यात भाग घेतला. शेवटी अध्यक्षपदी असलेले उपप्राचार्य थत्ते ह्यांनी आपले विचार मांडले.

९) सुप्रसिद्ध इतिहास-संशोधक, गाढे विद्वान श्री. सेतुमाधवराव पगडी ह्यांचे 'मिर्झा गालिबची शेरशायरी' ह्या विषयावर भाषण झाले. गालिबच्या शायरीशी त्यांनी अत्यंत काव्यमय परिचय करून दिला.

१०) उर्दू व पर्शियनचे विद्वान प्रा. डॉ. निजामुद्दीन गोरेकर ह्यांचे 'फारशीचा इतर भाषांवर परिणाम' या विषयावर भाषण झाले. सुप्रसिद्ध साहित्यिक व 'अस्मितादर्श' चे संपादक प्रा. गंगाधर पानतावणे ह्यांचे 'दलित साहित्य' ह्या विषयावर अत्यंत मुद्देसूद व माहितीपूर्ण भाषण झाले.

११) भोपाळ येथील हेवी इलेक्ट्रिक मधील एक इंजिनिअर व पुनर्निर्माणचे कार्यकर्ते श्री. गो. दा. लिमये ह्यांचे 'युवकांनी त्यांच्यापुढील समस्यांची उकल कशी करावी' ह्यासंबंधी मार्गदर्शन करणारे भाषण झाले.

१२) महाराष्ट्रातील एक थोर कार्यकर्त्या श्रीमती गोदावरीबाई परुळेकर ह्यांचे 'आदिवासींच्या समस्या' ह्या विषयावर भाषण झाले. गोदावरीबाईंचा ह्या क्षेत्रातील अनुभव प्रदीर्घ आहे व त्या अनुभवातूनच त्यांनी लिहिलेल्या 'जेव्हा माणूस जागा होतो' ह्या पुस्तकास राष्ट्रपति पारितोषिक मिळाले आहे. त्यांचे भाषण अत्यंत श्रवणीय व स्फूर्तिदायक झाले.

अशा रीतीने मंडळाच्या उद्घाटनाला व समारोपाला महाराष्ट्रातील दोन थोर नेते उपलब्ध झाले ह्याचा आम्हाला आनंद वाटतो. इतर क्षेत्रातील विचारवंतांची येथील भाषणे झाली.

धुळे, जळगाव, पुणे, नगर, अमळनेर इत्यादि ठिकाणी झालेल्या वादविवाद स्पर्धांमध्ये खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

१) कु. शोभा जोशी, २) कु. सुनीति जोशी, ३) कु. प्रतिभा खटावकर, ४) श्री. विजय दिक्षित, ५) श्री. श्याम जोशी ६) श्री. कोल्हे, ७) श्री. सतीश वाणी. ह्यापैकी काहींनी प्रशस्तिपत्रके मिळवली.

वादविवाद मंडळाच्या कामात प्राचार्य पोतनीस यांनी आम्हाला नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. ज्यांनी ज्यांनी आम्हाला ह्या कामात मदत केली त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

प्रेम कोगटा
चिटणीस
वादविवाद मंडळ

प्रा. लता पाटणकर
अध्यक्ष
वादविवाद मंडळ

# वाङ्मय मंडळ

१९७३–७४ या वर्षात मंडळातर्फे पुढीलप्रमाणे कार्यक्रम झाले–

दि. २८ जुलै ७३ रोजी प्रा. न. का. धारपुरे ( पुणे ) यांचे " मराठी रंगभूमी " या विषयावर माहितीपूर्ण सुश्राव्य असे भाषण झाले.

दि. ७ ऑगस्ट ७३ रोजी मंडळाच्या वतीने आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. एकनाथ देशमुख यांचा, त्यांच्या " ओळखी-अनोळखी " या काव्य-संग्रहास महाराष्ट्र सरकारने पारितोषिक देऊन गौरव केल्याबद्दल, सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य पोतनीस होते. सत्कार उपप्राचार्य प्रा. म. ना. अदवंत यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी श्री. एकनाथ देशमुख यांच्या गौरवपर प्रा. म. मो. केळकर व प्रा. राजा महाजन यांची समर्पक भाषणे झाली.

दि. ३० जानेवारी ७४ रोजी अरबी–फारशी भाषा–साहित्याचे नामवंत प्रा. डॉ. गोरेकर ( मुंबई ) यांचे " भारतीय भाषांवर फारशीचा प्रभाव " या विषयावर उद्‌बोधक व विचारपरिप्लुत असे भाषण झाले.

पहिल्या सत्रात द्वितीय व तृतीय वर्ष बी. ए. (इंग्रजी) वर्गातील विद्यार्थ्यांनी " Is English essential in the field of education ? " या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात तृतीय वर्ष बी. ए. (इंग्रजी) वर्गातील विद्यार्थी श्री. पाटील रमेश गंगाराम, श्री. बाविसकर पंडित भागवत, श्री. सैय्यद अमीर नजीर आणि द्वितीय वर्ष बी. ए. ( इंग्रजी ) वर्गातील श्री. पाटील रमेश रामधन, श्री. पाटील लहू रूपसिंग यांनी भाग घेतला. विद्यार्थ्यांनी आपले विचार इंग्रजीतून स्पष्ट केले. अध्यक्षस्थानी इंग्रजी विभाग प्रमुख प्रा. चिपळूणकर होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. भालचंद्र र. पाटील यांनी केले.

दि. १५ सप्टेंबर ७३ रोजी श्री. ज. सु. खडके यांचे "हिंदी दिवसा" च्या निमित्ताने " हिंदी को जनसुलभ बनाने के उपाय " या विषयावर विचारप्रेरक भाषण झाले.

बी. ए. तृतीय वर्ष ( हिंदी ) वर्गातील विद्यार्थिनी कु. प्रतिभा शर्मा हिचे " हिंदी काव्यमें रस संप्रदाय" या विषयावर निबंध वाचन झाले. तसेच पुरुषोत्तम लड्ढा यांचेही " हिंदी नाटक और नाट्यकला " या विषयावर निबंधवाचन झाले.

मंडळाच्या कार्यात ज्यांनी ज्यांनी आम्हास सहकार्य दिले त्या सर्वांचे आम्ही कृतज्ञ आहोत.

**कु. चंदना गगडाणी**
**श्री. म. फु. राजपूत**
विद्यार्थी प्रतिनिधी

**प्रा. राजा महाजन**
कार्याध्यक्ष
वाङमय मंडळ



# स्टाफ् अकॅदमी

१) न्यायमूर्ती श्री. दाऊद यांच्या 'समानहक्क कायदा' या विषयावरील व्याख्यानाने स्टाफ् अकॅदमीच्या या वर्षाच्या कार्याचा आरंभ झाला. भारतीय घटनेचे स्वरूप, अधिकार व जबाबदाऱ्या आणि परंपरानुयायी हिंदू–मुस्लीम समाज यामुळे नव्या कायद्यांना संभवणाऱ्या प्रतिक्रियांचे श्री. दाऊद यांनी सुंदर विश्लेषण केले.

२) प्रा. डॉ. न. का. धारपुरे ( पुणे ) यांनी 'जर्मन साहित्य' या विषयावर उद्‌बोधक व्याख्यान देऊन निरनिराळ्या कालखंडातील जर्मन वाङमयाची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट केली.

३) प्रि. चं. रा. पोतनीस यांनी 'भारताच्या परराष्ट्रनीतीचे सद्यःस्वरूप व सुधारणा' या विषयावर व्याख्यान देताना परराष्ट्र खाते, त्याची रचना व कार्यपद्धती, त्याचे देशविदेशातील कार्य, त्यातील उणीवा व त्या सुधारण्याचे मार्ग याबाबत अद्ययावत माहिती सांगितली.

४) इन्कमटॅक्स ऑफिसर श्री. हंसराज आर्य यांनी आयकराची बंधने व सवलती आणि कोड नंबर्सची नवी पद्धती यांची माहिती देऊन ( करदात्या नोकर वर्गाच्या ) अडचणींसंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे दिली व शंकांचे निराकरण केले.

५) महाविद्यालयातील प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झालेले सेवक श्री. द. शं. नांदोडे व श्री. रा. ब. रजपूत यांना स्टाफतर्फे निरोप देण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी त्यांच्या सेवेचा गौरव करणारी भाषणे झाली. सत्कारास श्री. नांदोडे व श्री. रामसिंग यांनी समयोचित उत्तरे दिली.

६) प्रा. इफ्तिकार अहमद यांच्या प्रबंधास पुणे विद्यापीठाने पी. एच्. डी. पदवी दिली म्हणून इफ्तिकार यांचा सत्कार करण्यात आला. डॉक्टर इफ्तिकार यांनी आपल्या प्रबंधातील सिद्धान्ताचे यावेळी संक्षेपाने विवरण केले.

७) मुंबई विद्यापीठाने ग्रंथलेखनाबद्दल प्रा. म. ना. अदवंत यांना 'तर्खडकर पारितोषिक' दिले म्हणून प्रा. अदवंत यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. अदवंत यांनी 'मराठीतील काही कथाकार' या आपल्या समीक्षणात्म ग्रंथाची वैशिष्ट्ये यावेळी स्पष्ट केली.

वरील सर्व कार्यक्रमांना स्टाफ मेंबर्स बहुसंख्येने उपस्थित होते. प्रि. पोतनीस यांनी या वर्षी स्टाफसाठी काही गरजेच्या नव्या वस्तू घेण्यास संमती दिली. या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

**प्रा. तु. रा. चिरमाडे**

**प्रा. सु. का. जोशी** **प्रा. वि. म. शहा**
स्टाफ–सेक्रेटरीज्

# REPORTS
# 1973-1974

## N. C. C.

This year the long felt need of the Commanding Officer for the Battalion was fulfilled when LT COL CV NERURKAR took over the command of the Battalion on 1st June 1973. He infused a new spirit of enthusiasm among the officers and other ranks. The intake of cadets in NCC Senior Division was reduced considerably this year as per the Govt. policy and hence we had to restrict admission to cadets in the NCC. Those who were willing to join NCC but could not be taken were bitterly disappointed. Our college was sanctioned 4 coys, each coy of 105 cadets. The enrolment of cadets started in the last week of JUNE and the regular training began in the first week of JULY. The cadets showed deep interest in the training.

The Independence Day parade was held on 15th AUGUST 1973. It was also a Promise Parade for NCC officers and Cadets. Principal C. R. POTNIS took the salute and inspected the parade. CAPT. J. B. KHADKE commanded this parade. Addressing the officers and Cadets on this occasion, Principal C. R. POTNIS expressed the hope that' NCC Cadets will continue to play a useful role in nation building activities. The Annual Training Camp was not held this year due to financial difficulties of the Government. However, the cadre type training in lieu of Annual Training Camp was carried-out in DECEMBER and JANUARY.

The Second Term began with colourful activities. NCC completed its 25 years of service and therefore the NCC SILVER JUBILEE was celebrated on 25th NOVEMBER 1973 through-out the nation. On this happy occasion, many competitions for cadets were arranged. The inter-troop and inter-company Drill competitions were held and I am glad to state that Coy 2 from our college won the first prize in shooting competition and the cadet D. D. PATIL of Coy 2 stood second 2/LT V. B. SHAH won the first prize among the officers Coy 1 stood second in



18th Maharashtra Bn. N. C. C.



Hon. O. C. Lt. Col. C. V. Nerurkar
with N. C. C. Officers & Staff



Under-Officer, Campers & best shot

Annual Social Gathering 1973



Marathi One–Act Play
आम्ही सौजन्यात आहोत.



Bhangda Science Students

Annual Social Gathering 1973



Bhangda by boys & girls




Farewell to Head Peon Shri Ramsing who retired.

Drill competition. The remarkable feature of the shooting competition was that for the first time girl cadets of Signal Platoon from BHUSAWAL took part in the competitions. We arranged Fun Fair for the cadets as well as the general public. It was a grand success. The Ceremonial Parade was very colourful and impressive and it was commanded by CAPT. A. G. KARNIK. Shri Y. S. MAHAJAN, MP, Bar-at-Law, kindly consented to take the salute. He came all the way from DELHI in the midst of his heavy engagements and that shows the keen interest he has in the activities of the NCC. We were very fortunate to have Mr. RAM JETHMALANI, Chairman, Bar Council of India, as the Chief Guest for he Silver Jubilee Functi)r. Mr. Y. S. MAHAJAN, MP, presided-over the function. Mr. RAM JETHMALANI in his address, analysed the malady that is infecting our country and expressed the hope that organizations like NCC will make the future of the country bright. It was a memorable speech. Then Mr. Y. S. MAHAJAN addressed the distinguished gathering and captured the minds of the people with his magnificient eloquence. He told that the Country was passing through very critical days but that should not dishearten us. India is a country of destiny and with our determination and dedication we will make our future glorious. S/O B. R. DIKSHIT proposed a vote of thanks.

The Director, NCC, Maharashtra State, BRIGADIER H. S. SANDHU paid a visit to our Unit on 25th DECEMBER 1973. He went round the squads of cadets under-going NCC training and he expressed great satisfaction for the excellent training imparted to the cadets.

The Republic Day parade was held on 26th JANUARY 1974 2/LT V. B SHAH was the parade commander and Principal C. R. POTNIS took the salute. On this occasion the prizes were given away at the hands of Principal C. R. POTNIS to the cadets who were best shots, Under officers and those who has 100% attendance on parades. One plato n from our college participated in the Republic-Day Parade on the Police ground Platoon commander was CUO A. G. DAMLE.

Our Group Commander LT COL MUKUT SINGH paid a farewell visit to our unit in JANUARY 1974 on the

eve of his retirement from NCC Service. A grand farewell function was arranged in his honour in the Nutan College, JALGAON. We offer our sincere thanks to Principal R. G. SHINDE for his kind co-operation in arranging this function in his college. On this occasion, Principal R. G. SHINDE made a welcome speech and LIEUT P. N. HUPRIKAR spoke in his honour. Then LT COL MUKUT SINGH was garlanded on behalf of all coys and troops of this Battalion. In reply to his honour LT COL MUKUTSINGH said that though he was retiring from service he was not a tired man and hoped that he would continue to serve the nation in future. His voice was choked with emotions. Then LT COL C. V. NERURKAR presented him a beautiful and decorative table lamp. S/O B. R. DIKSHIT proposed a vote of thanks.

This year B & C Certificate examinations were held in the second week of FEBRUARY. A special cadre was run for the cadets appearing for the examinations and all officers took special efforts for the benefit of cadets. The procedure for conducting these examinations was completely changed this year. However we expect good results from our cadets.

Last year many cadets attended various Summer Training Camps. The names of the cadets who attended the Army Attachment Camp at BELGAUM from 14th MAY to 3rd JUNE 1973 are (1) SGT S. S. SURYAWANSHI, Coy No. 2 (2) SGT B. S. PATIL, Coy No. 2 (3) SGT A. G. MAHAJAN, Coy 2 (4) CUO K. Y. PATIL, Coy 4 (5) CUO V. K. PATIL, Coy 4 (6) CUO L. R. WAGH, Coy 4 (7) CPL D. B. BAVISKAR, Coy 3.

The following cadets were Under officers in various coys as shown against their names.

| | | |
|---|---|---|
| (1) N. K. DESHMUKH | CSUO | Coy-1 |
| (2) A. G. DAMLE | CUO | Coy-4 |
| (3) M. M. SONAWANE | CUO | Coy-4 |
| (4) K. Y. PATIL | CUO | Coy-4 |
| (5) R. S. KULKARNI | CUO | Coy-3 |
| (6) G. S. BHOLE | CUO | Coy-2 |



I take this opportunity to thank our Principal C. R. POTNIS, Vice-Principals M. N. ADVANT and M. M. THATTE for their valuable guidance and co-operation in carrying out various NCC activities. I thank all those who have helped and guided me from time to time in conducting NCC activities. I am grateful to our Battalion ommander CLT COL C. V. NERURKAR for his precious guidance in all matters. It will not be too much to say that he will guide us in future and make the NCC trai-ning more interesting.

J. B. KHADKE
Captain
Senior N. C. C. officer

## SCIENCE ASSOCIATION

Managing committe of the Science Association for 1973-74 consisted of the following persons.

| | | |
|---|---|---|
| Principal | C. R. Potnis | (President) |
| Prof. | L. N. Mulbagal. | (Chairman) |
| Shri. | K. P. Phalak | (General Secretary) |
| Kum. | Mangala Patil | (Ladies Representative) |
| Shri. | Rane P. P. | (C. R. T. Y. B. Sc.) |
| Shri. | Narkhede G. R. | (C. R. S. Y. B. Sc.) |
| Shri. | Athawale D. S. | (C. R. F. Y. B. Sc.) |
| Shri. | Kolhe G. N. | (C. R. F. Y. B. Sc. A) |
| Shri. | Jawale V. A. | (C. R. P. D. Sc. F.) |
| Shri. | Wani P. R | (C. R. P. D. Sc. G) |
| Shri. | Khadke V. B. | (C. R. P. D. Sc. H) |

Activities of the association commenced with the inaugural address by Dr. G. D. Bendale, who stressed the importance of Yoga in the development of a healthy body & a healthy mind.

Among other activities may be mentioned the talk by Dr. S. T. Tilak On a new and developing branch of biology, the Areobiology.

It is earnestly hoped that the students will start taking more interest in the activities of the association.

K. P. PHALAK
General Secretary
Science Association

Prof. L. N. MULBAGAL
Chairman
Science Association

## Career Advising Unit

Our College has been approved for setting up a Career Advising Unit. Such a unit has been set up in the College since August, 1973. The functions of the Career Advising unit are:

1) to organise career talks, conferences, group guidance programme etc.

2) to maintain a career information room, where occupational information and guidance literature of all types received from the University Employment Bureau, state Directorate, D. G. E & T and other sources would be suitably displayed for the benefit of the students.

3) to make efforts to develop part-time and vacation employment opportunities on the College campus as well as in local area.

Professor Yeole is looking after the activities of the Career Advising Unit. During the last six months about 40 students have approached the office for getting information regarding various courses and occupations.

Students are requested to take benefit of the said unit.

Prof. M. K. YEOLE



## Endowment and Prizes 1973-74

| | |
|---|---|
| 1) Kher and Gambhirmal Prize for the best student in the College equally divided between | 1] Gurav Jayant Konddev<br>2] Rav Anil Govind. |
| 2) P. V. Ratnaparakhi Prize for standing Ist at the F. Y. B. A. and B. Sc. Examination in the College. | Kelkar Pramod Manohar |
| 3) Manubhai Desai Prize for the student from Khandesh who has highest number of marks at the S. S. C. examination amongst those joining this College. | Damle Anand Narayan |
| 4) Barjibhe Endowment Prize for obtaining highest number of marks in English at the Pre-Degree Arts Examination 1973. | Miss Savkar Pradnya Madhukar |
| 5) D. R. Nadkarni Science Prize for the student who stands Ist at the Pre-Degree Science Examination 1973. | Gajare Sanjay Baburav |
| 6) D. U. Wani Prize for obtaining highest number of marks in Mathematics at the Pre-Professional examination 1973. | Kelkar Pramod Manohar |
| 7) Science Association Prize for the student who stands first in III and IV Semesters of B. Sc. Degree Course Examination, 1973. | Devre Ganpat Dashrath |
| 8) Science Association Prize for the student who stands first in F. Y. B. Sc examination 1973. | Kelkar Pramod Manohar |
| 9) V. V. Gandhe and Satyabhama Gandhe Prize for the student for obtaining highest number of marks in Marathi (Special) at the T. Y. B. A. Examination, 1973 | Miss Phegade Prabha Yashwant |

स्टेशनरी
सर्व प्रकारचा कागद
शाळा, कॉलेज व लायब्ररीसाठी पुस्तके
यासाठी...

**अरुण बुक डेपो**

म्युनिसिपल धर्मशाळा, जळगाव.

• वह्या, लेजरबुक्स, रजिस्टर्स इत्यादि
माफक दरात मिळतील.
दर्जेदार माल व माफक दर यासाठी—
**अवश्य भेट द्या.**

○ महाविद्यालये व प्रशाला
यांच्या
नियतकालिकांची छपाई
हे आमचे वैशिष्ट्य आहे.
○ इतर सर्व प्रकारची जॉब कामे
सुबक व वेळेवर
करून दिली जातात—

**श्रीकान्त मुद्रणालय**

१७४, बळिराम पेठ, साईनाथ मंदिराजवळ, जळगाव.





آج ساجد کا یہاں بمبئی سروس کا دوسرا سال تھا۔ وہ یہاں جیسی کریجی کالج میں لیکچرر کی حیثیت سے تھا۔ اپنے ماں باپ سے ۴۰۰ میل دور ہونے کے باوجود وہ اس عرصے میں ایک بھی دفعہ اپنے والدین سے ملنے نہ گیا۔ ساجد نے سلمیٰ کو بھول جانے کی بہت کوشش کی لیکن کسی نہ کسی موڑ پر اُسے سلمیٰ کی یاد آ ہی جاتی اور وہ تڑپ اُٹھتا تھا۔ کالج کے اسٹاف روم میں ساجد بیٹھا تھا۔ اسی اثنا فون کی گھنٹی بجی، چپراسی نے فون اُٹھایا اور کچھ دیر فون پر بات کر کے ساجد کی طرف متوجہ ہوتا آپکا فون!

ساجد کون ہے؟ چپراسی: آپ کے گھر کا نوکر! ــ ساجد نے ریسیور ہاتھ میں لیا "کیا بات ہے رامو؟"

رامو: صاحب آج دوپہر اچانک بی بی جی کی طبیعت خراب ہو گئی اس لئے میں انھیں نانا وٹی اسپتال لے آیا ہوں آپ فوراً آجائیے۔ "کیوں کیا ہوا ہے انھیں؟" رامو: پتہ نہیں ابھی ڈاکٹر چیک کر رہا ہے آپ فوراً چلے آئیے۔ اور اسی لئے ساجد اسپتال کی طرف روانہ ہو گیا۔

جوں ہی ساجد اسپتال پہنچا، میٹرنٹی ہوم کے پاس رامو کو کھڑا دیکھ کر ٹھٹھک گیا۔ رامو کیا بات ہے؟ پروین کہاں ہے؟ ــ رامو زیر لب مسکرایا۔ اور کہا، آپ باپ بننے والے ہیں۔

ساجد کے ہونٹوں پر ایک مسکراہٹ آئی مگر دوسرے ہی لمحے غائب ہو گئی۔

ساجد کے اس بدلتے رنگ کو دیکھ کر رامو حیران ہو گیا۔ مگر کچھ دریافت نہ کر سکا۔ ہیڈ نرس کمرے میں جانا چاہتی تھی کہ ساجد نے بڑھ کر اُسے روکا۔

کیسی طبیعت ہے ان کی؟ نرس نے غور سے دیکھا اور پوچھا۔ "کیا آپ ہی پروین کے شوہر ہیں؟"

ساجد: "جی ہاں"

نرس تسلی دیتے ہوئے کمرے میں داخل ہو گئی۔

قریب آدھ گھنٹے کے بعد بچے کے رونے کی آواز آئی۔ ساجد دروازہ تک کھسک گیا۔ اور اندر سے ہیڈ نرس کی آواز آئی۔ شاید وہ اپنی ماتحت نرس سے کہہ رہی تھی "جاؤ باہر پروفیسر صاحب کو پیام مسرت سُنا دو"۔ کمرے کا دروازہ کھلا اور ایک سفید پوش خاتون باہر آئی ساجد کو لگا جیسے کوئی بجلی نکل کر اس کے جسم میں کوند گئی ہو۔ اسے اپنی آنکھوں پر یقین نہیں آ رہا تھا۔

مبارک...... ہو...... آپ...... کے...... لڑ...... کا

ساجد کے منہ سے بے اختیار نکلا "سلمیٰ..... تم!!" نرس کی آواز رندھ گئی۔